
# माणूस
साप्ताहिक

४० पैसे

४।२।६७




: कोल्हापूर : सातारा : सांगली : निवडणूक वार्ता :

श्री. ब मो. पुरंदरे

यांची एक ऐतिहासिक कादंबरी

# शिलंगणाचं सोनं



मूल्य तीन रुपये

राजहंस प्रकाशन पुणे

४१९ नारायण पेठ, पुणे २




## एक समग्र साप्ताहिक

*वर्ष : सहावे*
*अंक : एकतिसावा*
*किंमत : चाळीस पैसे*
*वार्षिक वर्गणी : वीस रुपये*

**संपादक**
श्री. ग. माजगावकर

**संपादक मंडळ**
*अ. मा. साधू*
*दिलीप माजगावकर*
*सौ. निर्मला पुरंदरे*

**व्यवस्था विभाग**
*अ. वा. गंधे*
*अ. वि. गणपत्ये*

*पत्ता – ४९९ नारायण, पुणे २.*
*दूरध्वनी – ५७३५९*

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# पत्रमैत्री

**स. न.** **२३ जाने.**

गेल्या एप्रिलपासून मी आपल्या 'माणूस' साप्ताहिकाचा नियमीत वाचक आहे. मुक्ताफळे, भिंतीच्या तुंबड्या ही सदरे माझ्या विशेष आवडीची. दिल्ली-दरबार हे नविन सदर सुरु केल्यापासून मला 'माणूस' साप्ताहिक अधिक आवडू लागले परंतु २१।१।६७ अंक वाचताना 'विवेक' किंवा आंदोलन तर वाचीत नाही ना अशी शंका एकसारखी मनात येत होती. माणूस साप्ताहिक कुठल्याही राजकीय पक्षाचे मुखपत्र होऊ नये ही इच्छा.

**के. जी. भूमकर.**

**स. न.** **२६ जाने.**

दिनांक २१ जाने. चा 'माणूस'चा अंक अत्युत्तम निघाला. माणूसचा अंक हातात पडला की, केव्हा एकदा 'दिल्ली दरबार' वाचतो, असे होते. रामभाऊ म्हाळगी व एस्. एम्. जोशी यांचा चरित्रात्मक थोडक्यात करून दिलेला परिचय उद्बोधक आहे. तसेच बाकीची सदरेही नेहमीप्रमाणेच वाचनीय आहेत.

'माणूस'ची परंपरा अशीच चालेल अशी आशा आहे.

परंतु एक अशी सूचना करावीशी वाटते की, या अंकात 'शास्त्रीय मनोरंजन' हे सदर सुरू करावे म्हणजे दुधात साखर पडेल.

**रामदास मा. कोचर.**

इंदिरा गांधी यांच्या प्रधान मंत्रीपदाच्या कारकीर्दीला आता एक वर्ष झाले आहे. प्रधान मंत्रीपदासाठी आणखी महिनाभरातच पुन्हा निवडणूक होणार असल्यामुळे इंदिरा गांधी यांच्या एका वर्षाच्या कारकीर्दीचा आढावा घेण्यात येथील राजकीय निरीक्षक गर्क झाले आहेत. एक वर्षाचा काळ म्हणजे तसा फारसा नसला तरी इंदिरा गांधी यांनी ज्या परिस्थितीत देशाची सूत्रे आपल्याकडे घेतली ती परिस्थिती अतिशय बिकट व कसोटीची असल्यामुळे ही वर्षभराची कारकीर्दही महत्त्वाची ठरते.

पाकिस्तानबरोबरच्या युद्धाचा आपल्या अर्थव्यवस्थेवर बराच ताण पडणे साहजिकच होते. या युद्धामुळे ब्रिटन, अमेरिका व पश्चिम जर्मनी या धनको राष्ट्रांबरोबर आपले संबंधही बिघडले होते. तशातच अवर्षणाचा फटका बसल्यामुळे अन्नधान्याच्या टंचाईने विकट स्वरूप धारण केले. या युद्धामुळे भारताच्या प्रतिष्ठेत भर पडली व त्याची रसरशीत प्रतिमा जगाला दिसली ही गोष्ट जरी खरी असली तरी अर्थव्यवस्थेच्या ताणामुळे व अन्नटंचाईमुळे राज्यशकट चालविणे ही मोठ्या चिकाटीची गोष्ट झाली होती. तशातच श्री. लाल बहादुर शास्त्री यांचे आकस्मिक

# पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी

निधन झाले. अशा या परिस्थितीत एक वर्षापुरती राज्यसूत्रे हातात घेणे हे धाडसाचे होते.

हे प्रधान मंत्रीपद स्वीकारताना आपले नेमके बळ कशात आहे हे इंदिरा गांधी यांना माहीत होते. कॉंग्रेस पक्षात त्यांचा स्वतःचा गट असा नाही. त्यामुळे आपल्या वडिलांप्रमाणेच पक्ष सामर्थ्या ऐवजी जनतेच्या पाठिंब्याच्या बळावर त्यांनी उभे राहण्याचे ठरविले. प्रश्न रेंगाळत ठेवण्याचा वडिलांचा वारसा मात्र त्यांनी कटाक्षाने बाजूला ठेवला. अनेक वर्षे भिजत पडलेले प्रश्न संबंधितांचे शक्य तितके अधिक समाधान करून सोडविण्याचे कार्य त्यांनी हाती घेतले. पंजाबी सुभ्याचा प्रश्न दहा वर्षे रेंगाळत पडला होता. पंजाबी सुभ्याची निर्मिती केल्याशिवाय शीख समाजाचे समाधान होणार नाही हे ध्यानात येताच त्यांनी पंजाबी सुभ्याची निर्मिती करण्याच्या दृष्टीने पावले टाकावयास प्रारंभ केला व गेल्या १ नोव्हेंबर रोजी पंजाबी सुभा अस्तित्वात आला. महाराष्ट्रपुरते बोलायचे झाल्यास बेळगाव व कारवारसारख्या सीमा भागाचा प्रश्न व गोव्याचा भावी दर्जा या दोन प्रश्नांसंबंधी बरेच दिवस घोळ घातला जात होता. सीमा भागाचा प्रश्न सोडविण्यास अनेक कॉंग्रेस

श्रेष्ठांचा विरोध असतानाही त्यांनी तो विरोध न जुमानता महाजन मंडळाची नेमणूक केली. गोव्याच्या जनता कौलाचा तिथि निश्चय करून तो प्रश्नही त्यांनी हातावेगळा केला. (आता जनता कौलात आपला निकाल लागला आणि बेळगांवात एक जागेसाठी चार महाराष्ट्रवादी उमेदवार उभे करून त्या प्रश्नाचा निकाल लावण्याची आपण आगाऊच तयारी करून ठेवली हा भाग वेगळा).

आपल्या वडिलांप्रमाणे स्वप्नरंजनात दंग न होता प्रत्येक प्रश्नाकडे वास्तव दृष्टिकोनातून पाहण्याचे इंदिरा गांधी यांनी ठरविले असल्यामुळे अवमूल्यनासारखा धाडसी निर्णयही त्यांनी त्याबाबत फारसा घोळ घालत न बसता जाहीर केला. आपली निर्यात एवढी घसरली होती की काही प्रमाणात का होईना ती सावरावयाची असेल तर तत्कालीन परिस्थितीत तरी अवमूल्यनाशिवाय पर्याय नाही हे जेव्हा त्यांना आढळून आले तेव्हा आपले राजकीय विरोधक या अवमूल्यनाचे भांडवल करतील हे माहीत असूनही त्यांनी त्याबाबतीत डळमळीत भूमिका स्वीकारली नाही. आर्थिक परिस्थितीप्रमाणे अन्नधान्याची टंचाईही गेल्या वर्षभरात सतत जाण-

# तडफदार कामगिरीचे एक वर्ष

वत होती. इतकेच नव्हे तर दुसऱ्या अवर्षणाने ही टंचाई अधिकच वाढली. अशावेळी सिद्धान्तांचा किंवा लटक्या प्रतिष्ठेचा बागुलबोवा निर्माण करण्याऐवजी अमेरिकेची बंधने मान्य करून त्यांनी अन्नधान्याची आयात केली. इंदिरा गांधी यांनी परक्यांना देश विकला अशी कृष्ण मेनन प्रभृती जुन्या सहकाऱ्यांनी ओरड करताच त्यांनी याबाबतीतील आपली भूमिका जाहीर करून टाकली. लटक्या प्रतिष्ठेपायी लक्षावधी लोकांच्या जीवनाशी खेळण्याऐवजी अन्नधान्याच्या बाबतीत आपण स्वावलंबी होईपर्यंत मदत देणाऱ्या राष्ट्राची किमान बंधने स्वीकारणे हा व्यवहारी मार्गच आपण अनुसरला, असे त्यांनी नुकत्याच एका जाहीर भाषणात सांगितले आणि म्हणूनच आपण वर्षभरात काय साध्य केले असे विचारले असताना त्यांनी मोठ्या अभिमानाने सांगितले की दोन अवर्षणांच्या तडाख्यात देश सापडला असतानाही एकही भूकबळी पडला नाही हे समाधान फार मोठे आहे.

### दुबळे सहकारी

देशापुढे असे मोठमोठे प्रश्न निर्माण झाले असताना काँग्रेस पक्षामधील सत्तांधतेनेही उग्र स्वरूप धारण केले. इंदिरा गांधी यांच्या विरोधकांना नमविण्यात

प्रारंभी कामराज यांनी मोठीच मदत केली. परंतु नंतर या दोघांतील मतभेद वाढू लागले तसे पक्षांतर्गत व मंत्रिमंडळांतर्गत इंदिरा गांधी यांना विरोधाची धग जाणवू लागली. गेल्या मे महिन्यात मुंबईत अखिल भारतीय कॉंग्रेस समितीचे अधिवेशन भरले होते. या अधिवेशनांत मध्यवर्ती निवडणूक मंडळावरील सदस्यांच्या निवडीच्या वेळी इंदिरा गांधी व कामराज यांच्यातील मतभेदांचे प्रदर्शन झाले. अवमूल्यनाचा निर्णयही आपला सल्ला न घेता केला म्हणून कामराजांचा घुस्सा झाला होता. याच सुमारास संसदेच्या बैठकीत विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सरकारपक्षावर टीकेची झोड उठविली तेव्हा सहकाऱ्यांच्या सहकार्याच्या अभावी अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर आले. यावेळी इच्छा असूनही इंदिरा गांधी यांना कणखर धोरण स्वीकारता आले नाही याचे साधे कारण असे आहे की मंत्रिमंडळांतला त्यांचा गट अतिशय दुबळा आहे. सुब्रम्हण्यम काय, अशोक मेहता काय किंवा दिनेशसिंग काय, ही सारीच माणसे पाटील, अतुल्य घोष प्रभृतींच्या दडपणाला टक्कर देण्याइतकी समर्थ नाहीत. त्यामुळेच नंदा यांच्या राजीनाम्याची संधी घेऊन मंत्रिमंडळाची पुनर्रचना करण्याचा इंदिरा गांधी यांचा प्रयत्न पूर्णपणे फसला.

विद्यार्थ्यांमधील असंतोषानेही गेल्या पाच-दहा महिन्यांत बरेच उग्र स्वरूप धारण केले होते. यावेळी राज्यसरकारांनी जितके कडक धोरण स्वीकारावयास हवे होते तितके स्वीकारले नाही. केंद्रसत्ता शक्य तितकी दुबळी झाली तरच आपले महत्त्व वाढणार आहे हे ओळखून काही राज्य सरकारांनी तर आपल्या मागण्या वा विरोध-कांच्या मार्फत मांडण्याचे तंत्र अवलंबिले. याबाबतीतील एक आंध्रचे उदाहरणदेखील पुरेसे आहे. पाचवा पोलाद कारखाना कोठे उभारावा हा वस्तुत: तज्ञांनी निकाली काढावयाचा विषय आहे. परंतु आंध्रप्रदेश सरकारचा हा कारखाना विशाखापट्टण येथेच उभारला जावा असा आग्रह आहे. यामुळे या कारखान्याच्या जागेसंबंधी वाद निर्माण होताच आंध्रमध्ये प्रक्षुब्ध दंगलीचा डोंब उसळला त्याला आंध्र सरकारची चिथावणीही कारणीभूत होती. समर्थ सहकाऱ्याच्या अभावी राज्य सरकारांची बंडे मोडून काढण्याचे कार्य इंदिरा गांधी यांना जितक्या सफाईने करणे आवश्यक होते तितक्या प्रमाणात ते जमले नाही.

चीनच्या आक्रमणानंतर भारताची जी मानहानी झाली तिचा अलिप्त राष्ट्रांच्या एकजुटीवर व प्रभावावर बराच परिणाम झाला होता. ही एकजूट पुन्हा प्रभावी करण्याचाही इंदिरा गांधी यांनी आपल्या वर्षभराच्या कारकीर्दीत प्रयत्न केला. गेल्या ऑक्टोबरमध्ये नासर व टिटो दिल्लीस आले व पुन्हा एकदा अलिप्ततावादी राष्ट्रे जागतिक तणातणीच्या काळात महत्त्वाची कामगिरी बजावू शकतात याचा या शिखर परिषदेत पुकारा करण्यात आला.

अशा रीतीने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्षेत्रात, समजूतदारपणाचे धोरण स्वीका-रून, प्रचलित प्रश्न वास्तव भूमिकेवरून सोडविण्याचा इंदिरा गांधी यांचा प्रयत्न

चालू असताना. ७ नोव्हेंबरच्या गोहत्या समितीच्या राजधानीतील हिंसक निदर्शनाने मात्र त्यांच्या राजवटीस जोरदार धक्का दिला. त्या दिवशी परिस्थिति अशी होती की दिल्लीत शासनयंत्रणा अस्तित्वात आहे किंवा नाही याचीच शंका यावी. यानंतर गोहत्या समितीच्या नेत्यांचे उपोषण पर्व सुरू झाले, प्रारंभी या आंदोलनाने बराच वेग घेतला होता. परंतु या प्रश्नावर लोकमत फारसे प्रक्षुब्ध होत नाही असे आढळून येताच हळूहळू आंदोलन थंड होत चालले. शंकराचार्यांच्या उपोषणानेही इप्सित साध्य होत नाही असे आढळून आल्यानंतर गोहत्या समितीतील नेत्यानी आपले अंग काढून घेण्यास प्रारंभ केला. या प्रकरणीही उपोषण सोडल्यानंतर गोवधबंदीच्या मागणीचा विचार करण्यासाठी उच्चाधिकार समिति नेमू असे इंदिरा गांधी यांनी आश्वासन दिले होते. परंतु त्यावर शंकराचार्यांचे समाधान होऊ शकले नाही. या आंदोलनात शंकराचार्यांच्या प्राणांचा बळी जाता कामा नये यासाठी सरकारप्रमुख म्हणून जेवढे काही करता येण्याजोगे होते तेवढे त्यांनी केले. आपल्या कारकीर्दीचा आढावा घेताना त्यांनी गोवधबंदीच्या आंदोलनाबाबत आपण कोणती भूमिका स्वीकारली याचा खुलासा केला आहे. हे आंदोलन मूलत: राजकीय स्वरूपाचे आहे व निवडणूक पर्व जवळ आल्यामुळेच ते हाती घेण्यात आले आहे हा त्यांचा आरोप कायमच आहे. या आंदोलनात पुढाकार घेतल्याबद्दल त्यांचा जनसंघावर विशेष रोष आहे. तरीही शंकराचार्यांच्या जीविताबद्दल आपल्याला काळजी वाटते हेही त्यांनी सांगितले.

### झंझावाती दौरे

आपल्या टेबलावरचे कागदपत्र आवरून त्या निवडणूक प्रचारासाठी बाहेर पडल्या आहेत. या दौऱ्यात सकाळी सात वाजल्यापासून रात्री अकरा वाजेपर्यंत आठ-दहा सभांत भाषण करून त्यांना वडिलांप्रमाणे आपणही उत्साहात कमी नाही हे दाखवून दिले आहे. अशा प्रवासात काही वेळा गैरसोयी होतात व तसे काही मनाविरुद्ध घडले की पंडितजी चटकन संतापत. इंदिरा गांधी यांनी नुकताच एवढा दौरा केला; परंतु त्या एकदाही चिडल्या नाहीत असे त्यांच्याबरोबर जाऊन आलेल्या पत्रकराने सांगितले. या दौऱ्यांत नेहरूकन्येवर जनतेचे किती प्रेम आहे हे पुन्हा एकदा दिसून आले आहे. कामराज आणि मोरारजी देसाई यांचे प्रचारदौरेही चालू आहेत. या दौऱ्यांच्या पार्श्वभूमीवर इंदिरा गांधी यांचा दौरा तर विशेष उठून दिसतो. वर्षभराच्या कारकीर्दीत जमेच्या बाजूला बऱ्याच गोष्टी घडल्या आहेत आणि खर्चाच्या बाजूलाही. परंतु तरीही इंदिरा गांधी यांचा आपल्या देशबांधवांवरचा व देशबांधवांचा त्यांच्यावरचा विश्वास अणुमात्रही ढळलेला नाही हेच या दौऱ्यावरून दिसून आले, दिसून येते. या परस्परविश्वासाच्या बळावरच त्या पुन्हा प्रधानमंत्रीपदाची निवडणूक लढविणार आहेत. ●

**– सदाशिव पेठकर**

# मुक्ताफळे



## □ कथा सांगती जनक ' व्यथांचे ' !

आजची मराठी कथा ही एक नवी व्यथा आहे. यावर काहीतरी गंभीर उपाय करण्याचा आचार्य अत्रे यांचा विचार आहे व निवडणुकीनंतर ते या कथेच्या व्यथेचा समाचार घेणार आहेत. आम्ही त्यांना सुयश चिंतितो ! परंतु व्यथांचे जनक हे उत्तम रंगतदार कथा तूर्त सांगू लागले आहेत. ' अंधारातली लावणी ' तिचे ' कर्ते शाहीर ' उघडपणे गाऊ लागले आहेत. १९६२ साली लाल चीनने भारताचा लष्करी पराभव केला. लढाई म्हटली की लष्करी पराभव कधीतरी होणारच. हा पराभव सपशेल मान्य करून चीनशी तह करावा, असे डावे कम्युनिस्ट म्हणतात. परंतु लढाई करूनही ' जय ' किंवा ' पराजय ' काहीही न होणारा आपला देश आहे याची या डाव्यांना कल्पना नाही. आपण चीनशी युद्ध केले. लढाई बंद झाली. पराजय कुणाचा झाला ? चीनचा ! ...नाही ! भारताचा ! ...नाही ! आपण पाकिस्तानशी लढाई केली. पराजय कुणाचा झाला ? पाकिस्तानचा ? भारताचा... ' तेव्हा अशाही लढाया करता येतात. पराजयाला पराजय म्हणायचे कारण काय ? इंग्रजीत डिबॅकल... म्हणावे. मराठीत...' बर्फाचे तट पेटुनी उठले ..' म्हणावे. तेव्हा १९६२ साली आपला जो लष्करी ' डिबॅकल ' झाला, त्याचे जनक म्हणून लेफ्ट. जन. बी. एम्. कौल यांना अर्धचंद्र मिळाला. मेनन यांची संरक्षणमंत्रिपदावरून उचलबांगडी झाली. आता ही गाईची भानगड उपस्थित झाली नसती तर काही चीनची धडगत नव्हती ! डिबॅकल झाला. योग्य त्या माणसांना शिक्षा झाल्या. ठीक झाले. पंडितजी आता गेले. आता त्या व्यथेची कथा सांगायची कुणाला काही गरज होती का ? पण लेफ्ट. जन. कौल यांनी डफावर थाप मारली आणि ' अंधारातली लावणी ' म्हणायला सुरुवात केली आहे. आपल्या नवीनच प्रकाशित होणाऱ्या ' The untold story ' – ' सांगण्यासारखी गोष्ट ' या पुस्तकात लेफ्ट. जन. कौल यांनी भारताच्या पराभवाची सर्व जबाबदारी पंडित जवाहर-

लाल नेहरू, कृष्ण मेनन व मोरारजी यांचेवर ढकलली आहे.

'मेननचा पगडा जवाहर गृही '–हे एक शल्य 'मेनन यांचा आत्मघातकी उद्धटपणा ' हे दुसरे शल्य आणि 'मोरारजी यांनी लष्करी सामग्रीसाठी पैसे दिले नाहीत' हे तिसरे शल्य कौल यांनी सांगितले आहे.

" माझा संबंध काय ? मेनन थेट नेहरूंकडेच काय ते मागत असत. अर्थमंत्री असून मेनन मला विचारीत नसत. काय जो गोंधळ केला तो नेहरू, मेनन यांनी केला ! " इति मोरारजी. श्री. अतुल्य घोष तर म्हणतांत–'कौल यांच्यासारख्या क्षुद्र लष्करी अधिकाऱ्याशी चर्चा करण्याची पद्धतच नव्हती. नालायक म्हणून डच्चू मिळालेल्या खालच्या रांगेतल्या लष्करी अधिकाऱ्याने पराभवाचे खापर मंत्रिमंडळावर फोडले यात आश्चर्य नाही ! परंतु यात मोरारजींचा उल्लेख नको होता. "

लेफ्ट. जन. कौल म्हणतात की, मेनन फायली फेकीत असत. लष्करी अधिकाऱ्यांचे अपमान करीत असत. मेनन यांनी कौल यांच्या पुस्तकासंबंधी काहीही सांगण्याचे नाकारले.

ऐन निवडणुकीच्या दारात असले पुस्तक लिहिणाऱ्या लेफ्ट. जन. कौल यांचा आम्ही धिक्कार करतो. ' कथा सांगती जनक व्यथांचे ' हा कार्यक्रम अधिकाधिक रंगत जाण्याचा धोका आता निर्माण झाला आहे. या पुस्तकाला गृहमंत्र्यानी तावडतोब बंदी घालावी. थोर थोर नेत्यांच्या प्रतिमा डागळत असताना गृहमंत्री स्वस्थ कसे ?

**गुंडांना दिवसा प्रकाश असणे, स्वातंत्र्यवीरा जरा ।**
**पैशावीण मुले, अजागळमुखी, तो मंत्री हो गोजिरा ।**
**अधिकाऱ्या धनलोभ नित्य वसतो, काश्मिर नीति उणी ।**
**मेननचा पगडा जवाहरगृही, ही सात शल्ये मनी ।**

अशा काही व्यथा नेहरूविरोधकांनी गायलेल्या आहेत. परंतु स्थिरावस्था ही सर्वांत महत्त्वाची अवस्था आहे. या अवस्थेत कायमचे राहावयाचे असेल तर मते काँग्रेसला दिल्याखेरीज दुसरा पर्याय नाही. काँग्रेसला कौल लावण्यासाठी या कौलांच्या उद्योगाचा धिःकारच केला पाहिजे.

अशी भीती वाटत होती की, या खळबळजनक पुस्तकावर प्रा. अत्रे मराठा पत्रातून दोन-चार झणझणीत लेख लिहिणार. परंतु मेननसाहेबांच्या नव्या दोस्तीमुळे, या पुस्तकात 'मग्रूर' व 'मराठी रक्ताला चटावलेला' मोरारजींचा उद्धार असूनही आचार्य या पुस्तकाकडे आता ढुंकूनही पाहणार नाहीत. अशा गलिच्छ चोपड्याला उगाच अधिक प्रसिद्धी देण्यात काय अर्थ आहे ?

**–ग्यानबा**

# विचार वारे

समीर

## ☐ व्हिएटनामी दृष्टीतून व्हिएटनाम

भारतीय वर्तमानपत्र-वाचकांची व्हिएटनाममधील परिस्थितीची माहिती बव्हंशी अमेरिकन वार्ताहरांवर व पत्रकारांवर अवलंबून आहे. त्यामुळे व्हिएटनामी दृष्टीतून व्हिएटनाम पाहण्याची क्वचित मिळणारी संधी जिज्ञासू भारतीयांच्या दृष्टीने मोलाची आहे. अशी संधी गेल्या काही दिवसांत दोन व्हिएटनामी व्यक्तींच्या भारत-भेटीमुळे मिळाली. त्या म्हणजे, "राष्ट्रीय नेतृत्व समिती" या सरकारी अधिकार असलेल्या दक्षिण व्हिएटनामी मंडळाचे एक प्रमुख सदस्य व पत्रकार श्री. मान-यान–आन आणि दक्षिण आशियातील बौद्ध संप्रदायाचे व्हिएटनामी अध्यक्ष भिक्षू थिच ताम चाऊ.

दिल्लीत एका पत्रकाराशी बोलताना श्री. आन म्हणाले, "आम्हांला शांतता पाहिजे, पण न्याय्य शांतता पाहिजे." विविधतेच्या अंतरंगात असलेल्या एकात्मतेवर लोकशाहीची उभारणी झालेली असते, व "आम्ही दक्षिण व्हिएटनाममध्ये हाच प्रयत्न करीत आहोत" दक्षिण व्हिएटनामी जनतेची सीमारेषेपलीकडील आपल्या देशबांधवांशी युद्ध करण्याची इच्छा नाही, परंतु त्यांच्यावर आक्रमण झाले असल्याने त्यांना दुसरा मार्ग उरलेला नाही. दक्षिण व्हिएटनाममध्ये साम्यवाद्यांपुढे पतन झाले तर तो अंत ठरणार नसून अधिक मोठ्या संकटांचा प्रारंभ ठरेल. ही राजकीय अशांतता केव्हा संपेल ? आनचे उत्तर : 'राजकारणात सदैव अशांतताच असते.'

भारतातील बौद्ध तीर्थस्थानांच्या यात्रेला आलेले भिक्षू थिच म्हणाले की, व्हिएटनामचा प्रश्न शांततापूर्ण मार्गाने सोडविला जावा अशी दक्षिण व्हिएटनाममधील बौद्धांची इच्छा आहे. पण जोपर्यंत उत्तरेहून दक्षिणेला घातपाती पंचमस्तंभी पाठविणे... चालू आहे तोपर्यंत हे शक्य नाही. दक्षिण व्हिएटनामच्या सरकारला तेथील बौद्धांचा संपूर्ण पाठिंबा आहे. आतापर्यंत त्यांनी ज्या चळवळी केल्या त्या केवळ लिखित घटनेसाठी होत्या. कारण अशा घटनेशिवाय खरी लोकशाही स्थापन होणार नाही.

भिक्षू थिच यांनी दिल्लीला येण्यापूर्वी पंजाबात धर्मशाळा या गावी दलाई लामांची भेट घेतली. तिबेटमधील चिनी राज्यकर्ते आता हतप्रभ झाले असून शूर तिबेटी जनतेने स्वातंत्र्याचा लढा अधिकच निकराने चालू ठेवला आहे, त्यामुळे अखेर चिनी राज्यकर्ते तिबेटमधून हुसकून लावले जातील अशी दलाई लामांना खात्री वाटते.

दलाई लामांच्या मते साम्यवादी चीन सबंध दक्षिण आशियाई प्रदेशांत अशांतता निर्माण करण्याचा उद्योग करीत आहे; विशेषत: व्हिएटनाममध्ये जनतेचा धर्म व संस्कृतीचा नाश करण्याचा चीनचा डाव आहे.

भिक्षू थिच यांच्या मते वाराणशी व सारनाथ या दोन ठिकाणी बौद्ध विद्याभ्यासाची दोन मोठी केंद्रे स्थापन करण्यात यावीत व सर्व आशियातील विद्वानांना तेथे येण्यास प्रोत्साहन देण्यात यावे. शिवाय नालंदा येथे एक बौद्ध विश्वविद्यालय स्थापन करण्यात यावे.

## ☐ गोसंवर्धनाची आधुनिक आवश्यकता

गोसंवर्धनाचा प्रश्न हल्ली आपल्याकडे ज्वलंत प्रश्न झाला आहे. तेव्हा एखाद्या परदेशी तज्ज्ञाने या विषयावर आपले विचार प्रकट करणे खासच महत्त्वाचे आहे. हंगेरीचे एक नामांकित पशुवैद्य डॉ. आर्थर हॉर्न काही दिवसांपूर्वी भारतभेट देऊन गेले, तेव्हा दिल्लीच्या वास्तव्यात ते म्हणाले की भारतात पशुसंवर्धन आणि कालव्यांच्या योजनांची सांगड घालून दुधाची पैदास वाढविण्यास खूपच वाव आहे. हंगेरीत असा प्रयोग यशस्वी ठरला आहे. कारण " गुरे पालापाचोळ्याची वसलात लावतात व त्याच वेळी जमिनीला उपयुक्त खताचा पुरवठा करतात." सध्यांची परिस्थिती अशी आहे की, जमिनीतून शक्य तेवढे अधिक मानवी अन्न पैदा करणे आवश्यक झाले आहे. अर्थात गुरांपासून अधिकाधिक दूध मिळविणे व दुधाचे पदार्थ करणे हेही क्रमप्राप्त झाले आहे. त्यासाठी गाई-गुरांना खाणे चांगले दिले पाहिजे व त्यांची निगाही चांगली राखली पाहिजे. परंतु चांगले खाणे म्हणजे अधिक खाणे नव्हे. सध्या डॉ. हॉर्न व त्यांचे सहकारी शास्त्रज्ञ २०,००० गाईंवर प्रयोग करीत असून त्यात खाणे कमी देऊनही दूध व लोण्याची पैदास तेवढीच कशी ठेवता येईल हे पाहत आहेत. त्यांना असे आढळून आले आहे की १५ ते २० टक्के खाणे कमी देऊन दुधाची पैदास ठेवणे व २५ ते ३९ टक्के खाणे कमी देऊन लोण्याची पैदास तेवढीच ठेवणे शक्य आहे. ●

## ☐ आधुनिक भारतातील इतिहास-लेखन

रशियातील एक उच्च श्रेणीचे 'भारतशास्त्रज्ञ' (इंडॉलॉजिस्ट) प्रा. बालाबुशेव्हिच नुकतेच हिंदुस्थानात येऊन गेले, त्यांचे आधुनिक भारतातील इतिहास-लेखनाबद्दल प्रांजळ मत–

"भारताच्या आधुनिक इतिहासावर लिहिल्या गेलेल्या बहुतेक सर्व भारतीय पुस्तकांत ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या कृत्यांवरच सगळा भर दिला आहे. त्यांत जनमताचा कानोसा नाही."

## निवडणूक १९६७

# आपल्याला राजेशाहीच पायजे

[ कोल्हापुरातील उतारवयाचा, अर्धी चड्डी घातलेला गणपत टांगेवाला. आपल्या मरतुकड्या घोड्याला कमीत कमी शिव्या देत टांगा रेटतो आहे. ]

मी : काय म्हणतं आहे कोल्हापुरातलं इलेक्षन.

गणपत : आता आम्हा गरिबांचं कसलं इलेक्षन आलं आहे साहेब ?

मी : अरेच्या. म्हणजे गरिबांचा इलेक्षनशी काहीच संबंध नाही की काय ?

ग. : न्हाई म्हंजी तसं न्हाई म्हनत मी. पन आता घोड्याचा हरबरा तीन रुपय किलो झाला. कुटनं कमवाचं, काय खाचं आन् घोड्याला काय द्याचं–आँ ? गरिबांचं काय न्हाई बघा–इलेक्षन न्हाई–आन काय बी न्हाई.

मी : म्हणून तर आपली गरीबी दूर करण्यासाठी इलेक्षन लढवायला नको का ? अगदी भागच घ्यायचा नाही इलेक्षनमध्ये म्हणजे काय–?

ग. : आत्ता ? भाग घेचा न्हाई असं कुटं म्हनलो हुतो सायेब. पन् आता असं आहे. दिसभर जनावर हानतो तवा कुटं पोटापुरतं भागवता येतं. सारा टायम इलेक्षनसाठी दिला तर काय खानार ? आता कुटं सभेला वगरे जातो गिऱ्हायक बुडवून पन ते काय खरं न्हाई.

मी : अस्सं. अस्सं. मी तेच म्हणत होतो–गरिबांनी इलेक्षनमध्ये खरा इंट-

रेस्ट घेतल्याशिवाय, स्वतःचे लोक निवडून दिल्याशिवाय त्यांची परिस्थिती कशी सुधारेल ?

ग. : कसली परिस्थिती सुधारती सायेब गरिबांची. इलेक्षनमध्ये मतं द्यावी आन गुमान गप्प बसावं. बास–

मी : अरे पण आपले गरिबांचे स्वतःचे काही प्रश्न आहेत की नाही ? असं मुक्या जनावरांसारखं गप्प बसून कसं चालेल–तुमच्या काही गरजा आहेत की नाही–

ग. : आता गरजा कुनाला न्हाईत ? पोटापुरतं खाया होवं, जनावराला चारा हवा, कपडे पायजेत, डोक्यावर घर पायजे–यवढं मिळालं तरी खूप.

मी : अरे, मग हेच म्हणणं तुम्ही मांडीत का नाही जोरात ? गप्प का म्हणून बसता ?

ग. : बोलतो की. सोडत न्हाई. कुनी बी मतासाठी विचारा लागलं का सवाल टाकतो. अन्नाचे भाव सांगतो. पयले खायला द्या असं सांगतो. पन गरिबांचं काय खरं न्हाई. गरिबीच फार माजलीया–

मी : आता स्वातंत्र्य मिळून इतकी वर्षं झाली. इतक्या निवडणुका झाल्या. तरी गरिबी जात नाही म्हणजे काय ? मागच्या निवडणुकात तुम्ही भाग घेतला होता की नाही ?

ग. : तर. बायकामुलांसकट साऱ्यांची मतं बैलजोडीत टाकली. आन गरिबीचं असं आहे सायेब–रोग झाला म्हंजे आपन डाक्तर आनतो. खूप दिवस झाले, खूप औषध दिलं तरी रोग बरा न्हाय झाला तर आपन काय करतो ? डाक्तर बदलतो. आँ ? म्हंजे खरं हाय का न्हाई, तसा आता डाक्तर बदलला पायजे. न्हाई म्हंजे आम्ही आपली अडानी मानसं तुम्हाला कशापायी शानपन शिकवाचं पन गरिबाचं काई खरं न्हाई बगा.

मी : च् च्. असं कसं म्हणता. आत्ता कसं अगदी लाख बोलला होता.

ग. : तेच म्हंतो मी. जंतेला गरिबीचा रोग झालाय. काँग्रेसनं वीस वरस औषध केलं, अंगारे धुपारे दिले. गुन मात्र आला न्हाई. आता डाक्तर बदलला पायजे.

मी : पण कसा बदलायचा ?

ग. : अवं आपली लोकशाही न्हवं का? पाच वरसानं इलेक्षन येत्यात. फाटदिशी मतं उलटी करून टाकायची का डाक्तर बदललाच समजा–

मी : आणि नव्या डॉक्टरचाही गुण नाही आला तर?

ग. : पुन्ना पाच वरसांनी इलेक्षन येत्यातच की. तवा पुन्ना डाक्तर बदलायचा– आता तुम्हाला काय ठावं न्हाई–कशापाई अडाण्याची थट्टा करता ? आम्हा गरिबांची कोनीबी–

मी : छे ! छे ! असं समजू नका तुम्ही.

ग. : गरिबांची सारेच थट्टा करत्यात. देश गरीब आहे. मतं द्या म्हंजे आम्ही श्रीमंत करतो असे मंत्री सांगतात आन् मोटार उडवीत जातात. देश श्रीमंत आहे– गरीबांपावतर आम्ही श्रीमंती पोचवितो असं विरोधीवाले सांगत्यात आन् दंगा करतात. आता कुनाचं खरं

आन् कुनाचं खोटं. गरिबांसाठी काय खरं नाही.

मी : असं कसं म्हणता ?

ग. : त्ये काय न्हाई साहेब. राजेशाहीच पायजे. राजेलोक आपल्या लोकांकडे कसं आपल्या लेकरांसारखं पाहायचे. हितं जो तो आपल्यापुरतं बघतो आन् जंतेकडे कुनीच बघत नाही. बास् आपलं मत राणीसाहेबांना ठरलं.

मी : अरे, पण कोल्हापूर राणीसाहेबांच्या मतदारसंघात येत नाही.

ग. : ते काय नाही. आपलं मत सरळ राणीसाहेबांना ठरलं. गरिबांचा कुनी वालीच उरला न्हाई— काय खरं न्हाई...

[ मी 'माणूस प्रतिनिधी' गप्प बसतो. आणि टांगेवाला मीही पुण्यातून राणीसाहेबांनाच कसं मत द्यावं हे पुन्हा पुन्हा पटवून देऊ लागतो. ]

□

ओरिसा

# काँग्रेस गाफील राहील तर पराभव अटळ

शासनातील भ्रष्टाचार आणि राज्यकर्त्या पक्षाची आपसांतील लाथाळी याबाबतीत उत्तर प्रदेशाइतकेच गाजत असलेले राज्य म्हणजे ओरिसा. भ्रष्टाचाराच्या बाबतीत तर ओरिसा आणि ओरिसातील नेते कुणालाच हार जाणार नाहीत. काँग्रेसच्या या कुकर्मामुळेच ओरिसातील विरोधी पक्ष काँग्रेसमधील अंतर्गत फुटीचा फायदा घेऊन येत्या निवडणुकीत काँग्रेसचा पाडाव करण्याचा जोराचा प्रयत्न करीत आहेत आणि भाऊबंदकीतच काँग्रेस गाफील राहिली तर त्यांच्या हाताला थोडेफार यश लागण्याचीही शक्यता आहे.

परिस्थितीच्या गांभीर्याची काँग्रेस पुढाऱ्यांना कल्पना आहे. पण इलाज नाही. अंतर्गत भांडणामुळे १९६१ च्या निवडणुकीनंतर पुन्हा एकदा मध्येच ओरिसात निवडणुकी घ्यावा लागल्या होत्या. ओरिसाचे काँग्रेसचे दादा आणि भारतीय काँग्रेसमधील एक अत्यंत रहस्यमय व्यक्ती म्हणून गणले गेलेले माजी मुख्यमंत्री श्री. बिजू पटनाईक यांना कामराज योजनेत गादी सोडावी लागली होती. त्यांच्यावर भ्रष्टाचाराच्या बाबतीत जेवढी टीका झाली, त्यापेक्षा जास्त टीका त्यांच्यामागून आलेले मुख्यमंत्री श्री. बिरेन मित्रा यांच्यावर झाली आणि श्री. मित्रा यांनी राजीनामा दिल्यावर आलेले श्री. सदाशिव त्रिपाठी हे इतके दुर्बल मुख्यमंत्री निघाले, की

दोन सत्तागटांमधील तोल सांभाळता सांभाळता त्यांचा स्वतःचाच बळी पडतो की काय, इतकी पाळी आली होती.

ओरिसा काँग्रेसमधील जुने, नावाजलेले काँग्रेस नेते, श्री. हरेकृष्ण मेहताब आणि श्री. नबकृष्ण चौधरी हे या भांडणांना आणि भ्रष्टाचाराला कंटाळून शेवटी बाहेर पडले आणि त्यांनी जनकाँग्रेसच्या उभारणीला मोठा हातभार लावला. याच जन-काँग्रेसच्या कण्याभोवती उभे राहून ओरिसातील विरोधी पक्ष काँग्रेसला सत्तेवरून खाली खेचण्याचा प्रयत्न करीत आहेत.

संध्याच्या १४० विधानसभा उमेदवारांमध्ये अवघे ८२ उमेदवार काँग्रेसचे आहेत. मतदानाची टक्केवारी पाहिली तर अगदी पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीपासून विरोधकांची एकूण मते काँग्रेसपेक्षा अधिकच भरत आली आहेत. ओरिसामध्ये जोर होता गणतंत्र पक्षाचा. आता गणतंत्र पक्ष स्वतंत्र पक्षात जवळ जवळ पूर्णपणे विलीन झाला आहे. स्वतंत्र पक्षाचे ३० उमेदवार सध्याच्या विधानसभेत आहेत. उरलेल्यां-पैकी ११ जागा प्रजासमाजवादी पक्षाच्या, ३ कम्युनिस्टांच्या, १ सं. सो. पाची आणि इतर अपक्ष उमेदवारांच्या आहेत. सध्याच्या विधानसभेतील सुमारे १५ आमदार जनकाँग्रेसच्या बाजूने आहेत.

ओरिसामध्ये सर्व विरोधी पक्षांनी औपचारिकपणे एकत्र येऊन काँग्रेसविरोधाची संयुक्त आघाडी उभारली तरी त्यांच्यात परस्परांत पुरेसे सामंजस्य आहे. शिवाय भौगोलिक दृष्टीने वेगळ्या पक्षांची वजने राज्याच्या वेगवेगळ्या भागांत असल्याने विरोधी पक्षांत आपआपसांतच चुरस लागण्याचा संभव नाही. स्वतंत्र पक्ष आणि जनकाँग्रेस, प्र. स. प. व सं. सो. पा. कम्युनिस्ट यांची कार्यक्षेत्रे अगदी भिन्न आहेत. त्यातल्या त्यात जनकाँग्रेसने स्वतंत्र व प्रजासमाजवाद्यांशी आणि कम्युनिस्टांशी भिन्न भिन्न ठिकाणी करार केलेले असल्याने काही अपवाद सोडता बहुतेक ठिकाणी काँग्रेस उमेदवार आणि विरोधी उमेदवार असे सरळ सामनेच होणार आहेत.

काँग्रेसवर सतत होत असलेले भ्रष्टाचाराचे आरोप, काँग्रेस नेत्यांतील उघड मारामाऱ्या यांमुळे ओरिसातील काँग्रेसविषयी लोकांचे मन विटलेले असले तरी गेल्या तीन वर्षांत ओरिसात ज्या ज्या पोटनिवडणुकी झाल्या त्यांपैकी एक सोडून बाकीच्या सर्व निवडणुकींमध्ये काँग्रेसनेच आघाडी मारली, एवढेच नव्हे तर मतदार-संघातील आपली टक्केवारीही काँग्रेसने वाढविल्याचे दिसून आले. या सर्व जागा पूर्वीही काँग्रेसच्या होत्या, पण जनमताचे वारे आमच्याच दिशेने वाहते आहे हे काँग्रेसचे म्हणणे त्यावरून खरे ठरते.

एवढी एक गोष्ट सोडली तर काँग्रेसला या राज्यात फारशा अनुकूल गोष्टी नाहीत. विरोधकांच्या हिशेबाप्रमाणे ते एकूण ९० जागा मिळवतील हा शोधही खूपच अतिशयोक्तीचा वाटला, तरी काँग्रेस गाफील राहिली तर या राज्यात तिचे भविष्य काळेकुट्ट आहे हे स्पष्ट आहे. □

## खास वार्तापत्रे

# कोल्हापूर : दुखावलेली अस्मिता

कोल्हापूर शहराची विधानसभेची जागा ही परंपरागत रीतीने विरोधी पक्षांकडे चालत आलेली आहे. गेल्या तीनही सार्वत्रिक निवडणुकांत विरोधकांनी आपला हा बालेकिल्ला काँग्रेसच्या हाती जाऊ दिला नाही. आता या वेळी कोल्हापूरच्या या परंपरागत विरोधाला आणखी नवीनच धार चढली आहे. त्याला कारण आहे, कोल्हापूरच्या महाराणी विजयमाला यांची हातकणंगले मतदारसंघातून लोकसभेसाठी उमेदवारी.

काँग्रेसचे अधिकृत उमेदवार सेवानिवृत्त लेफ्टनंट जनरल शंकरराव पांडुरंगराव पाटील, थोरात विरुद्ध संपूर्ण महाराष्ट्र समितीचा संपूर्ण पाठिंबा असलेल्या आणि कोल्हापुरी जनतेच्या निस्सीम आदराचे स्थान असलेल्या महाराणी विजयमाला यांच्यांतील ही लोकसभेची लढत अनेक अर्थांनी गाजणार आहे. एक म्हणजे महाराणीसाहेब खुद्द प्रथमच निवडणूक लढवून अखिल भारतीय राजकारणात प्रवेश करीत आहेत. दुसरे म्हणजे महाराणी निवडणुकीला उभ्या आहेत त्या कोल्हापूरच्या छत्रपतीच्या गादीच्या वारशाचा प्रश्न धसाला लावण्याच्या इराद्याने. सध्याच्या शहाजीराजांनी महाराणीसाहेबांच्या सावत्र कन्या पद्माराजे यांना डावलून आणि कोल्हापूरच्या जनतेच्या इच्छेविरुद्ध जाऊन बाहेरच्या नागपूरकर भोसले घराण्यातील दत्तक घेतला. हा कोल्हापूरच्या गादीवर अन्याय झाला असे लोकांना वाटते. या प्रश्नावर त्यांच्या भावना फार तीव्र आहेत. हा अन्याय दूर करण्यासाठी जनतेने आपणहून तीव्र लढे दिलेले आहेत. त्यामुळे कोल्हापूरच्या जनतेची अपरंपार

# निवडणूक १९६७

## माणूस प्रतिनिधी

निष्ठा, सहानुभूती आणि प्रेम हे विजयमाला राणी-साहेबांकडे आहे हे निश्चित.

आणि ही निवडणूक गाजण्याचे तिसरे कारण म्हणजे स्वत: ले. ज. शंकरराव थोरात. प्रत्यक्ष आघाड्यांवर जोखमीच्या कामगिऱ्या बजाविणाऱ्या भारतीय रणकुशल सेनानींमध्ये त्यांची गणना होते. दुसऱ्या महायुद्धात आणि कोरियन युद्धात त्यांनी गाजविलेल्या शौर्यामुळे आंतरराष्ट्रीय क्षेत्रात त्यांचे नाव चमकले. या सार्वत्रिक निवडणुकीत भारताच्या इतिहासात प्रथमच चार बडे सेवानिवृत्त अधिकारी उतरले आहेत आणि त्या सर्वांमध्ये जन. थोरातांचा हुद्दा आणि अनुभव मोठा आहे. त्यामुळे अखिल भारताचे लक्ष या निवडणुकीकडे वळणार हे निश्चित.

अशा रीतीने हा सामना गाजणार असला तरी कुठल्याही संकेतांचा अथवा व्यक्तीचा अधिक्षेप न करता वस्तुनिष्ठपणे असे म्हणता येईल की, या निवडणुकीचा निकालही जवळ जवळ आधीच ठरल्यासारखा आहे. जन. थोरातांची थोरवी, त्यांचे गुण, अनुभव, राष्ट्राला होऊ शकणारा त्यांचा उपयोग हे सर्वांना निर्विवादपणे मान्य आहे. ते जर अपक्ष उभे राहिले असते तर बिनविरोध निवडून आले असते किंवा काँग्रेसतर्फे उभे राहूनही त्यांच्याविरुद्ध दुसरा कोणताही मातब्बर उमेदवार असता तरी ते निवडून येण्यास काहीच हरकत नव्हती, असे कोल्हापुरातल्या जाणकार निरीक्षकांचे मत आहे. पण छत्रपतींच्या वारशाचा प्रश्न धसास लावण्याच्या इराद्याने प्रत्यक्ष महाराणीसाहेबच त्यांच्या

विरोधात खड्या झाल्या तेव्हा बोलणेच खुंटले.

कारणे उघड आहेत. जनतेचे राजघराण्यावरील प्रेम, प्रत्यक्ष राणीसाहेबांबद्दल मातेप्रमाणे श्रद्धा आणि वारसा प्रश्नावरील तीव्र भावना. या प्रश्नावरील जनतेच्या भावनेचा महाराणीसाहेबांचे प्रचारक आणि संपूर्ण महाराष्ट्र समिती पुरेपूर उपयोग करून घेत आहेत.

आपल्या आठ पानी निवडणूक निवेदनात महाराणींनी केवळ याच मुद्यावर आपण या निवडणुकीत का भर देत आहोत याचे तपशीलवार विवेचन केले आहे आणि झालेला अन्याय दूर करण्यासाठीच आपण निवडणुकीत उभ्या आहोत हे स्पष्ट केले आहे.

महाराणींच्याबद्दल आणि छत्रपतींच्या गादीबद्दल जनतेत केवढे अलोट प्रेम आहे हे महाराणी ज्या ज्या वेळी निवडणूक सभांसाठी खेड्यापाड्यांतून जात त्या वेळी दिसून येई. गावोगावचे लोक हजारोंनी महाराणींच्या दर्शनार्थ अक्षरश: धावत येतात. प्रचंड मिरवणुका काढून त्यांचे स्वागत करतात. आणि महाराणींचे दर्शन झाले एवढ्यावर स्वत:ला धन्य मानतात. परंपरागतरीतीने काँग्रेसचा प्रचार करणारी मंडळीही राणीसाहेबांच्या दर्शनाने दिपून जातात. त्यामुळे राणीसाहेब निवडणुकी-साठी उभ्या राहताच अनेकांची मते ठरून गेल्यासारखी झाली. म्हणूनच राणी-साहेबांचे प्रचारक आत्मविश्वासाने सांगतात, " राणीसाहेब तर जिंकतीलच. पण त्यांच्या मतांची टक्केवारी साऱ्या भारतात सर्वोच्च असावी, असा आमचा प्रयत्न आहे. "

लेफ्ट. जन. थोरात यांनी हातकणंगले मतदारसंघातून उभे राहण्याचा निर्णय घेतला त्या वेळी त्यांना आपल्या विरोधात महाराणीसाहेब उभ्या राहतील याची कल्पना नसावी. नसावीच. कारण " काँग्रेसजवळ मातब्बर उमेदवार नव्हता म्हणून यशवंतराव चव्हाणांनी जन. थोरातांसारख्या थोर सेनानीला लोकमत खेचून आणण्या-साठी उभे केले. राणीसाहेबांनी उभे राहून यशवंतरावांना काटशह दिला आहे, " असे समितीचे नेते श्री. एस्. एम्. जोशीच कोल्हापूरला झालेल्या बिंदू चौकातील सभेत म्हणाले होते.

जन. थोरातांची भूमिका सरळ आहे. " छत्रपतींच्या गादीबद्दल व व्यक्तिश: महा-राणीसाहेबांबद्दल मला नितांत आदर आहे व सदैव राहील. पण दत्तकासारखा प्रश्न सोडविण्यासाठी अन्य मार्ग उपलब्ध असताना लोकसभेचा उपयोग करणे किती श्रेयस्कर आहे हे मतदारांनीच ठरवावे, " असे ते म्हणतात. " ज्याने युद्धशास्त्राचा व युद्धनीतीचा अभ्यास केलेला आहे व ज्याला लढाईचा प्रत्यक्ष अनुभव आहे असा एखादा तरी जनतेचा प्रतिनिधी लोकसभेत असावा, " असे त्यांना वाटते.

लेफ्ट. जन. थोरातांप्रमाणेच सेवानिवृत्त मेजर जन. राजेंद्रसिंह हे पंजाबमधील गुरुदासपूर लोकसभा मतदारसंघातून, सेवानिवृत्त मेजर जन. स्वरूपसिंह कलन हे

हरियानातील लोकसभा मतदारसंघातून आणि सेवानिवृत्त मेजर जन. जयसिंह हे पंजाबमधील एका विधानसभा मतदारसंघातून निवडणुका लढवीत आहेत. सेवानिवृत्त लष्करी अधिकारी निवडणुकीत भाग घेत आहेत, हा भारतातील पहिलाच प्रसंग.

" त्यात गैर काय आहे ?"–ले. ज. शंकरराव थोरात यासंबंधी ' माणूस ' प्रतिनिधीशी बोलताना म्हणाले. निवडणुकीच्या राजकारणात पडण्यामध्ये आपला हेतू काय, असा प्रश्न प्रतिनिधीने विचारला होता. जन. थोरात म्हणाले, "भारतावर दोन आक्रमणे झाली. ही आक्रमणे झालीत याला कारणे आहेत. ती कारणे दूर केली गेलीत का ? अद्यापपर्यंत तरी नाहीत. त्यामुळे आणखी आक्रमण होण्याचा धोका आहे. सेवानिवृत्तीनंतर अत्यंत आरामात उरलेले आयुष्य घालविण्याचा पर्याय माझ्यापुढे होता. पण मला असं वाटतं की उरलेल्या आयुष्याचा चांगला उपयोग करायचा असेल तर माणसाने आपला वेळ देशसेवेस वाहावा. आमच्यासारख्या लष्करी अधिकाऱ्यांना राजकारण ठाऊक नसेल, पण आम्हांला युद्धशास्त्राविषयी आणि प्रत्यक्ष युद्धाविषयी काही माहिती आहे ना ?

–" प्रत्यक्ष लढाईच्या वेळी जर देशाने आम्हांला हाक दिली तर धावून जाण्यात आम्हांला आनंदच वाटेल. पण तोवर आम्ही काय करायचं ?"

" सर्वसामान्य जनतेला आम्ही संरक्षणाविषयी शिकवू शकतो. आपल्या जनतेतील संरक्षणाची भावना आम्ही जागृत ठेवू शकतो. "

" आणि हे कार्य आम्ही विधानसभा, लोकसभा आणि लोकप्रतिनिधींच्या इतर संस्था यांच्यांतून प्रभावीपणे करू शकतो. तेच करण्याचा माझा प्रयत्न आहे–"

**प्रश्न :** सेवानिवृत्त अधिकारी निवडून आल्यानंतर त्यांच्यापेक्षा वरिष्ठ अधिकारी पुढे त्यांच्या हाताखाली येण्याची शक्यता नसते का ?

**जन. थोरात :** तसा संभव कमी असतो. पण त्याला इलाज नाही.

**प्रश्न :** आणि तसा प्रसंग आला तर ते बऱ्याच दृष्टींनी विचित्र आणि कामाच्या दृष्टीने गैरसोयीचे ठरणार नाही काय ?

**जन. थोरात :** लोक जेव्हा एखाद्या सेवानिवृत्त लष्करी अधिकाऱ्याला किंवा नागरी अधिकाऱ्याला निवडून देतात, तेव्हा त्याने एका नव्या क्षेत्रात प्रवेश केलेला असतो. या नव्या क्षेत्रात जर त्याला पूर्वी वरिष्ठ असणाऱ्या अधिकाऱ्यांना त्याच्या हाताखाली काम करावे लागले तर त्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पूर्वी तो त्यांना कनिष्ठ होता हे विसरून जाऊन तो आता लोकांनी निवडून दिलेला प्रतिनिधी आहे हे त्यांनी ध्यानात धरावे आणि त्याप्रमाणे त्याच्याशी वर्तन करावे. निवडून आलेला हा प्रतिनिधी शाहणा असेल तर पूर्वीच्या आपल्या वरिष्ठांचा तो योग्य तो मान राखून संघर्ष टाळू शकेल. अनेक राष्ट्रांत असे होतेच.

**प्रश्न :** सेवानिवृत्त लष्करी अधिकाऱ्यांना निवडणुकीत व राजकारणात भाग घेण्याचे प्रोत्साहन देण्याचे कांग्रेस पक्षाचे नवे धोरण आहे काय ?

**जन. थोरात** : त्यासंबंधी मला काही माहिती नाही. परंतु मला वाटते तसे धोरण असावयास हवे. किंबहुना राष्ट्राचे हित चिंतणाऱ्या राष्ट्रीय प्रवृत्तीच्या साऱ्याच चांगल्या (चांगल्या या शब्दावर माझा जोर आहे) राजकीय पक्षांनी सेवानिवृत्त लष्करी अधिकाऱ्यांना राजकारणात भाग घेण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे.

सेवानिवृत्त लष्करी अधिकारी राजकारणात आले तर ते राजकारणाला एक नवी शिस्त लावू शकतील, असे जन. थोरात यांना वाटते. ते म्हणतात, " आम्हांपैकी सर्वांना आमच्यापैकी जे जे म्हणून आपल्यात चांगले आहे ते ते सर्व देशाला द्यावेसे वाटते. इतरांपाशी आम्ही अधिक शिस्तबद्ध आहोत हे निश्चित. जे इतरांना नाही ते संरक्षणाचे विशेष ज्ञान आमच्यापाशी आहे. हे सर्व आम्हांला देशाला द्यायचे असेल तर त्यासाठी राजकारणात पडायला नको का ?"

लष्करी अधिकाऱ्याचा आणि जनतेचा संस्कृतिक संबंध सध्या फार कमी येतो असे सांगून जन. थोरात म्हणाले, " लोकांनी आम्हांला राष्ट्रीय सेना असं समजून आमच्यांत मुक्तपणे मिसळायला हवं आणि आम्हीही लोकांत मिसळायला हवं. लष्कर आणि जनता यांच्यांतील सध्याचा दुरावा कमी व्हावा असं मला वाटतं. "

**प्रश्न** :–सध्याच्या शासनात अतिशय बेशिस्त आणि अकार्यक्षमता माजली आहे असे काँग्रेसमधलेच काही मोठे नेते म्हणतात. सेवानिवृत्त लष्करी अधिकारी शासनात आले तर तेही परिस्थिती सुधारू शकतील का ?

**जन. थोरात** :– असं कोण म्हणतात हे मला माहीत नाही. परंतु लष्कर आणि पब्लिक सर्व्हिस कमिशन यांमधील माझ्या अनुभवावरून देशात सध्यातरी तशी फारशी परिस्थिती नाही असं वाटतं.

निवडणूक लढविण्याबाबतचा जन. थोरात यांचा अनुभव नवीनच आहे. पण लष्करी शिस्तीत त्यांनी आपला निवडणूक प्रचार पद्धतशीरपणे सुरू केला आहे. ते म्हणतात " मी काही या ग्रामीण लोकांना नवखा नाही. मीही स्वतः त्यांच्यामधूनच वर आलेलो आहे."

वैयक्तिक शौर्यासाठी जन. थोरात यांना डिस्टिंग्विश्ड सर्व्हिस मेडल व अशोक चक्र दुसरा विभाग आणि कोरियामधील कामगिरीसाठी पद्मश्री हे किताब मिळाले होते. दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीला हे तिन्ही किताब मिळालेले नाहीत.

अशा या दोन्ही अखिल भारतीय कीर्तीच्या व्यक्ती दोन वेगवेगळे महत्त्वाचे प्रश्न घेऊन निवडणुकीच्या आखाड्यात सर्वांचे लक्ष वेधून घेणारी लढत देत आहेत. महाराणीसाहेबांचे म्हणणे आहे की, छत्रपतींवरील अन्याय दूर करण्यासाठी काँग्रेसला पाडलेच पाहिजे आणि जन. थोरात यांचे म्हणणे आहे की आजच्या घडीला आपल्या देशाला अंतिम हिताच्या दृष्टीने काय आहे हे लोकांनीच ठरवावे.

महाराणीसाहेबांच्या लोकप्रियतेचा फायदा त्यांना पाठिंबा दिल्याने संपूर्ण महाराष्ट्र समितीलाही मिळत आहे. राणीसाहेबांच्या प्रचाराचा परिणाम विधान-

सभांच्या मतदारसंघांवरही होणार आणि त्यांच्या हातकणंगले लोकसभा मतदार-संघाच्या अंतर्गत असलेल्या विरोधी विधानसभा उमेदवारांच्या प्रचारालाही त्यामुळे जोर चढत आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील ११ विधानसभांच्या आणि दोन लोकसभेच्या जागां-पैकी राणीसाहेबांची लोकसभेची आणि शे. का. पक्षाचे समितीतर्फे उभे राहिलेले आणि गेल्या तीन निवडणुकांत सातत्याने विजयी झालेले त्र्यं. सी. कारखानीस यांची विधानसभेची, या दोन जागांचा वेगळा विचार करण्याची आता गरज नाही. महाराणीसाहेबांच्या हातकणंगले लोकसभा मतदारसंघात राधानगरी, पन्हाळा, शाहूवाडी, वडगाव, हातकणंगले आणि शिरोळ हे सहा मतदारसंघ येतात.

त्यांपैकी पन्हाळा मतदारसंघातून समितीतर्फे उभे राहिलेले. शे. का. पक्षाचे श्री. एस्. डी. पाटील हे सध्याचे आमदार आहेत. त्यांची आपल्या मतदारसंघात चांगली पकड आहे. शिवाय काँग्रेसने तेथे उभे केलेले उमेदवार डी. वाय. पाटील हे बाहेरचे म्हणून त्यांच्याविषयी काँग्रेसमध्येच नाराजी आहे. त्यामुळे जिल्ह्यातील ही तिसरी जागा मिळवण्याची विरोधकांना खात्री आहे.

समितीचे उमेदवार जिथे जोराची लढत देऊन विजय मिळविण्याची आशा धरून आहेत अशा विधानसभेच्या आणखी दोन जागा म्हणजे शिरोळ आणि हात-कणंगलें. पैकी शिरोळची लढाई भलतीच गाजणार असे दिसते. सध्याचे आमदार श्री. रत्नापा कुंभार विरुद्ध एक जबरदस्त अपक्ष उमेदवार श्री. सा. रे. पाटील असा हा सामना आहे. श्री. कुंभार यांचे सहकारी क्षेत्रातील काम, स्वातंत्र्य चळ-वळीतील कामगिरी, काँग्रेसमधील त्यांची एकेकाळची बंडखोरी यामुळे त्यांना स्वतंत्र व्यक्तित्त्व आहे. छत्रपतींच्या वारशाच्या प्रश्नात ते विजयमाला राणीसाहे-बांच्याच बरोबर. राणीसाहेबांचा प्रचार आहे अर्थातच श्री. सा. रे. पाटील यांच्या बाजूने. त्यामुळे श्री. कुंभार यांची पंचाईत झाली आहे. खुद्द पद्माराजे साहाय्यक समितीत कुंभार गटाची मंडळी आहेत. त्यामुळे त्यांच्याच गटातील काही मंडळी समितीला साहाय्य करीत आहेत, असे काहीजणांना वाटते. शिवाय स्वतः श्री. पाटील यांची या भागातील कामगिरी आणि लोकप्रियता मोठी आहे. त्यामुळे हा सामना अटीतटीचाच होणार.

हातकणंगले मतदारसंघातही समितीतर्फे उभे असलेले डावे कम्युनिस्ट श्री. एस. पी. पाटील, काँग्रसचे बाबासाहेब खंजिरे यांना चांगले प्रतिस्पर्धी आहेत. इचलकरंजीच्या गिरणी कामगारांमध्ये यांचे चांगले काम आहे. शिवाय श्री. खंजिरे यांचा गट व श्री. कुंभार यांचा गट यांच्यांत संघर्ष आहे. पूर्वी काँग्रेसमध्ये असलेले चंदूरकर पाटील, कुंभार गटातील. तेही याच जागेसाठी उभे आहेत. काँग्रेसमधील या अंतर्गत दुहीमुळे श्री. एस्. पी. पाटील चांगली टक्कर देऊ शक-तील असे वाटते.

अशा या चार विधानसभांच्या जागांच्या बाबतीत आणि राणीसाहेबांच्या बाबतीत समितीला विशेष आशा आहेत. उरलेल्या जागांमध्ये विशेष आशा नाही. खुद्द कोल्हापूरची लोकसभेची जागा तर कॉंग्रेसची ठरलीच आहे.

कोल्हापूर कॉंग्रेसचे दुःख हे आहे की, कोल्हापूर जिल्ह्यामधून एकही मंत्री वा उपमंत्रीही नाही. त्यामुळेच आपण दुर्लक्षिले जात असल्याची भावना कोल्हापुरात आहे. कोल्हापूरचे राजकारण मूलतः विरोधी असल्यामुळे हे कदाचित असेल. कोल्हापूर कॉंग्रेसही तशी विशेष सामर्थ्यवान नाही. कॉंग्रेसमध्ये रत्नाप्पा कुंभारांसारखी बलवान मंडळी आहेत. पण अंतर्गत भांडणामुळे कोल्हापूर कॉंग्रेस वरपर्यंत आपला आवाज उठवू शकत नाही हे खरे.

कोल्हापूर जिल्ह्यात नाव घेण्यासारखा विरोधी पक्ष म्हणजे शेतकरी कामकरी पक्ष. सध्याच्या विधानसभेत पन्हाळा आणि कोल्हापूरच्या जागा शे. का. पक्षाच्या ताब्यात आहेत. आणि जिल्ह्यातील विधानसभेच्या अकरा जागांपैकी समितीने पाच जागा शे. का. पक्षाला दिल्या आहेत. यावरूनही शे. का. पक्षाच्या ताकदीची कल्पना येते. इतर पक्षांना म्हणण्यासारखा जोर नाही. कम्युनिस्ट, लाल निशाण गट, सं. सो. पा. यांचे कुठे कुठे बालेकिल्ले आहेत. पण सरसकट जोर कुणाचाच नाही. जनसंघाने जिल्ह्यात सर्वत्र उमेदवार उभे केले आहेत. पण बहुधा कुणाचीच डिपॉझिट्स् वाचणार नाहीत. परंतु सामान्यतः डाव्यांचा जोर असलेल्या या जिल्ह्यात जनसंघाने केलेली एक कामगिरी विरोधकही कौतुकाने कबूल करतात. वाकीघोळच्या दुष्काळाच्या वेळी जनसंघाने त्या प्रश्नावर रान उठविण्यात चांगलेच यश मिळवले. वाकीघोळ खोऱ्यातल्या लंगोटी लावणाऱ्या कातकऱ्यांना जनसंघाने मिरवणुकीसाठी कोल्हापुरात आणले ही त्यांची मोठी कामगिरी समजतात.

# सातारा : मानपानाचे बंड

यशवंतराव चव्हाणांसारख्या ज्येष्ठ नेत्याला महाबळेश्वरच्या कॉंग्रेस शिबिरात मालोजीराजे निंबाळकरांची जाहीर माफी मागावी लागली यातच कॉंग्रेसला सातारा जिल्ह्यात यशवंतरावांच्या घरातच—बंडखोरांकडून किती जबरदस्त हादरा बसलेला आहे, हे स्पष्ट होते. वास्तविक सातारा जिल्हा हा कॉंग्रेसचा खऱ्या अर्थाने बालेकिल्ला. केंद्रीय गृहमंत्री यशवंतराव चव्हाण, केंद्रीय उपमंत्री आनंदराव चव्हाण, गृहमंत्री बाळासाहेब

देसाई, उपमंत्री दादासाहेब जगताप व यशवंतराव मोहिते एवढे मोठे काँग्रेसचे पुढारी पण या जिल्ह्याला लाभलेले. इथल्या काँग्रेसच्या किल्ल्याचे बुरूज जणू पोलादी वाटत होते. पण ते आता आतूनच वाळवीने पोखरल्यासारखे होऊन आपोआप ढासळून पडू लागले आहेत. ज्या सातारा जिल्ह्यात विरोधी पक्षांतले लोक समारंभाने काँग्रेसमध्ये प्रवेश करीत होते, त्याच ठिकाणी ते आता समारंभाने बाहेर पडू लागले आहेत आणि काँग्रेसविरुद्धच दंड थोपटून निवडणुकीच्या आखाड्यात उतरू लागले आहेत.

सातारा काँग्रेसमधील या निवडणूकपूर्व बंडखोरीमुळे साताऱ्यातील निवडणुकांना मात्र यंदा खराखुरा रंग भरणार आहे. नाही तर सातारा जिल्ह्यातील कुठलीही निवडणूक कशी शांत, कुठल्याही तऱ्हेची खळबळ न माजता व्हायची. काँग्रेसने उमेदवार उभा करायचा आणि तो निवडून यायचा हे ठरलेले. जोरदार चुरस, धमाल प्रचार ही भानगडच नाही. सारेच विरोधी पक्ष थंड आणि निर्जीव. या बंडखोरीमुळे सातारा जिल्ह्यातील राजकारणात गतिमानता आली आहे हे निश्चित.

बंडखोरीला वाचा फोडली ती फलटणचे राजे मालोजीराव निंबाळकर यांनी. आतापर्यंत सातारा काँग्रेसमधील असंतुष्ट गट दबकून होते. वैयक्तिक अन्याय झाला, गटबाजी झाली तरी ते सहन करीत होते. पण या वेळी स्वत: राजे निंबाळकरांनीच असंतोषाला तोंड फोडल्यामुळे ठिकठिकाणच्या असंतुष्टांना जरा धीर आला. ज्यांच्यात ताकद होती तेही हळूहळू बोलू लागले. आणि शेवटी काही निवडणुकीच्या आखाड्यातही उतरले आणि काहींनी सरळ विरोधी प्रचारही सुरु केला.

वैयक्तिक गटबाजी, मानापमानाची दुखणी, आपली माणसेच पुढे आणण्याच्या प्रयत्नात इतरांवर झालेला अन्याय हीच इतर ठिकाणांप्रमाणे इथली काँग्रेस बंडखोरीची कारणे. यशवंतराव चव्हाणांच्या सातारा लोकसभा मतदारसंघातच बंडखोरी प्रभावाने आहे. याला कारण यशवंतरावांना या वेळी कार्यकर्त्यांची नाडी बघायला वेळ मिळाला नाही असे लोक सांगतात. किसनवीर पाटलांवर तिकीट-वाटपाचे काम सोपवून ते दिल्लीला निघून गेले आणि तिकीट वाटपाचे काम किसनरावांना नि:पक्षपातीपणे काही जमले नाही व त्यामुळे बऱ्याच प्रामाणिक काँग्रेस कार्यकर्त्यांवर अन्याय झालेला आहे असे काँग्रेस कार्यकर्ते नाराजीने सांगतात. परवा यशवंतराव साताऱ्यात येऊन गेले तेव्हा त्यांच्या सभांना अभावानेच जमलेली गर्दी या नाराजीची साक्ष देत होती.

सातारा लोकसभा मतदारसंघांतर्गत असलेल्या फलटण, वाई, सातारा आणि माण या विधानसभा मतदारसंघात काँग्रेसचे बंडखोर उमेदवार उभे आहेत. या बंडखोराच्या ताकदीवरच काँग्रेसला काही ठिकाणी पराभूत करण्याची समितीला आशा आहे. दु:ख एवढेच, की हे बंडखोर सात्त्विक कारणासाठी एक पक्का गट

म्हणून कॉंग्रेसबाहेर पडले नसून वैयक्तिक भांडणामुळे केवळ अलंकारिक विरोधासाठी एकेकटे बाहेर फुटले आहेत. त्यामुळे एकदा निवडून आल्यानंतर त्यांची बंडखोरी कितपत टिकेल याविषयी विरोधकांना शंकाच आहे. निवडून आलेले बंडखोर विरोधकांच्या तोंडांना पाने पुसून केव्हा परत कॉंग्रेसमध्ये जातील याचा नेम नाही. परंतु तोवर तरी त्यांचा उपयोग करून कॉंग्रेसला पाडावे अशी समितीची भूमिका आहे.

सातारा लोकसभा मतदारसंघात सातारा, वाई, खटाव, माण (राखीव), फलटण व कोरेगाव हे मतदारसंघ येतात तर कराड लोकसभा मतदारसंघात उत्तर व दक्षिण कराड, पाटण व जावळी आणि सांगली जिल्ह्यातील शिराळा व वाळवा एवढे विधानसभा मतदारसंघ येतात.

पैकी कऱ्हाड लोकसभा आणि अंतर्गत विधानसभा मतदारसंघातील निवडणुकांमध्ये विशेष रंग भरण्याचा संभव नाही. बाळासाहेब देसाई यांनी आपल्या पाटण मतदारसंघात, यशवंतराव मोहित्यांनी कराडमध्ये भरपूर काम करून लोकांना खूष ठेवले आहे. लोकसभेचे आनंदराव चव्हाणही आपले वजन टिकवून आहेत त्यामुळे या सर्वच ठिकाणी कॉंग्रेसला विशेष त्रास पडणार नाही. कॉंग्रेसला खऱ्या झटापटी कराव्या लागणार त्या साताऱ्यातच. आणि तेथील सहा जागांपैकी तीन ते चार जागा न गमविण्यासाठी कॉंग्रेसला कमालीचे कष्ट घ्यावे लागतील हे उघड आहे आणि कष्ट घेऊनही कॉंग्रेस सर्वच ठिकाणी यशस्वी होईल याविषयी खात्री नाही.

कॉंग्रेसने जवळ जवळ आशा सोडावी अशी जागा म्हणजे फलटणची. मालोजीराव निंबाळकरांचे चिरंजीव शिवाजीराव तेथून बंडखोर कॉंग्रेस उमेदवार म्हणून उभे आहेत. समितीचा एक उमेदवार फलटणमधून उभा आहे. पण समितीतील बऱ्याच लोकांचा पाठिंबा निंबाळकरांना आहे. फलटणमध्ये मालोजीराव निंबाळकरांचे खूप अनुयायी आहेत. त्यांचा प्रभाव किती जबरदस्त आहे हे माफी मागण्याची पाळी यशवंतराव चव्हाणांवर यावी यावरून समजते. शिवाजीराव निंबाळकर हे तरुण असून श्रीराम सहकारी साखर कारखान्याचे ते संचालक आहेत. प्रत्यक्ष राजकारणाच्या धकाधकीत ते आतापर्यंत पडले नव्हते. त्यांच्याविषयी वाईट असे कुणाचे मत नाही. त्यामुळे येत्या निवडणुकीत कॉंग्रेसचे उमेदवार प्रा. कृष्णचंद्र मोहिते यांचा पराभव करून ते निश्चितपणे निवडून येतील अशी अनेकांची खात्री आहे.

सातारा भागातील कॉंग्रेसची डोकेदुखी झालेली दुसरी जागा म्हणजे वाईची. गेल्या तीनही निवडणुकांत विजयी झालेले दादासाहेब जगताप हे बंडखोर उमेदवार समितीच्या पाठिंब्यावर येथून उभे आहेत. श्री. जगताप तसे समितीला जवळचे. १९५२ साली ते शे. का. प. तर्फे निवडून आले. १९५२ साली संयुक्त महाराष्ट्र

समितीतर्फे विजयी झाले. १९६० साली मात्र काँग्रेसुच्या समाजवादाच्या आणाभाकांनी आकर्षित होऊन जे डावे लोक काँग्रेसमध्ये ओढले गेले त्यांमध्ये जगतापही होते. १९६२ ची लढाई त्यांनी काँग्रेसच्या बाजूने जिंकली. या वेळी तिकीट-वाटपाचे वेळी त्यांच्या हातावर तुरी ठेवण्यात आली तेव्हा अपमानित होऊन ते बाहेर आले. शे. का. पक्षातून आल्याने आणि गेली पंधरा वर्षे मतदारांशी त्यांनी सतत निकटचा संपर्क ठेवल्याने त्यांना याही वेळी मतदार आपल्या दगा देणार नाहीत याची खात्री आहे.

श्री. जगताप यांना डावलून ज्यांना काँग्रेसने तिकीट दिले ते श्री. भोसले हे आपल्याला मतदारसंघात जवळ जवळ अपरिचित आहेत. त्यामुळे श्री. जगताप यांची बाजू अधिक पक्की झाल्यासारखी वाटते.

माण येथील राखीव जागेत बंडखोर काँग्रेसचा एक उमेदवार उभा असला तरी समितीचे उमेदवार अॅड. श्री. गं. बा. माने हे काँग्रेसला चांगली टक्कर देऊ शकतील. इथले बहुसंख्य मतदार हरिजन आणि तत्सम वर्गातील आहेत. श्री. माने हे रिपब्लिकन पक्षाचे चांगले कार्यकर्ते असून आपल्या मतदारांत ते लोकप्रिय आहेत. काँग्रेसचा माणमधील उमेदवार म्हणजे डॉ. कु. प्रभावती सोनावणे. डॉ. सोनावणे या मुंबईच्या आहेत. आतापर्यंत माण मतदारसंघावर काँग्रेसने बाहेरचेच उमेदवार लादले आहेत. राखीव मतदारसंघ असल्याने कुणीही उभे केले तरी निवडून येईल ही काँग्रेसची खात्री. पण त्यामुळे या बाहेरच्या उमेदवारांचे या तालुक्याकडे दुर्लक्ष झालेले आहे. सबंध सातारा जिल्ह्यात माण तालुक्याएवढा मागासलेला आणि उपेक्षित जिल्हा नाही. जिल्ह्यातील खेड्यापाड्यांमधून कोयनेची वीज आलेली आहे. पण माण तालुक्यातल्या एकाही गावात वीज नाही. कोणत्याही धरणाचा फायदा या तालुक्याला मिळत नाही. त्यामुळे लोक नाराज आहेत. शिवाय डॉ. सोनावणे यांच्यापेक्षा अॅडव्होकेट माने हे तेथील लोकांना अधिक जवळचे आहेत. श्री. माने हे दोन वर्षे फलटण नगरपालिकेचे अध्यक्ष होते. त्या काळातील त्यांच्या चोख कार्याची जनतेत जाणीव आहे. हरिजनांची शेतीसुधारणा चळवळ आणि हरिजनांचे इतर प्रश्न यांमध्ये त्यांनी सक्रीय भाग घेऊन या भागात बरीच लोकप्रियता मिळवली असल्याने त्यांच्याही जागेबाबत विरोधकांना बरीच आशा आहे.

समितीतर्फे उभे असलेले संयुक्त समाजवादी पक्षाचे डॉ. अण्णासाहेब देशपांडे हेही कोरेगाव मतदारसंघातून काँग्रेसला चांगलीच टक्कर देऊ शकतील. डॉ. देशपांडे हे काँग्रेसचे स्वातंत्र्यपूर्व काळातील कार्यकर्ते समाजवादी गट काँग्रेसमधून बाहेर पडले तेव्हा एस्. एम्. जोशी आदी समाजवाद्यांबरोबर श्री. देशपांडेही बाहेर पडले. शिवाय एक डॉक्टर या नात्याने त्यांनी आसपासच्या भागातील

[पृष्ठ ५६ वर चालू]




अथांग जनसमुदायाला छेदणारी आबांची भिरभिरती नजर स्टेजकडे वळली. नाना बोलत होता. दूर कुठेतरी उभे राहून आबा तहानलेल्या डोळ्यांची प्यास बुझवीत होते.

शेखर शिवराम पाटील

प्रहर अर्धा-प्रहर रात्र उलटली असेल नसेल, तेव्हाच आबांना जाग आली. आज चारही रात्री हे असं चाललं होतं. रात्री दूर सरणारी नीज कशीतरी आटोक्यात यायची, केव्हातरी डोळा लागायचा नि केव्हातरी लागलेला डोळा, असाच केव्हातरी खट्‌कन उघडायचा. आणि शरीर फक्त अंथरुणात लोळत पडायचं. पण मन हव्याशा वाटणाऱ्या दिवसाचा वेध घेत अंधारात घुमत घुमत राहायचं....

जागेपणीच अंथरुणावर पडल्या पडल्या, एकवार आबांनी दिवस मोजले. आजचा चौथा दिवस. म्हणजे आजची रात्र अखेरची. उद्या नाना येणार. सकाळीच आपण उठायच्या आत. आबा स्वतःशीच हसले. चार दिवसांच्या प्रतिक्षेनंतर जो दिवस उगवणार होता. त्या मोजलेल्या दिवसाच्या नुसत्या कल्पनेनं आबांच्या रखरखीत जीवनात उत्साहाचे नवजीवन संचारू लागले.

आनंदाचा एक बुडबुडा बुड बुड करीत शरीराच्या ग्रात्रा गात्रात भिनून गेला. आबांना वाटलं, असंच उठावं आणि गावच्या वेशीवर नानाच्या गोड प्रतिक्षेत उरलेली रात्र जागून काढावी. आणि ते उठलेही. अंथरुणात बसल्या बसल्या त्यांनी भिरभिर चहूकडे पाहिले.

इवलेसे घर. नाहीतरी साध्या ' दुर्कीदोन ' करणाऱ्या शाळा मास्तराचं घर. असून असून कितीसं मोठं असणार ! पण किती रेखीवपणे सजवलं होतं द्वारकेनं. कुठे धूळ नाही, कुडाकचरा नाही, की रेंगाळत पडलेलं सामानसुमान नाही. सारं कसं जिथल्या तिथं...त्या खुर्च्या, ते टेबल. ती अंधारातसुद्धा चमकणारी भांडीकुंडी आणि ती तसबीर...

दाराच्या चौकटीवर बसविलेली सोनेरी फ्रेमची तसबीर अंधारातसुद्धा आबांना स्वच्छ आणि स्पष्ट दिसली.

आबा एकटक त्या तसविरीकडे पाहत बसले. निळसर कागदावर रेखीवपणे दिसणारा नानाचा हसरा फोटो. त्याची इटुकली-मिटकुली काया नि टीचभर छातीचा तो काडी पहेलवान चिमुकल्या हातांनी हँडल धरून मोटार चालवत होता आणि आबा पाठीमागच्या सीटवर बसले होते...तो फोटो काढला तो दिवस जसाच्या तसा आबांच्या नजरेसमोर उभा राहिला.

गावदेवीच्या जत्रेला महिना राहिला होता. तेव्हापासूनच चिमुकल्या नानाने पाठीशी लकडा लावला, घरी असो वा शाळेत. एकटा दिसलो की हा शाळेत यायचा. कमरेभोवती मिठी आवळीत म्हणायचा,

" आबा, आबा. "

" काय रे ? "

" तो माझ्या वर्गातला कुलकर्ण्यांचा किशा. "

" हो, हो, आहे ठाऊक. "

" त्यानं ना कित्ती सुंदर फोटो काढलाय जत्रेत. मोटारीत बसून. आपणही काढूया ना आबा, तसला फोटो. "

" हो काढू हो, नक्कीच काढू. "

तोच हा फोटो. गावदेवीच्या जत्रेतला. आबांनी खाली झुकलेली मान वर उचलली. नवख्या माणसाचं सहज लक्ष जावं अशा तऱ्हेनं लटकवलेला तो फोटो अजूनपर्यंत होता तिथंच. तसाच होता. मध्ये खूप मोठा कालखंड मागे सरला, पुराच्या पाण्या-सारखा दिवस-रात्रीचा ओघ खळखळत निघून गेला. रेंगाळणारे दिवस वार्धक्य ठेवून गेले, संपता न संपणाऱ्या रात्री हौस घेऊन गेल्या. पण ना काही आठवणी ठेवून गेल्या, ना काही घेऊन गेल्या. त्या आल्या त्या कायमच्याच...

कसा दिसत असेल नाना? उंच, ठेंगू, सशक्त, अशक्त, का माझ्यासारखाच मध्यम काळासावळा ?

एक गोड हुरहूर आबांच्या हृदयात मावेनाशी झाली. त्याच पावली त्यांनी अंथरूण सोडले. काळोखाच्या पांघरुणात गाव गाढ निद्रेत घोरत होता. भरगच्च काळोखात ते निवांत उभे राहिले. सारं वातावरण शांत, निर्विकार होतं. मघाशी किती गल-बला माजला होता पलीकडं. सारा गाव रहाटाच्या बैलासारखा एकाच कामगिरीला जुपला होता. सफाईपासून पताका टांगण्यापर्यंतची सर्व कामं लोक हिरीरीनं करीत होते. आणि आता स्नेहपूर्ण नजरेने दूरवरच्या त्या हालचाली टिपीत बसले होते. द्वारकाही शेजारीच उभी होती. ‘ कुणासाठी ही आरास ? कोण येणार उद्या इथं ? कशासाठी हे सारं ?’ स्वतःलाच आबांनी असंख्य प्रश्न विचारले आणि ओठावरचं हसू दावत त्या रेशमी प्रश्नांचा गोफही त्यांनी स्वतःच सोडला होता. साऱ्या प्रश्नांचं उत्तर एकच ‘ उद्या नाना येणार आहे, माझा नाना येणार आहे. ’

आबांचा जीव गुदमरला. नानाच्या भेटीसाठी आतुरलेला त्यांचा आत्मा उगीचच चरफडला. कधी संपते ही रात्र, कधी येतोय माझा नाना.

वाऱ्याची एक गार झुळूक वाहत आली. पोरांनी टांगलेल्या पताका फडफडल्या. अंधारातच आबांनी उंचउंच मान केली आणि फडफडत्या पताका पाहत आबा तसेच उभे राहिले वेड्यासारखे.

पहाटेचा पहिला कोंबडा आरवला, तसे आबा शुद्धीवर आले. द्वारक अजून गाढ निद्रेतच पडली होती, दारातूनच आबांनी द्वारकेला साद घातली,

“ द्वारका ग, द्वारका. ”

“ हूं. ”

गाढ निद्रेतच द्वारका हुंकारली.

“ द्वारके, अग किती वाजले बघ ! ”

“ किती वाजले ? ”

“ अग, किती म्हणजे आता उजडलही. ऊठ, ऊठ, कशी ?”

द्वारका तडफडत जागी झाली. स्वयंपाकघरात जाऊन आबांनी खळखळा चूळ भरली, सारा प्रातर्विधी झरझर आवरून घेतला, कुठल्यातरी ट्रंकेतलं ठेवणीचं धोतर कमरेभोवती गुंडाळलं आणि अंगणात उभे राहून फिरून त्यांनी मंगलमय दिसणारा सारा गाव नजरेखाली घातला.

हळू हळू पहाट हसू लागली. घरं बोलू लागली. सारा गाव जागा झाला. उन्हं यायच्या आत पोरांची प्रभातफेरी गर्जना करीत हमरस्त्याकडे निघाली. डोळ्यात न साठवता येणाऱ्या पोराटोरांच्या त्या लांबलचक रेघेकडं पाहता पाहता आबांना वाटलं, त्या मेळाव्यात आपणही सामील व्हावं. मोठमोठ्यानं गर्जना करीत साऱ्या गावभर धावत सुटावं, आणि आघाडीवर उभे राहून खड्या आवाजात ललकारावं. . ‘ नानासाहेब झिंदाबाद. ’

नानासाहेब...

कसला विचार करता ?

गर्रकन् आबा मागे वळले, द्वारका उभी होती.

"द्वारके, जेवणाचं कुठपर्यंत आलंय ?"

"तेच विचारायचंय".

"म्हणजे अजून कशात काही नाही की काय ? खुळे, एवढचा लांबून भुके-तान्हेलेला माझा नाना येणार आहे नि तू अजून स्वस्थ ?"

"पण काय करू ?"

"म्हणजे ?"

"जेवणाचं विचारते मी !"

"अग, त्यात काय विचारायचं, नाचण्या दळलेल्या आहेत ना घरात ?"

"रात्रीच नाही का दळल्या ?"

"मग त्यांच्या सुंदरशा भाकऱ्या भाजून ठेव, आणि सोबत...सोबत खोबऱ्याची चटणी. किती चवीनं खाईल माझा नाना. आठवतं तुला लहाणपणी, सणासुदीला तुझ्या कुशीत शिरायचा आणि मान वर करून म्हणायचा, 'वहिनी, नाचण्याची भाकर केलीस तर सोवत खोबऱ्याची चटणीही कर, मग गोडधोड नाही केलेस तरी चालेल.'"

"पण..."

"पण काय ?"

"एवढा मोठा माणूस."

आबा खद्खदून हसले. हसताना बारीक होणारे त्यांचे डोळे अधिकच बारीक झाले.

"कोण मोठा, माझा नाना. वेडे, माणूस वयानं मोठं होतं. मनानं मोठं होतं. पण त्याचा घरात काय उपयोग ? त्याचं हे मोठेपण फक्त समाजात. बाहेरच्या जगात. घरातल्या वडीलधाऱ्यांना वाटतं, माझं पोर आहे तसंच आहे. लहान चिमुकलं. माझा नानाही तसाच वयानं वाढला, मनानं मोठा झाला. खप खप मोठा, जगाच्या राजकारणाचं ओझं वाहणारा मंत्री झाला. पण मला वाटतं, माझा नाना अजून आहे तसाच आहे. लहान, चिमुकला. जेवताना हट्ट करणारा, नाचणीच्या भाकरीसाठी. तुला लाडीगोडी लावणारा. जा, जा, पाहू अगोदर. जेवणाच्या तयारीला लाग. कित्येक वर्षांतून आज आम्ही एकाताटात जेवणार आहोत. लहानपणी जेवत होतो तसे पुन्हा लहान होऊन जेवणार आहोत. पाहत काय राहिलीस अशी ? खरंच, आज मला पुन्हा लहान व्हायचं आहे, नानाशी दंगामस्ती करायची आहे, त्याला खूप रडवायचं आहे, म्हणायचं आहे...

"नान्या माझी विटी दे !"

"माझी आहे ती."

"कोण सांगतोय ?"

"मी वनवली. जांभळीच्या डहाळीची. विचार पाहिजे तर आईला."

" तूच विचार. "

" मी नाही विचारणार. "

" मग मीही नाही विचारणार. ती विटी माझी आहे, आणि तो दांडू माझात्र आहे. दे नाहीतर बघ...? "

" नाही देणार. "

" नाही ? "

" नाही. "

" बघ,...बघ..."

" अस्सा बदडवला, नानाला, मी वस्स. 'आं ऽ' हूं करीत आईजवळ गेला, आणि मग आमचीही कंबक्ती भरली. द्वारके, माझा नाना आज पुन्हा परसात विटीदांडूचा डाव खेळेल. दण्कन बसणाऱ्या टोल्यांनी सूं ऽ ऽ ऽ करीत जाणारी विटी कुठल्यातरी डहाळीवर अडकून बसेल. आणि मग नाना म्हणेल,

" आबा, आबा. काढ ना रे विटी. "

" मी नाही काढणार जा. "

" आईच्या फटक्यांची आठवण होऊन मी जरा घुश्यातच म्हणेन, मग नाना लाडीगोडी लावील. कट्टीची वट्टी घेईल आणि मग..."

तव्यावर टाकलेल्या चटणीचा खमंग वास वाऱ्यावर दरवरळला. आबा सावत्र झाले. द्वारका केव्हाच गेली होती.

अनोख्या धुंदीतच ते स्वयंपाकघराकडे वळले. द्वारका कामात मग्न होती. पाठमोऱ्या द्वारकेकडे पाहत आबा क्षणभर तसेच उभे राहिले. पण मन .

" द्वारका. "

" काय ? "

" नाना कुठे गेला. "

" कलेक्टर कचेरीकडे मोर्चा जाणार आहे त्यात... "

" जाऊ दे, मरू दे, त्याला सांग सत्याग्रह, चळवळी, मोर्चे करून पोट भरेल म्हणावं. "

" त्याच्या मार्गाने जातो आहे. जाईना का. तुम्ही कशाला त्रागा करता ?"

" हो, हो मोठ्ठा मार्ग चोखंदळलाय पोट भरण्याचा. दिवे लावील अशाने. एक-दिवशी कुणाची तरी गोळी लागून मरेल तेव्हा डोळे उघडतील तुमचे. "

द्वारका मागे वळली. धोतराच्या सोग्यानं डोळे पुशीत आबा उभे होते. द्वारका बावरली, घाबरली.

" अं, हे काय ? "

" काही नाही ग. "

" तुमच्या डोळ्यांत..."

" असंच असतं द्वारका. माणूस बोलताना बोलून जातो. जिव्हारी असं काही तरी बोलून जातो, आणि धुंदी ओसरते. राग मावळतो. तेव्हा...

" नानासाहेब, झिंदाबाद. "

" नानासाहेब, झिंदाबाद. "

आबा भानावर आले, भलीमोठी मिरवणूक गावात शिरली. पुढं शाळकरी पोरं आणि मागं मोठी माणसं. अशी मिरवणूक गर्जना करीत निघाली, एकीकडे शाळकरी पोरांचे समर गीत रंगले. आणि वाद्यांच्या ठेक्यावर शब्द हवेत तरंगले, तर दुसरीकडे मोठ्यांच्या सिंहगर्जनेत सारा गाव दणदणला...कसा दिसतोय, माझा नाना ? खिडकीतूनच आबांनी बाहेर पाहिले. दोन-तीन हजारांच्या मेळाव्यात. नाना कुठेच दिसत नव्हता. आणि आबांची भिरभिरणारी नजर साऱ्या जमावाला छेदीत चौफेर फिरत होती.

कुठे आहे नाना...कुठे आहे...

आबांची उत्सुकता शिगेला पोहचली. जवळ असून दूर दूर भासणारा तो वियोग त्यांना असह्य झाला, मिरवणूक देवळाकडे वळली. तशी आबांच्या जिवाची लगबग झाली. पायात चप्पल न अडकवताच ते देवळाकडे धावले.

अथांग जनसमुदायाला छेदणारी आबांची भिरभिरती नजर स्टेजकडे वळली, आणि एका अनिवार उत्कंठेचा फुलोरा पानोपानी डंवरला.

नाना बोलत होता. कुठले तरी वीरश्रीने ओथंबलेले भाषण त्याच्या मुखातून पाझरत होते. पण आबांचे कशाकडे लक्ष नव्हते. तो काय बोलतो आहे, काय बोलत होता, हे ऐकण्याऐवजी आबा कित्येक वर्षांच्या आपल्या रखरखीत डोळ्यांनी नुसतेच पाहत होते. दूर कुठेतरी कोपऱ्यात उभे राहून तहानलेल्या डोळ्यांची प्यास बुझवीत होते.

किती बदलला होता नाना.

अद्ययावत पद्धतीचा पांढरा सदरा, खाली मॅच होणारं धोतर, नि ह्या सर्वांपेक्षा डोक्याची शुभ्र टोपी. आणि ओजस्वी खादीधारी, वस्त्रात झाकलेली त्याची रुबाबदार जाडजूड काया, निडर छाती, हातांच्या पंजाची लोखंडी कांब, अन् सर्वांना पुरून उरेल अशी झुंजार वृत्ती. असा बेडर, मोडेल, पण न वाकणारा, आबांच्या नजरेसमोर दिसू लागला. आबांना वाटलं असंच धावत जावं आणि सर्वांसमक्ष कवेत न मावणाऱ्या नानाच्या कमरेला मिठी मारावी. त्याचे केस कुरवाळावे. पटापट मुके घ्यावे. आणि पाठीवर थाप मारून म्हणावं :

" नान्या, नान्या किती मोठ्ठा झालासरे, तुला एकेरी नावानं हाक मारायला लाज वाटावी एवढा मोठ्ठा झालास. आज आई असती, तर तुझी ही दैदीप्यमान कीर्ती पाहून म्हणाली असती, नाना पांग फेडलेस रे माझे..."

आबांच्या डोळ्यात आसवं साचली. आनंदाश्रूंचे दोन थेंब सुकलेल्या गालावरून

टप्टप् खाली घसरले, कुणाला समजणार नाही अशा बेताने आबांनी डोळ्यांतले अश्रू पुसून काढले.

वीरश्रीने नाना अजून बोलत होता. ज्या देवळाच्या जागेत एके काळी रानांतून चोरून आणलेल्या चिंचा त्याने चोरून गुपचुप खाल्ल्या होत्या, ज्या देवळाच्या अंधाऱ्या गाभाऱ्यात रागावलेल्या आबांना पाहून कधीकाळी तो लपून बसला होता. त्याच देवळाच्या जीर्णोद्धारासाठी, फार मोठा मंत्री ह्या नात्यानं कोनशिला उद्घाटन करण्यास नाना आज उभा होता.

टाळ्यांचा कडकडाट झाला, 'झिंदाबाद'च्या सिंहगर्जनेत समारंभ पार पडला, लोकांचे हारतुरे घेत, हस्तांदोलने स्वीकारीत नानासाहेब आपल्या उघड्या कारकडे वळले.

आबा तेथेच उभा होता. नाना आला. समीप आला. अगदी जवळ आला......

एक दैदीप्यमान प्रकाशझोत आवेगाने पुढे सरकला. प्रकाशाच्या त्या तेजस्वी झोतात कुमकुवत डोळे अंधारले, आपल्याला काय होत आहे, हे समजण्याआधीच एक हुरहुरणारी रेघ आबांच्या छातीत घुसली. मघाशी स्फुरणारे बाहू खांद्यांसकट गळून पडले. बळ निघून गेलेल्या हाडांचा पिंजरा लटपणारे शरीर सावरीत जमिनीला खिळून राहिला.

या दैदीप्यमान झोताला कशी मिठी घालू ? कदाचित खाक झालो तर ?...... हाच का नाना ? ओळखील का आपल्याला... आणि नाही ओळखले तर...?तर...

लोकांच्या गौरवाने चिंब झालेला नाना मोटारीच्या द्वारापाशी खडा राहिला, आणि प्रश्नचिन्हाच्या बावटळीत गरगरणारे आबांचे हात मोटारीच्या द्वारावर रुतून बसले, आणि नकळत मोटारीचे द्वार खुले झाले.

" आभारी आहे. "

शुद्ध मराठी भाषेत त्यांनी आबांचे आभार मानले नि दार ओढून घेता घेता, नानासाहेब आठवल्यासारखे बोलले,

" माझं एक काम कराल का ? "

" कोणतं ? " भीतभीत आबांच्या तोंडून शब्द फुटला.

"आबांना ांगा मला उद्या परदेशच्या दौऱ्यावर जायचं आहे. मी जरा गडबडीत आहे. पुन्हा केव्हातरी असाच भेटेन म्हणावं. "

पंख तुटलेल्या पाखरासारखे आबा धाडकन् कोसळले. मोटार भरकन पुढे गेली. लोकांनी हात वर करून नानासाहेबांना निरोप दिला आणि आबा छिन्नविच्छिन्न झालेल्या काळजाची शकले सावरीत बसून राहिले. त्यांना वाटलं.

नानाचं थोबाड रंगवावं...आणि मग त्याला जवळ घेऊन सांगावं, नाना, नाना, विसरलास का रे आबाला...वेड्या पोरा तुझ्यासाठी, तुला आवडतात म्हणून, तुझ्या-वहिनीनं नाचण्याच्या भाकऱ्या भाजल्यात, सोबत खोबऱ्याची चटणी केलीय. चल...

अगोदर घरी चल, डोळ्यात प्राण आणून ती तुझी वाट प्राहत असेल रे. कित्येक वर्षांत तू माझ्या ताटात जेवला नाहीस...कित्येक वर्षांत मी माझ्या तोंडातला घास तुला भरविला नाही...आज आपण पुन्हा लहान होऊ...परसात विटीदांडूचा खेळ खेळू... क्षणात रुसू...क्षणात एक होऊ...नाना...चल, ना रे नाना. तिचे प्राण कंठाशी आले असतील...उंबरठ्यातच तिचा जीव घुटमळत असेल...चल...चल, ना रे नाना...... चल ना... ?

" नाना...ना ऽ ना..."

गळा काढून आबांनी हाक मारली, पण भलं मोठं वाकण पार करून मोटार केव्हाच दृष्टीपलीकडे गेली होती......


# " डा य मं ड "

## टॅक्सी व रिक्षा मीटर्स

भारतात सर्वप्रथम

**डायमंड क्लॉक मॅन्यु. कं. प्रा. लि.,**

११८० बुधवार पेठ, पुणे २.

## डायमंड वॉच कंपनी

**११७९ बुधवार पेठ, पुणे २.**

महाराष्ट्रातील ख्यातनाम घड्याळजी. सर्व प्रकारची घड्याळे व इन्स्टरूमेंटस् चोख दुरुस्त केली जातात.

# आणि ड्रॅगन जागा झाला

## अरुण साधू : उत्तरार्ध : लेखांक पाचवा

एक वर्षभर पराकोटीच्या हालअपेष्टा सोशीत, सुमारे सहा हजार मैल पायी तुडवून आणि पाऊण लाख स्त्री-पुरुषांना गमावून माओच्या लाल सैन्याचा ' लाँग मार्च ' संपला.

एवढी जबरदस्त किंमत देऊन माओला आणि लाल सैन्याला शेवटी काय मिळाले? हा ' लाँग मार्च ' खरोखरीच आवश्यक होता का ? लाल सैन्याला त्याशिवाय कोणताच पर्याय नव्हता ?

बऱ्याच वर्षांनंतर माओ-त्से-तुंगने एका पाश्चात्य पत्रकाराजवळ कबूल केले की, ' लाँग मार्च 'ची खरोखरच तेवढी आवश्यकता नव्हती. दुसरे पर्याय निघू शकले असते. कियांगसी सोव्हिएटविरुद्ध चँग-कै-शेकने आखलेली पाचवी निर्मूलन मोहीम पुष्कळ वगुण्यांनी भरली होती. लाल सैन्याने त्या मोहिमेला

एवढे घाबरून जाण्याचे कारण नव्हते. कोमिन्टांगचा वेढा फोडण्याचे काही मार्ग होते. वेढा फोडून कियांगसीच्या दक्षिणेला शांघाय विभागात नवे सोव्हिएट स्थापन करणे शक्य झाले असते. पण तशा तऱ्हेचा प्रयत्नच झाला नाही.

पण उगाचच आपण या 'लाँग मार्च'च्या भानगडीत पडलो, असा पश्चात्ताप मात्र माओ-त्से-तुंगला कधीच झाला नाही. "क्रांतीचा विकास सरळ मार्गाने कधीच होत नाही; दिसेल त्या मार्गाने क्रांतीला पुढे सरकावे लागते. बलाढ्य शत्रूपुढे माघार घ्यावी लागते. शत्रूच्या मर्मस्थानी हल्ले चढवावे लागतात. सहनशक्तीची खरी परीक्षा क्रांतीमध्येच लागते."

'लाँग मार्च'मुळे लाल सैन्याला एक प्रचंड अनुभव आणि भव्य इतिहास मिळाला असे माओला वाटते. एवढा अनुभव आणि एवढे शिक्षण लाल सनिकांना दुसऱ्या कोणत्याच लष्करी वा राजकीय शाळेत मिळाले नसते. शिवाय 'लाँग मार्च'च्या मार्गात सबंध चीनभर लाल सैन्याचे क्रांतिकारक प्रचारक विखुरले गेले. मार्गात ठिकठिकाणी छोट्या छोट्या गुप्त संघटना निघाल्या होत्या. खेड्यांतील शेतकऱ्यां-मध्ये कम्युनिस्टांबद्दल आपुलकी वाटणारे वाढले होते. सर्व चीनभर लाल चीनचा प्रचार झाला होता. दुसऱ्या कोणत्याही मार्गाने एवढा प्रचार होणे शक्य नव्हते.

आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे उत्तर चीनमध्ये सोव्हिएट तळ स्थापून उत्तरेकडून होत असलेल्या जपान्यांच्या आक्रमणाविरुद्ध लोकमत तयार करण्याची माओची आकांक्षा. सबंध 'लाँग मार्च'मध्ये अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही उत्तरेस शेन्सी प्रांतात आपले तळ स्थापण्यात आपण यशस्वी होऊच ही माओची श्रद्धा अढळ होती. चँग-कै-शेकच्या कोमिटांग सैन्यालाही जपान्यांशी लढायचे होते. पण कोमि-टांग सैन्य आपली ताकद कम्युनिस्टांना खच्ची करण्यासाठी वापरत होते. आणि त्या प्रयत्नात स्वतःच खच्ची होत होते. पण त्याला इलाज नव्हता आणि म्हणूनच साऱ्या चिनी जनतेचे लक्ष जपानी आक्रमणाकडे वेधण्यासाठी म्हणून माओ उत्त-रेला सरकत होता.

उत्तरेकडच्या शेन्सी प्रांतात कोमिन्टांगचा पुरेसा शिरकाव झाला नव्हता. कोमिन्टांगचे मोठे तळ तेथून दूर होते. शिवाय तेथील लष्करी सरदार 'ख्रिश्चन जनरल" फेंग-यू-सियांग" हा कम्युनिस्टांबद्दल सहानुभूती बाळगणारा होता. उत्तर शेन्सी प्रांतात त्याची एकमेव सत्ता होती. तो स्वतः कम्युनिस्ट नव्हता पण कम्यु-निस्टांची बरीच तत्त्वे त्याला आवडत होती. शेतकऱ्यांविषयी त्याला सहानुभूती होती आणि शेती सुधारणा तातडीने घडवून आणाव्यात असे त्याला वाटत होते. त्याच्या साहाय्याने तेथे सोव्हिएट तळ उभारणे शक्य झाले असते.

### 'लाँग मार्च'नंतरचा माओ

'लाँग मार्च'च्या खाणाखुणा माओच्या शरीरावरही उमटल्या होत्या. लाल सेना शेन्सी प्रांतात पोचल्या, तेव्हा तो अतिशय कृश झाला होता. 'लाँग मार्च'मध्ये तो

सारखा आजारी असायचा. खोल डोळ्यांभोवती काळी वर्तुळे जमा झाली होती. पोटाचा खूप त्रास होत होता. धूम्रपानाचे त्याला जबरदस्त व्यसन होते. पण 'मार्च 'मध्ये त्याला त्याच्या आवडत्या सिगारेटस मिळत नव्हत्या. साऱ्याच पुढाऱ्यांची आणि सैनिकांची थोड्याफार फरकाने अशीच परिस्थिती झाली होती.

जीर्ण झालेला निळा गणवेश सबंध 'मार्च 'भर माओ अंगावर घालीत असे. तो कुठलेच शस्त्र जवळ बाळगीत नव्हता. त्याच्या खिशात जुन्या चिनी काव्याची पुस्तके मात्र हटकून सापडत. 'लाँग मार्च 'च्या गडबडीतच त्याने काही कविताही लिहिल्या.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे सबंध 'लाँग मार्च 'मध्ये माओला एकही जखम झाली नाही. प्रत्यक्ष चकमकीमध्ये तो क्वचितच भाग घेत असला तरी काही काही वेळा अशा चकमकी त्याला टाळता येत नसत. पण त्याला एकही बंदुकीची गोळी लागली नाही, की कोमिन्टांग वैमानिकांनी टाकलेल्या बाँबचा एकही तुकडा त्याच्या शरीरात घुसला नाही.

माओच्या पत्नीची स्थिती मात्र चमत्कारिक झाली होती. कियांगसी सोव्हिएट स्थापण्याच्या सुमारास १९२८ साली माओने हो-त्झु-शेन या स्त्रीशी विवाह केला होता. तिच्यापासून त्याला तीन मुलेही झाली. तीही आपल्या मुलांसकट 'लाँग मार्च 'मध्ये सामील झाली होती. कठीण परिस्थितीमुळे मुलांना सांभाळणे अशक्य होऊ लागले. त्यांना सुरक्षित ठेवण्यासाठी म्हणून तिने त्यांना वाटेत काही आदिवासी कुटुंबांजवळ ठेवून दिले. पुढे या मुलांचे काय झाले, ती कुठे गेली आणि सध्या काय करीत आहेत, यांविषयी कुणालाच काही माहिती नाही.

एकदा कोमिन्टांगच्या वैमानिकांनी लाल सैन्याच्या एका तुकडीवर बाँबवर्षाव चालू केला असताना आडोशाच्या ठिकाणी लपून बसणे हो–त्झू–शेनला जमले नाही. आणि बाँम्बमधून निघणारे सुमारे वीस धारदार तुकडे तिच्या अंगात घुसून ती जबर जखमी झाली. ती जवळ जवळ मेल्यातच जमा झाली होती. पण कशीबशी वाचली. पुढचे 'लाँग मार्च 'चे सबंध दहा महिने तिला या जखमांचा त्रास होत होता. तिला सतत गाढवाच्या किंवा घोड्यांच्या पाठीवरून यावे लागे. ती लाल सैन्याच्या वैद्यकीय पथकाबरोबरच प्रवास करीत होती. लाल सैन्याच्या वेगवेगळ्या पथकांमध्ये खूप अंतर असायचे. दिवस दिवस मजल मारावी तेव्हा दुसरे पथक लागे. जेव्हा जेव्हा शक्य होई तेव्हा माओ–त्से–तुंग मागे येऊन आपल्या जखमी बायकोला भेटून जाई.

जखमी अवस्थेतच हो–त्झु–शेनला एक मुलगा झाला. त्या मुलाला मात्र तिने कुठे ठेवले नाही. स्वतःबरोबरच घेतले. पुढे दोन वर्षांनंतर तिला एक मुलगी झाली. तिची प्रकृती सुधारली नव्हतीच. उलट ती अधिकच बिघडत होती. वैद्यकीय उपचारासाठी तिला रशियात पाठविण्यात आले. पण ती बहुधा तिकडेच मेली.

माओ–त्से–तुंगबरोबरच त्याचे दोघे धाकटे भाऊही क्रांतिकार्यात ओढले गेले

होते. ते दोघेही 'लाँग मार्च' मध्ये सामील झाले होते. त्यांच्यापैकी माओ-त्से-मिन हा सुरक्षितपणे शेन्सीपर्यंत पोचला. पण दुसरा माओ-त्से-ताम हा मात्र वाटेत मरण पावला.

माओला सिगारेट्स् मिळाल्या नाहीत की तो वाटेतील अरण्यात तंबाखूसारखी दिसतील ती पाने शोधून काढून गोळा करी व त्यांच्या पुंगळचा करून आपली धूम्रपानाची तल्लफ भागवी. या प्रवासात त्याने तंबाखूच्या अनेक नवीन जाती शोधून काढल्या. त्याचबरोबर निरनिराळचा वनस्पतींच्या औषधी गुणांचाही त्याने अभ्यास केला.

## धावपळीतले काम

प्रवासामध्ये आपले वहुतेक सामान माओ आपल्याजवळच ठेवी. त्याचे अंथरूण म्हणजे एक पांघरण्याचे आणि एक अंथरण्याचे अशी दोन ब्लँकेट्स. आणि इतर मोठे सामान त्याचा खाजगी नोकर वाहून नेई. मुक्कामावर तुकडी पोचली, की हा नोकर माओसाठी तात्पुरते 'घर आणि ऑफिस' तयार करण्याच्या व्यवस्थेला लागे. नदीकाठी, रानात, टेकाडावर, बर्फाळ प्रदेशात, अशा जागा शोधणे मोठे कठीण जाई. सारेच सैनिक स्वत:साठी अशा जागा शोधत असत. कुठेतरी थोडीफार कोरडी जागा बघून तेथे तो नोकर वाळलेले गवत जवळपास सापडले तर तेथे पसरी आणि त्यावर ब्लँकेट टाकी.

त्याच्या मागोमाग माओचा खाजगी चिटणीस येई. त्याच्याजवळ कित्येक गुप्त व महत्त्वाचे कागदपत्र असत. लाल सेनेच्या आणि सोव्हिएटच्या प्रमुख सरकारी कचेऱ्या अशाच तऱ्हेने माओच्या घराच्या आसपास उभारल्या जात. मुक्काम थोडा मोठा असला तर लगेच मुक्कामावर वाहून आणलेले फील्ड टेलिफोन्स उभारले जात. माओ आपली कामे उरकून परत येईपर्यंत त्याच्या नोकराने त्याच्या ऑफिसच्या उपयोगासाठी म्हणून पेटचांपासून, लाकडी फळचांपासून एक कामचलाऊ टेबल तयार केलेले असे. माओ एकामागून एक सिगारेट्स् ओढीत समोरच्या फाईल्सचा फडशा पाडी. लाल सेनेच्या ठिकठिकाणच्या तुकडचांच्या प्रगतीचे अहवाल, संदेश लाल सैनिक गाढवांवरून, घोडचांवरून आणीत. त्यानंतरच झोप. त्याची झोप केवळ तास-दोन तासांचीच असे. अधूनमधून होणाऱ्या कोमिन्टांग विमानांच्या बाँबवर्षावामुळे हीही झोप त्याला पूर्णपणे मिळत नसे.

एकढचा विलक्षण प्रवासात आणि धामधुमीतही कियांगसीतून निर्वासित झालेल्या या सोव्हिएट सरकारची सर्व खाती, शाखा-उपशाखा व्यवस्थित काम करीत होत्या. सोव्हिएट सरकारचे गृहमंत्रालय, परराष्ट्र कचेरी, युद्धकचेरी, माहितीविभाग, प्रचार विभाग, शिक्षण मंत्रालय साऱ्या खात्यांच्या कचेऱ्या सतत घोडचांच्या किंवा गाढवांच्या पाठींवर असत. मुक्कामाची वेळ आली की, त्या आपले काम सुरू करीत या सर्व खात्यांच्या कारभारावर माओला जातीने लक्ष टेवावे लागे. त्याशिवाय

त्याला इतरही गोष्टींचे अवधान पाळावे लागे. बाहेरच्या चीनमध्ये नेमके काम चालू आहे, कोमिन्टांग पक्षाचे काय कार्यक्रम आहेत. त्यांचे राजकीय पवित्रे कसे बदलताहेत या साऱ्यांवर त्याला बारकाईने नजर तर ठेवावी लागेच, पण त्याचबरोबर जपान, रशिया, अमेरिका आदी देशांत काय घडते आहे, याकडेही नजर ठेवावी लागे. माहिती मिळणे कठीण असे. त्याचे हेर ठिकठिकाणांहून त्याला माहिती आणून देत. चुकून मिळालेले वर्तमानपत्राचे तुकडे आणि रेडिओ हेच इतर सर्व जगाची माहिती मिळविण्याचे त्याचे माध्यम होते.

एवढे काम करून प्रचंड माहिती रिचवून निर्णय घ्यावे लागत व धोरणे ठरवावी लागत. त्यामुळे माओ तपशीलाकडे क्वचितच लक्ष देई. कुठल्याही गोष्टीची तो ढोबळ माहिती घेई आणि आपल्या मिळालेल्या माहितीचा अत्यंत वास्तववादी दृष्टिकोनातून विचार करून झटकन आडाख बांधी, भराभर निर्णय घेऊन तपशील तो आपल्या सहकाऱ्यांकडे सोपवी. त्या त्या कामांसाठी हुशार आणि योग्य सहकारी निवडण्यात माओचा हातखंडा होत. त्यांच्याकडे कामे आणि अधिकार सोपवून माओ स्वत:च्या अंगावरील प्रचंड कामाचे ओझे अशा रीतीने कमी करी.

प्रवासात किंवा मुक्कामावर असलेल्या लाल सैन्याला सतत वाटेल त्या प्रसंगाला तोंड देण्याची तयारी ठेवावी लागे. तुफान वारा, वादळ, पाऊस, विजा, बर्फ, जंगली श्वापदे व त्याचबरोबर मागावर असलेल्या कोमिन्टांग सेना आणि बाँबर विमाने केव्हा अंगावर तुटून पडतील याचा नियम नसे. त्यामुळे प्रत्येक सैनिकावर, अधिकाऱ्यावर भयंकर मानसिक ताण पडत होता. त्यात अर्धपोटी-उपाशी, थंडी निवारण्याला पुरेसे कपडे नाहीत; कपड्यात जळवा, ढेकून चिकटलेले, अंगावर जखमा. त्यामुळे सारे सैनिक आणि अधिकारी भयंकर चिडखोर बनलेले असत. अधिकारी आणि नेतेही केवळ क्षुल्लक कारणांवरून चिडत आणि भांडत. पण या सर्व झगड्यांमध्ये माओ मात्र नेहमीच अतिशय शांत असल्याचे आढळते. तो सगळ्यांची बोलणी शांतपणे ऐकून घेई पण स्वत: मात्र कधीच चिडत नसे. त्यामुळेच कदाचित तो आपल्या स्पर्धकांना नेतृत्वाच्या स्पर्धेत नामोहरम करण्यात यशस्वी झाला असावा.

## अभेद्य संघटना

'लाँग मार्च'मध्ये सहभागी झालेले सारे नेते अनेक वेळा आजारी पडले, काही मेले, बरेच जगले. काहींना जखमा झाल्या. चाऊ-एन-लायदेखील या प्रवासात दलदलीच्या प्रदेशात फक्त एकदाच आजारी पडला होता. 'लाँग मार्च' जनरल चुह-तेहने कांग के-चिंग नावाच्या एका दणकट स्त्रीशी लग्न केले होते. ती लढायांमध्ये पुरुषांच्या बरोबरीने भाग घ्यायची. कधी कधी तर ती जखमी शिपायांनाही आपल्या खांद्यावरून वाहून न्यायची. ती मात्र संबंध प्रवासात कधीच आजारी पडली नाही.

ज्यांनी अनेक संकटांना एकत्र तोंड दिले आहे, जिवावरच्या संकटांनी वैतागून आपापसांत हमरीतुमरी येऊन भांडणेही केली आहेत, अशी माणसे पुढे पक्की दोस्त

बनतात. 'लाँग मार्च' मध्ये हेच झाले. 'लाँग मार्च' मध्ये सहभागी झालेल्या सैनिकांत, अधिकाऱ्यांत एकतऱ्हेचे वेगळेच नाते निर्माण झाले. या 'लाँग मार्च' मधून जे वाचले ते सारे तावून सुलाखून निघाले होते. लाल सैन्याचा तो अर्क होता. त्यामुळे पुढे लाल सैन्यात आणि कम्युनिस्ट पुढाऱ्यांत अभेद्य एकी निर्माण करणे माओला अतिशय सोपे गेले.

ऑक्टोबर १९३५ मध्ये माओची लाल तुकडी शेन्सी प्रांतातील पाओ-आन या सुरक्षित स्थळी पोचली तेव्हा तिची सहनशक्ती जवळजवळ संपुष्टात आली होती. हळू हळू इतर तुकडया येऊन मिळू लागल्या. दक्षिण चीनमधून निघालेल्या लाल सैन्याच्या सर्व तुकडया माओला येऊन मिळायला जवळजवळ एक वर्ष लागले. अनेक ठेचा खाऊन, अनेकांच्या प्राणांची भयानक किंमत दिल्यानंतर मानवी इतिहासातील एक अत्यंत आश्चर्यकारक आणि जिकिरीची वाटचाल अखेर यशस्वी झाली होती.

पाओ-आनला पोचल्यानंतर लाल सैन्याने विश्रांती घेतली आणि गेल्या वर्षभरात आपण काय केले याची ते मोजदाद करू लागले आणि स्वतःच आपण गाजवलेल्या कर्तृत्वाने आश्चर्यचकित झाले.

पाओ-आन येथे २७ डिसेंबर १९३५ रोजी माओने आपल्या सैनिकांपुढे भाषण केले तेव्हा माओ सार्थ अभिमानाने म्हणाला, "आपल्या 'लाँग मार्च' ने आपण इतिहास घडविला आहे. सबंध जगात आपल्या 'लाँग मार्च' सारखी घटना आजपर्यंत घडली नव्हती. . . .गेले बारा महिने—रोज—सतत आपण जिवावरच्या संकटांना तोंड देत होतो. रोज कोमिन्टांगची कित्येक विमाने आपल्या तुकडयांवर भयानक बाँबवर्षाव करीत होती. रोज कोमिन्टांगचे कित्येक लाख सैनिक आपले शिरकाण करण्यासाठी जिवाचा आटापिटा करीत होते. भयानक नैसर्गिक आपत्तींशी आणि अडथळ्यांशी आपण धैर्याने झगडा दिला. पण तरीही आपण पुढेच जात होतो. आणि गेल्या वर्षभरात चीनचे अकरा प्रांत आपल्या पायाखाली तुडवून सुमारे सहा हजार मैल चालून आपण येथे आलो आहोत. हा आपला प्रचंड विजय आहे. . . ."

[ अपूर्ण ]


## फ्री — मोफत — फ्री

मुंबई वरळी मटका डेली चार्ट

दररोज बरोबर आजच लिहा

**महालक्ष्मी फोरकास्टिंग सर्व्हिस**

**ब्रांच पोस्ट ऑफिस गुण्डिआली**

सब-पोस्ट—मांडवी, जिल्हा कच्छ, गुजराथ राज्य






# वा ट्टे ल - ते

इंग्रजी वृत्तपत्रांतून आढळणाऱ्या 'तिसऱ्या स्तंभा' च्या धर्तीचे हे मन-मोकळे लिखाण. अग्रलेखाचे यमनियम जरा बाजूला सारून. लिहिलेले गंभीरतेचे कवच काढून ठेवून लिहिलेले. लघुनिबंध अथवा गुजगोष्टीच्या धर्तीवर वाचकांशी दिलखुलास संवाद करणारे. मात्र लघु-निबंधापेक्षाही याचा पसारा आटोपशीर. थोडक्यात खूप अर्थ सामावलेला. लघु-निबंधाप्रमाणे वाचकाच्या मनात शिरून हळूहळू त्याला आपलेसे करण्याइतका वेळही या लिखाणाला नाही, आणि ती त्याची प्रकृतीच नाही. 'इतस्ततः' उघडचा डोळयांनी आणि संवेदनाशील मनाने निरीक्षण करून भोवतालच्या घटनांवर, दृश्यांवर, प्रवृत्तींवर मार्मिक शेरे द्यावयाचे, सौंदर्याचे रसग्रहण करायचे आणि कुरूपतेवर निर्मळ विनोद करून तिचा ओंगळपणा कमीतीव्र करायचा, अशी या लिखाणाची प्रवृत्ती. म्हणूनच 'इतस्ततः' हे नावही या लिखाणाला शोभले. दैनिक केसरीतल्या निवडक 'इतस्ततः' लिखाणाचा हा संग्रह.

# दिलखुलास मार्मिक लिखाण

## निशिकांत मिरजकर

लिहिणाऱ्याची अत्यंत मनमोकळी वृत्ती हा या लिखाणाचा एक आवश्यक गुण. या पुस्तकात सगळीकडे दिसेलच, पण शिवाय लेखकाच्या बहुश्रुत व्यक्तित्वाची त्याला जोड मिळाली आहे. असल्या तऱ्हेचे लिखाण हा लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा खरा आरसा असतो, आणि या पुस्तकातील लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब बरेच आकर्षक बनलेले आहे यात काहीच शंका नाही. या पुस्तकाचा लेखक मार्मिक आहे, मिस्किल आहे, बहुश्रुत आहे, संवेदनाशील आहे, आणि रसिकही आहे! या साऱ्या वैशिष्ट्यांनी त्यांचे व्यक्तित्व प्रौढ आणि डौलदार बनले आहे. अर्थातच त्याच्या लिखाणालाही ठिकठिकाणी मोठा आकर्षक डौल प्राप्त झाला आहे. इतस्तत: घडणाऱ्या कितीतरी मजेशीर घटना त्यांच्या अवलोकनात येतात आणि त्यांच्यावर ते लिहून जातात. 'लठ्ठ व्हा' असा अमेरिकेत चाललेला प्रचार आणि जागतिक शांततेशी त्याचा जोडला जाणारा संबंध यांतील विनोदाची जाणीव त्यांना होते; तशीच दारूबंदीमुळे निर्माण झालेली संकटपरंपराही त्यांच्या विनोदाचा विषय बनते. अश्वाच्या आवडीमुळे प्रियकराला नकार देणारी प्रेयसी त्यांच्या नाजुक विनोददृष्टीला दिसते, तशी 'अर्ध्या तासात डबा खाऊन झाला पाहिजे' या जाचक नियमातील करुणताही विनोदात सामील होते. श्री. गोखल्यांच्या विनोददृष्टीचे हे वैशिष्टयच आहे. त्यांच्या विनोदाची भूमिका आक्रमक नाही, बोचक उपहासाची नाही. त्यामध्ये नित्य प्रांजळतेचे झरे आणि दिलखुलास वृत्तीचे तुषार झुळझुळत असतात. विनोदाच्या मागे कधीकधी सहेतुकता असतेही. पण ती छिद्रान्वेषी नाही. सहानुभूतीचा स्पर्श तिला झालेला आहे. मानवी स्वभावाचे विविध पैलू आणि पोकळ प्रतिष्ठितपणाच्या आवरणामागील हास्यास्पदता ती हसतखेळत दाखविते. विनोदाच्या भेदक माऱ्याने कुणाला केविलवाणे करण्याचा प्रयत्न नाही; मात्र नकली 'सोंगां'चे स्वरूप उघड करण्याचे कार्य मात्र होते. थोरामोठ्यांच्या दौऱ्यावर होणाऱ्या 'खाण्या'ची तक्रार करताना "जणू काही मुदपाकखान्यातच बातमीदार

## साभार स्वीकार

### दैनंदिनी

| | |
|---|---|
| संगम प्रेस, | पुणे |
| आनंद मुद्रणालय, | पुणे |
| चिमणलाल पेपर कं. | मुंबई |
| सिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनी, | बई |

### दिनदर्शिका

| | |
|---|---|
| ब्रिटिश इन्फर्मेशन सर्व्हिसेस, | मुंबई |
| सिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनी | मुंबई |
| नायक्रोम मेटल वर्क्स | पुणे |
| माडर्न पेपर स्टोअर | पुणे |
| कोहिनूर एजन्सीज | पुणे |
| उदय मुद्रणालय | पुणे |
| लघाटे टेलर्स | पुणे |

[ संपादक ' माणूस ' साप्ताहिक ]

छपून बसला होता अशी शंका वाटण्याजोगी सविस्तर वर्णने, " करणारी वृत्तपत्रे, " अमुक अमुक साखरकारखान्यातील खान्यासाठी दहा कोंबड्या कापल्या' असे ' बातमी 'त म्हटले आहे ते बरोबर नसून ' फक्त दोनच कोंबड्या खाण्यात आल्या ' असे खुलासे करणारे हास्यास्पद पुढारी यांच्याबरोबरच जाता जाता " आता कोणी 'पैसाच खाल्ल्याचा आरोप करील " अशासारखे शेरे इतरही विवक्षित ' विषयां 'ना उपरोधिक विनोदाच्या प्रकाशात आणतात. विमानोड्डाण थोपविणारे जावई, मोटार तुडविणारा संतप्त माणूस, वाढीसाठी कोर्टात जाणारा फौज अकबरखान या माणसांच्या विक्षिप्त गंमतीदार नमुन्यांबरोबर खास विमानाने जाणारे घोडे, दारूच्या गुत्त्यातील माकड आणि मोरारजीभाईंचा कुत्रा हे मानवेतर प्राणीही चुरचुरीत विनोदाचे विषय बनतात.

एकंदरीतच विषयांच्या निवडीमध्ये वेधकता आणि विविधता भरपूर असल्याने पानापानागणिक उत्सुकता वाढतच जाते. बोलूनचालून हे ' वाट्टेल ते ' लिखाण आहे. यात शनीची कडी आणि त्याचे माहात्म्य आहे, स्त्रिया आणि त्यांची उपमाने आहेत; चतुर आणि मिस्किल चोरांच्या कथा आहेत आणि सभा उधळून लावणारे उंदीरही आहेत ! त्यांतून सामाजिक व्यंगांना कोपरखळ्या आहेत, व्यक्तिगत नाजुक थट्टा आहे, मानवी प्रवृत्तीचे हसतखेळत दर्शन आहे आणि शास्त्रीय माहितीही आहे ! लेखकाच्या सर्वंकष बहुश्रुततेची साक्ष

ठिकठिकाणी पटते. शास्त्रीय माहितीत अचूकता आहेच, पण प्रसंगोपात्त विविध म्हणी, आख्यायिका आणि मार्मिक अवतरणे यांच्या खुबीदार उपयोगाने लेखनाची रंगत सतत वाढतच जाते. " पूर्वी काळ काम वेगाची उदाहरणे ' सम ' च असत; आता ती व्यस्त झाली आहेत ! " .... " मनाचे देहाशी यमक न जुळण्यासारखी दु:खे साठत जातात तेव्हा आसवांचा ठेवा तयार होतो, " ..... " घोडा मेला म्हणून गाढवाला सुतक येणार नसले तरी माणसाला खासच भडभडून यावयास हवे. " यांसारख्या डौलदार वाक्यांच्या अचूकफेकी वेगळाच तोल निर्माण करतात.

## उपरोधाला काव्याची झालर

शुद्ध, निर्मळ विनोद आणि दिलखुलास उपरोध यांच्या जोडीला काव्यात्म वृत्तीचे देणे लाभल्यामुळे पुस्तकाच्या आशयाला कमानदार आकृती प्राप्त होते. लेखकाच्या मनाची रसिकता या आकृतीचा घाट घडविते. लांबसडक काळचामोर कुंतलांतील काव्य, मुंबईत अवतरलेली ' शुभ्र वस्त्रातील ओलेती ', सुंदरींच्या सौंदर्याची विविध उपमाने यांसारख्या गोष्टींचे रसग्रहण अतिशय काव्यात्म वृत्तीने केलेले आहे. " वर-खाली होणारे हात, त्यांची ती झळकणारी नखे, कंकणांची किणकिण यांसह ही कामिनी जे काय बांधते, ते ती आपले केस बांधते, का माझे हृदयच ती आपल्या हातांनी झटकन घेऊन बांधते, हे काही मी सांगू शकत नाही ! " यासारखी अवत-रणे लेखकाच्या ' याही क्षेत्रातील ' रसिक बहुश्रुततेची साक्ष पटवितात. ' काळोखा-लाच नक्षत्रांचे कोंब फुटणार आहेत ' यासारख्या उताऱ्यातील करुण काव्याची कातरता मनाला हळुवार करून सोडते. जॅकेलिन केनेडींच्या अबोध दु:खाचे हे प्रत्ययकारी चित्रण मनाला भिडणारे झाले आहे.

असे हे ' वाट्टेल ते ' लिखाण भेदक विरोधाचे हसतखेळत दर्शन घडवून ढोंगाला चव्हाट्यावर आणणारे, जीवनातील दु:खांना विनोदाची झालर लावून विविध मानवी स्वभावाचे पैलू दाखविणारे आणि रसिकतेने ' इतस्तत: ' पाहणारे. जीवन-व्यापी समस्यांचा तौलनिक अभ्यास यात येणार नाही आणि तो अपेक्षितही नाही. या छोटेखानी लिखाणाच्या मर्यादित चौकटीत जे काही अपेक्षित आहे ते श्री. गोखले यांनी ठसठशीतपणे, प्रभावीपणे केले आहे. त्यांच्या मर्यादा या लेखनप्रकाराच्याच मर्यादा आहेत. घटकाभराचा वेळ काव्यशास्त्रविनोदाच्या खेळकर वातावरणात घाल-वून, पुन्हा त्यातून काही मार्मिक सत्ये मनात विववण्याचे महत्त्वाचे कार्य हे पुस्तक करते यात शंका नाही. श्री. वसंत सरवटे यांच्या सहजशैलीतील नेमके वैशिष्टय दाखविणाऱ्या रेखाचित्राचाही अवश्य उल्लेख करावयास हवा.

**[ ' वाट्टेल ते ! '– ल. ना. गोखले: केसरी प्रकाशन : मूल्य : ६ रुपये – पृष्ठे १८० ]**

●

# अॅड. माधव कानिटकर

## लेखांक : पाचवा

*इन्स्पेक्टर हझरासिंगाचा अंदाज खरा ठरला. कर्तारसिंग आणि करमसिंग यांनी लोहारमंडी येथे स्वतःला मुद्दामच अटक करवून घेतली. लवकरच ' खुनी ' म्हणून त्या दोघांना कोर्टापुढे आणण्याइतका पुरावा इन्स्पेक्टरसाहेबांना मिळाला. क्रूर कर्तारसिंगाची रूपवान् बायको धन्नो हिचं संरक्षण करणाऱ्या जोगिंदरसिंगानं लठ्ठ बक्षिसाच्या आशेनं ' कर्तारसिंग आपल्या सहकाऱ्यासह उद्या सकाळी आग्ऱ्याला रीजनल ट्रान्स्पोर्ट ऑफिसमध्ये येत आहे ' अशी मोलाची माहिती इन्स्पेक्टर हझरासिंगांना दिली. आणि २८ एप्रील रोजी सकाळी ११ च्या सुमारास तीन धिप्पाड शीख R. T. O. च्या ऑफिसमध्ये शिरले व चित्रविचित्र बुशकोट घालून उभे असणारे इन्स्पेक्टर हजरासिंग यांनी ताबडतोब तिघांना अटक केली.*

पंजाबमधील सगळ्या प्रमुख वर्तमानपत्रांतून कर्तारसिगाच्या अटकेला ठळक प्रसिद्धी मिळाली: " कुप्रसिद्ध दरोडेखोर कर्तारसिंग-करमसिंग यांना अटक ! " आणि मोघा तालुक्यात खळबळ माजली ! इन्स्पे. हझरासिंगांच्यावर स्तुतीचा वर्षाव सुरू झाला ! ' खबरी 'ने पोलिसांना कर्तारसिंगाचा पत्ता दिला, ही गोष्ट कुठल्याही संपादकाला कळवली गेली नव्हती ! मग इतरेजनांची काय कथा ? वर्तमानपत्रांत येतं ते खरं या भावड्या समजुतीच्या लोकांची खात्री पटली होती की पोलिसांनीच कर्तारसिंगाला शोधून काढला !

खेड्यापाड्यांतून बातमी पसरत गेली. हॉटेलात बसलेले रिकामटेकडे लोक, प्रवासात आलेले लोक, घराघरांतून बसलेले लोक वर्तमानपत्र हातात घेऊन कर्तारसिंगाच्या फोटोकडे पुन्हा पुन्हा पाहून तर्कवितर्क करीत होते. गज्जनसिंगाचा खून झाला, तेव्हा जणू काही आपणच तिथे होतो, इतक्या उत्साहाने जो तो तिखट-मीठ लावून चर्चेत भाग घेत होता ! .. आणि इकडे लॉकअपमध्ये कर्तारसिंग व करमसिंग शांतपणे निराळ्याच विषयांवर गप्पा मारीत होते ! जणू काही गज्जन-

सिंगाच्या खुनाशी त्यांचा काही संबंध नव्हता !

सकाळपासून होत असलेल्या स्तुतीचा इन्स्पे. हझरासिंगांनी स्वतः- वर यत्किंचितही परिणाम होऊ दिला नव्हता. सुख आणि दुःख, स्तुती आणि निंदा ह्या गोष्टी एकमेकांना फार जवळून काटशह देतात याची त्यांना जाणीव होती. नुसते आरोपींना पकडून फायदा नव्हता. त्यांच्यावर खुनाचा आरोप शाबित करावयाची जबाबदारी मुख्यतः इन्स्पे. हझरा- सिंगांवर होती ! उद्या कोर्टात आरोपी सुटले तर आज स्तुती कर- णारे लोक त्यांची छी : थू : ! करतील, कर्तारसिंगाकडून हजारो रुपये खाल्ल्याचा आरोप करतील, याबद्दल त्यांना खात्री होती ! आज आरोपींना मॅजिस्ट्रेटपुढे हजर कर- ण्याचे त्यांचे कर्तव्य होते. कर्तारसिंग सापडल्यामुळे त्यांचा उत्साह थोडा वाढला होता इतकेच काय ते.९–९॥ च्या सुमारास कर्तारसिंगसकट सग- ळ्यांना बेड्या ठोकून कडक पोलिस- बंदोबस्तात पोलिस व्हॅनमध्ये चढ- वण्यात येत होते आणि कर्तारसिंग, करमसिंग आत्मविश्वासाने चालत होते. आपसात थट्टामस्करी करीत होते ! कर्तारसिंगाने तर चक्क इन्स्पे. हझरासिंगांना विचारले, "क्यों साब!



बहुत दिनों के बाद मेहेरनजर हुई हम लोगोंपर ? " आणि इन्स्पे. हझरासिगां-नीही तितक्याच दिलखुलासपणे त्याच्या पाठीवर थाप देऊन म्हटले, " हाँ या ऽऽर! किसीको तो पकडनाही चाहिये ! सुब्रोसे कोई मिला नहीं, इसलिये आपको लेके आया ! " इन्स्पे. हझरासिगांच्या उत्तरावर आरोपींसह सगळे मनमुराद हसले आणि इन्स्पे. हझरासिग आतून संतापले आहेत, ही गोष्ट कुणाच्या लक्षातच आली नाही !

डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटच्या कोर्टाच्या दिशेने धावत असलेल्या पोलिस व्हॅनमध्ये ड्रायव्हरच्या शेजारी गणवेशात बसलेल्या इन्स्पे. हझरासिगांच्या मनात ' क्यौं साब ! बहुत दिनोंके बाद मेहेरनजर हुई हम लोगोंपर !' या प्रश्नाने आग निर्माण केली आणि मनातल्या मनातच त्यांनी " रात्री समजेल कशाला आणलाय तुला ते ! " असा जळजळीत जबाब देऊन टाकला !

अटक केलेल्या मिनिटापासून त्यांनी आरोपींच्या अंगाला बोटदेखील लावले नव्हते ! आणि त्याला कारणदेखील तसेच होते. एकदा मारायला सुरुवात केली, की इन्स्पे. हझरासिगांना भान राहत नसे. २४ तासांच्या आत डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट-पुढे आरोपींना उभे करायचे होते. आरोपींच्या अंगावर जखमा दिसल्या तर डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट ओपन कोर्टात इन्स्पे. हझरासिगांना समज देतील. कदाचित आरोपींना फार मोठ्या रकमेचा का होईना पण जामीन देतील ही धास्ती इन्स्पे. हझरासिगांना होती ! इन्स्पे. हझरासिगांची एक नेहमीची पद्धत ठरून गेली होती. मॅजिस्ट्रेट-पुढे आरोपी हजर करीपर्यंत त्याला बोटदेखील लावायचे नाही. कोर्टाच्या हुकमाने १४ दिवसांचा रिमांड मागून घ्यायचा, आरोपीला पोलिस कस्टडीत घ्यायचा आणि मग यथेच्छ बडवायचा ! १४ दिवसांत अंगावरचे वळ नाहीसे होतात आणि नंतर पोलिसांनी केलेल्या मारहाणीबद्दल आरोपीने तक्रार केली तरी मॅजिस्ट्रेट त्याची सहसा दखल घेत नाही !

विचार करता करता पोलिस व्हॅन कोर्टाच्या आवारात शिरली आणि सफाईने दरवाजा उघडून इन्स्पे. हझरासिग व्हॅनच्या मागच्या बाजूला आले. कर्तारसिंग आणि करमसिंग रुबाबात खाली उतरत होते. बघणाऱ्या लोकांकडे पाहून कर्तारसिंगाने सगळ्यांना नमस्कार केला ! आणि पोलिस बंदोबस्तात तो कोर्टात शिरला. कर्तारसिंग यायच्या कितीतरी अगोदर कोर्टात गर्दी उसळली होती ! गर्दी हटवून पोलिसांनी कर्तारसिंगासाठी रस्ता मोकळा केला. मॅजिस्ट्रेटसाहेबांचे उच्चासन अजून मोकळेच होते. समोरच ओळीने मांडलेल्या आणि 'फक्त वकिलांसाठी' असलेल्या खुर्च्यांत वकील मंडळी येऊन बसली होती. वकिलांच्या खुर्च्यांच्या मागे असलेल्या लाकडी बाकांवर इतर खटल्यांसाठी आलेले वादी–प्रतिवादी एकमेकांकडे तिरस्काराने पाहत बसलेले होते ! डाव्या बाजूला जिल्ह्यांतल्या निरनिराळ्या गावांतून धरून आणलेले आरोपी उभे होते. केस पिंजारलेले, तांबडयालाल डोळ्यांचे,

अंगात शर्ट नसलेले. चोऱ्या करणारे, बलात्कार करणारे, मारामाऱ्या करणारे, कुणी उगाचच धरून आणलेले ! पोलिस इन्स्पेक्टर्स 'आपापल्या' आरोपींची यादी पाहत होते. 'सगळे' आहेत ना, याची खात्री पटवून घेत होते. कोर्टात कोलाहल माजला होता. लाकडी बाकाच्यादेखील मागे भिंतीला लागून असलेल्या मजबूत लाकडी पिंजऱ्यात कर्तारसिंग-करमसिंग-कुंदनसिंग ओळीने शिरले, तेव्हा सगळ्यांचे लक्ष त्यांनी वेधून घेतले ! सगळ्या आरोपींपेक्षा त्यांचे महत्त्व अधिक होते. बरोबर अकरा वाजता कोर्टाचा पट्टेवाला शांतता राखण्याचा इशारा देण्यासाठी म्हणून पुढे चालत आला आणि त्याच्या पाठोपाठ धीमेपणाने पावले टाकीत येत असलेले व चेहऱ्यावर गंभीरपणा असलेले डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट येत असल्याचे दिसले. हवालदारांची धावपळ झाली. इन्स्पेक्टर्सनी खडाखड सलाम ठोकले. वकील मंडळी कमरेत वाकली, खुर्च्या सरकवल्याचा विचित्र आवाज झाला आणि मॅजिस्ट्रेट स्थानापन्न झाले. निरनिराळ्या आरोपींची नावे पुकारली जात होती. कुणाला जामीन मिळत होता, कुणाला नव्हता. कुणाला दंड ठोठावला जात होता, कुणाला ताकीद दिली जात होती ! सुमारे अर्ध्या तासाने शिरस्तेदाराने "मोघा पोलिसस्टेशन !" म्हणून पुकारा केला आणि इन्स्पे. हझारासिंग चपळाईने पिंजऱ्यात शिरले, मॅजिस्ट्रेट साहेबांना त्यांनी रुबाबदार सलाम ठोकला, डोक्यावरची हॅट हातात काढून घेतली. मॅजिस्ट्रेटनी सलाम स्वीकारल्याच्या अर्थाची मान हलवली आणि बघता बघता शिरस्तेदाराने नावे पुकारली "कर्तारसिंग – ऽऽ"

कडक पोलिसबंदोबस्तात तिन्ही आरोपी लाकडी पिंजऱ्याजवळ आणले गेले. तिघांनीही मॅजिस्ट्रेटसाहेबांना रामराम केला आणि सगळे काही ठाऊक असलेल्या मॅजिस्ट्रेटसाहेबांनी इन्स्पे. हझारासिंगांना विचारले,

"व्हॉट इज् द चार्ज ?"

"302 I. P. C. – मर्डर–सर !"

"वेपन ?"

"गन सर !"

...... आणि इतक्यात एक पोरगेलासा वकील तिन्ही आरोपींतर्फे उभा राहिला आणि त्याने आरोपींना जामिनावर सोडण्यात यावे म्हणून कोर्टाला अर्ज केला ! आरोपींना केवळ संशयावरून पकडण्यात आलेले आहे, खुनाचा आरोप ठेवण्याइतपत पुरावा पोलिसांकडे नाही, हे वकीलसाहेबांचे मुख्य मुद्दे होते ! मात्र आपल्याला जामीन मिळणार नाही, याची कर्तारसिंगाला स्वतःला खात्री होती ! त्याचा खरा 'मोठा' वकील नेहमी सेशन्स कोर्टात किंवा हायकोर्टात उभा राहत असे ! खालच्या कोर्टात तो नेहमी नवीन वकील करीत असे. ५०–१०० रुपये दिले, की वकीलसाहेब खूष ! जामीन मिळाला तरी उत्तम. नाही मिळाला तरी उत्तम ! मॅजिस्ट्रेटसाहेबांनी मात्र वकिलाचा योग्य तो मान राखला आणि त्यांच्या उजव्या अंगाला

बसलेल्या सरकारी वकिलाकडे पाहत विचारले,

" यस् प्रॉसिक्युटर ? व्हॉट इज् युवर से ऽ s "

आणि त्या सराईत सरकारी वकिलाने जामीनकीच्या अर्जांना कसून विरोध केला !

कर्तारसिंगाने जामिनावर सुटून लोहारमंडीच्या मॅजिस्ट्रेटला फसवले याची त्याने आठवण करून दिली. कर्तारसिंगाचे पोलिसांना चुकवणे ! अधिक चौकशीपूर्वी जामीन दिल्यास पुरावा जमविता येणार नाही ! मुळामध्ये खुनाचा प्रकार हा गुन्हाच जामीन देण्याच्या लायकीचा नाही, या गोष्टीवर त्याने भर दिला ! मॅजिस्ट्रेट-साहेबांनी खाली मान घालून बराच वेळ काही लिखाण केले...... आणि पंजाब-मधल्या संध्याकाळच्या वर्तमानपत्रांत बातमी झळकली : " गज्जनसिंग खून खटल्या-तील आरोपींचे जामिनकीचे अर्ज फेटाळले ! "

.....या बाबतीत असे समजते की...डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट.....यांनी आरोपींना अधिक चौकशीसाठी पोलिस कोठडीत ठेवण्याचा हुकूम दिला !

इन्स्पे. हझारासिंगांचे काम झाले होते. कोर्टातून येत असताना त्यांच्या डोक्यात निराळेच विचार चालले होते. बदमाश आरोपींच्या तोंडून सत्य वदवण्याचे मार्ग दोन असतात. एक त्याला बेदम ठोकणे किंवा बाजूबाजूने प्रश्न विचारून त्याच्याच शब्दांत त्याला पकडणे. एरव्ही जबरदस्त ताकदीचे क्रूर समजले जाणारे गुन्हेगार-देखील " हझारासिंग साबने बुलाया है " एवढा निरोप ऐकताच भेदरून जात असत, ते हझारासिंगसाहेब बेदम ठोकतील या भीतीनेच !

इन्स्पे. हझारासिंग सकाळपासून आरोपींच्या हालचाली न्याहाळत होते. कर्तारसिंग-करमसिंग अजिबात घाबरलेले दिसत नव्हते ! त्यांच्या आत्मविश्वासाने इन्स्पे. हझारासिंगांना एक वेगळाच इशारा दिला ! अशा महत्त्वाच्या खटल्यात आरोपींना मारून काही पुरावा मिळेल, असे समजून चालणे ही फार मोठी चूक ठरेल ! उलट आरोपींना न मारता त्यांच्याशी नुसत्या गप्पा मारून प्रश्न विचारून सत्य बाहेर काढण्यात अधिक चतुराई होती !

पोलीस कोठडीत बसलेले कर्तारसिंग, करमसिंग आणि कुंदनसिंग याच विचाराने घाबरून गेले होते. इन्स्पे. हझारासिंग आज आपली हाडं मोकळी करणार या विचा-राने ते अस्वस्थ झाले होते ! मार सहन करण्याची मनोमन तयारी करीत होते !

कोठडीचे कुलूप काढण्याचा आवाज आला. लोखंडी दरवाजा कर्कश्श आवाज करून थोडासा उघडला गेला आणि बाहेर बंदुका घेऊन उभ्या असलेल्या दोन कॉन्स्टेबलसपैकी एकाने आवाज दिला,

" कर्तारसिंग ऽ ऽ ! "

" जी ऽ ऽ ! "

" चलो ऽ ! "

" कुठे ? "

" बडा साब बुलाता है !"

कर्तारसिंगाचे पाय लटपटू लागले. येताना आपली काय स्थिती असेल कुणास ठाऊक ! दरवाजापर्यंत येऊन तिथेच तो घुटमळू लागला. एका कॉन्स्टेबलने त्याचे जाडजूड मनगट धरून कर्तारसिंगाला बाहेर ओढला आणि दुसऱ्या कॉन्स्टेबलने कोठडीला कुलूप ठोकले.

कडक बंदोबस्तात कर्तारसिंग पोलिस नेतील तिकड चालू लागला ! पूर्ण गणवेश घालून आपल्या टेबलाजवळ बसलेल्या इन्स्पे. हझारासिंगांना दोन्ही कॉन्स्टेबल्सनी शिस्तीत सलाम ठोकले. कर्तारसिंगाची गाळण उडाली होती ! इन्स्पे. हझारासिंग ' सुरुवात ' केव्हा करतात याचीच फक्त खोटी होती !

आणि कर्तारसिंगाला आश्चर्याचा धक्का बसला ! कर्तारसिंग पुरा गोंधळला ! फार दिवसांनी भेटायला आलेल्या मित्राचे स्वागत कसे करावे तसे इन्स्पे. हझारासिंगांनी त्याचे स्वागत केले. हसत हसत इन्स्पे. हजारासिंग स्वतः खुर्चीवरून उठले. कर्तारसिंगाच्या पाठीवर हात ठेवून त्यांनी त्याला आत आणला. समोरच्या खुर्चीकडे उजवा हात करून त्याला आग्रहाने बसवून घेतले. स्वतःच्या खुर्चीवर बसता बसता त्यांनी आपली आवडती उंची सिगारेट पेटवली. कर्तारसिंगाला एक ऑफर करून त्याच्याशी चक्क गप्पा मारायला सुरुवात केली :

" काय म्हणतेय आग्ऱ्याची ट्रिप. . . ?"

" मी कामासाठी गलो होतोसाहेब आग्ऱ्याला !"

" अच्छा ? काय काम काढलंत एवढं ?"

" माझी ट्रान्स्पोर्ट कंपनी आहे ना तिकडे—"

" केव्हा निघालात मोघाहून ?"

" ६ तारखेला निघालो संध्याकाळी !"

" एकटेच—?"

" नाही ! करमसिंग होता बरोबर ! !"

" आणि तुमची बंदुक नाही दिसली कुठे ?"

" बंदुक दुरुस्तीला टाकल्ये साहेब !"

" दुरुस्तीला ? "

" हो साहेब, निघाल्यानंतर लक्षात आलं की घोडा मोडलाय. आग्ऱ्याला ८ तारखेला सकाळी पोचलो आणि लगेच बंदुक दुरुस्तीला टाकली. "

कर्तारसिंग नेहमीप्रमाणे भरड्या आणि मोठ्या आवाजात बोलत होता. त्याच्या चेहऱ्यावर लपवाछपवी आणि आत्मविश्वास यांचे एक चमत्कारिक मिश्रण दिसत होते. त्याच्याकडे मध्येच निरखून पाहत इन्स्पे. हझारासिंगांनी विचारले.

" तुम्हांला काय म्हणे तिथं पोलिसांनी पकडलं ?"

" हो. "

" कशावरून पकडलं ?"

" मला उगाचच पकडलं साहेब ! खरं म्हणजे मी हल्ली पोटात दुखतं म्हणून दारू सोडून दिली होती !"

" मग ?"

" त्या दिवशी कुंदनसिंगामुळे मी लफड्यात आलो !"

" म्हणजे ?"

" संध्याकाळी कुंदनसिंगांनी मला प्यायचा आग्रह केला आणि एकदा घेणार म्हटल्यावर मी सबंध बाटलीच संपविली !"

" नंतर ? "

" नंतर काय झालं मला माहीत नाही. कारण शुद्धीवर आलो, तेव्हा मी लॉक-अपमध्ये होतो ! "

" मग सुटलात कसे ? "

" ९ तारखेला तिथल्या इन्स्पेक्टरसाहेबांनी मला जामीन दिला ! "

" तिथल्या साहेबांनी केस नाही दाखल केली ? "

" केली होती ना ! "

" मग कोर्टाने निर्दोष सोडला ? "

" नाही साहेब !..."

" मग ? "

" मी तारखेला गेलोच नाही ! "

" का नाही गेलात ? "

" त्याचं असं झालं साहेब ऽ ऽ ९ तारखेला मी जामिनावर सुटलो आणि तसाच मीरतला गेलो. तिथल्या कोर्टात माझ्या ट्रॅन्स्पोर्ट कंपनीची केस चालू होती ! नंतर मी तिथे आजारी पडलो. १९ तारखेपर्यंत मला तापच येत होता. तब्येत चांगली झाल्यावर मी आग्र्याला आलो आणि तिथे आपण मला पकडलंत ! "

इन्स्पेक्टर हझरासिंग मनातून बेहद्द खूष झाले. कर्तारसिंगाने त्यांना बोलता बोलता अनेक धागेदोरे दिले होते. मुद्दाम काही वेळ थांबून त्यांनी त्यातली विसंगती स्मरणात ठेवली. समोरच्या केसपेपर्सवर काही वेळ लिखाण केले आणि एकदम मान वर करून विचारले,

" तुम्हांला कळलं का ? "

" हो. हरजितसिंग आणि गज्जनसिंगांचा खून झाला ! "

" कसं कळलं ? "

" मला मीरतला कळलं, पेपरात वाचलं ! "

... ... ...

कर्तारसिंगाने दुःखाचा एक निःश्वास टाकला आणि उजव्या हाताचा पंजा विचित्रपणे हलवीत तो म्हणाला,

"फार वाईट झालं! परमेश्वरी इच्छेपुढे कुणाचा इलाज? त्यांचं मरण तसं होतं!"

"कसे काय खून झाले असतील हो?"

"आपल्याला काय ठाऊक साहेब! खून झाले त्या वेळी आग्ऱ्याच्या जलमध्ये होतो मी!"

कर्तारसिंगाचे शेवटचे वाक्यच इन्स्पे. हझारासिंगांना महत्त्वाचे वाटले. एखाद्या माणसाचा बचाव कितीही चांगला असेल पण त्याला बचाव घ्यावा लागला, याचाच अर्थ कुठेतरी पाणी मुरत असलं पाहिजे! रात्रीचे जवळ जवळ ११॥ वाजले होते पण इन्स्पे. हझारासिंगांनी धागा अर्धवट सोडला नाही—

"सरदारजी! आग्ऱ्याच्या तुमच्या ट्रान्स्पोर्ट कंपनीच्या जागेत दुसरीच कंपनी आली आहे हे खरे?" कर्तारसिंगाने निर्विकारपणे खांदे उडवले आणि तो म्हणाला, "ती पण कंपनी माझीच आहे साहेब! हे साले इन्कम् टॅक्सवाले हैराण करतात! म्हणून मी आळीपाळीने माझ्याच कंपनीची नावे बदलतो आणि अकौंटम् वेगळे दाखवतो!"

"तुमच्या कंपनीचे सगळे ट्रक्स् कुठे गले?"

"सगळे ट्रक्स् धंद्यासाठी पंजाबच्या बाहेर गेल्येत!"

"— पण मग गज्जनसिंगाचा खून का झाला असेल याचा काही अंदाज आहे?"

"मला काही अंदाज नाही. मला त्यातलं काही ठाऊक नाही!"

प्रश्नोत्तरातून मिळालेली सगळी महत्त्वाची माहिती इन्स्पे. हझारासिंगांनी लिहून काढली. कर्तारसिंगाला वाचून दाखवली. त्याने बरोबर आहे म्हटल्याबरोबर त्याची सही घेतली. स्टेटमेंट फाईलमध्ये घातले आणि त्यांनी टेबलवरची घंटा वाजवली. इन्स्पे. हझारासिंग अतिशय थकून गेले होते पण वेळ घालवून फायदा नव्हता! आत आलेल्या कॉन्स्टेबलला त्यांनी हुकूम फर्मावला, "इसको दूसरे कोटरी में रखो! और करमसिंगको लेके आव!" (अपूर्ण)


स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

# शर्मा स्वीट मार्ट

दत्तमंदिराशेजारी,
मंडई रस्ता, पुणे २.

## संगीतप्रधान चित्र

# पाटलाची सून

एक होता गाव. गावाचा राजा पाटील आणि गावाचा देशमुख यांचं हाडवैर. वैरापोटी देशमुखांचा बळी पडतो. पाटलांचा मुलगा दौलती, आणि देशमुखांची कन्या शारदा एकाच महाविद्यालयात शिकत, हाडवैराची जुनी परंपरा पुढे चालवतात. महाविद्यालयात निवडणुकीमध्ये शारदा दौलतीचा पराभव करते. वर्ष संपवून दोघे गावी येतात. शारदा पदवी घेऊन, तर दौलती एकाच वर्गामध्ये चार वर्षे राहून.

शहरी वातावरण संपून कथा 'ग्रामीन' वातावरणात प्रवेश करते. मग कुस्त्यांचे मैदान, बैलगाड्यांची शर्यत, या गोष्टींना भरपूर वाव आलाच. शारदेकडून सतत पराभव पत्करावा लागल्याने दौलती बेरडाकरवी तिला चक्क पळवून आणतो.

शारदेच्या सुटकेसाठी दिग्दर्शकाने ठेवलेली मशाल आणि पाटलांचे वेळीच आगमन यामुळे शारदा अब्रूनिशी बचावते. पण गाव थोडाच स्वस्थ बसतो! शारदेची सर्वत्र बदनामी होते.

मोठे पाटील आणि देशमुख मायलेकी मिळून निर्णय घेतात, की यातून सहीसलामत सुटण्याचा मार्ग एकच—शारदा—दौलतीचे लग्न. या सक्तीच्या लग्नापासून सुख कोणालाच मिळत नाही. आणि सतत वाढत जाणाऱ्या दुःखाची परिणती शारदेच्या मृत्युमध्ये होते. 'पाटलाची सून' मरते आणि धाकटे दौलतराव पाटील, ठिकाणी येतात. संपलं. १४ भागांची फिल्म खर्ची घालून रसिक चित्रनं' 'पाटलाची सून' नावाचं साचेबंद चित्र तयार केलं आहे.

पाटलांचे अत्याचार व पराक्रम—गाथा, तमाशाचे फड आणि लावण्यांची भर असलेले अनेक चित्रपट आले आणि गेले. पुण्यातील आर्यन व विजयानंद ही या प्रकारच्या चित्रपटाची 'कायम वास्तव्याची' ठिकाणे आहेत.

कवी संजीव यांनी सांगण्यासाठी जे निवडले त्यात नवीन काही नाही. आणि ज्या पद्धतीने दिग्दर्शकाने रुपेरी पडद्यावर ते साकार केले त्यातही नावीन्य नाही. तरीही प्रेक्षक बसतो, त्याची बऱ्यापैकी करमणूक होते, दिनकर द. पाटलांचे आटोपशीर व प्रसंगी मिस्किल तर प्रसंगी गंभीर संवाद, जयश्री गडकर, सूर्यकान्त, वसन्त शिंदे, यांची अभिनयाची समज, लीला गांधी व सुषमा यांची आकर्षक नृत्ये यांचा जमेच्या दुय्यम बाजू म्हणून उल्लेख करावा लागेल.

परंतु ज्या प्रेक्षकांसाठी 'पाटलाची सून' उभी आहे त्या प्रेक्षकवर्गाला खेचण्याचे खरे श्रेय कवी संजीव यांची आकर्षक पद्यरचना व राम कदम यांच्या उत्कृष्ट



दौलती (सूर्यकांत) आणि शारदा (जयश्री गडकर)

चाली यांनाच द्यावे लागेल. सर्व गीते सुश्राव्य असली तरी,

" दगा दिला डोळयानं केला पहिला गुन्हा. "

" म्हलारी माझा मल्हारी, देवा तुझीच रे जेजुरी, "

या गीतांच्या चालीतील गोडवा आकर्षक आहे. ' तुम्ही गुलाब मी गुलछडो, तुमचि माझी जोडी ' नृत्य, गीत, व चित्रीकरण अशा तिहेरी दृष्टिकोनातून सरस आहे. चाल पूर्वीची वाटते, तरीही सर्व गीतांमध्ये हेच गीत कमालीचे सुश्राव्य वाटते.

चित्रपट-कथानकातील ठळक दोप म्हणजे ' पाटलाच्या सुने 'सुद्धा सर्व व्यक्तिरेखा कमालीच्या विसंगत वाटतात. मध्यंतरानंतर बव्हंशी सुसंगत वाटणारे कथानक मध्यंतरानंतर कंटाळवाण्या चाकोरीमध्ये वाहवत जाते.

सर्व परिस्थितीचे पूर्ण ज्ञान असताना शारदा दौलतीशी लग्न करते हे मुळीच पटत नाही. मध्यंतरापर्यंत मुलाला धाकात ठेवणारे पाटील त्याच्या लग्नानंतर एकदम का बदलतात, शारदेचा स्वभाव व वृत्ती लग्नानंतर इतक्या कशा बदलतात, अशा असंख्य शंका प्रेक्षकांच्या मनामध्ये येतात आणि दुर्दैवाने एकाही शंकेचे निराकरण होऊ शकत नाही.

सूर्यकांतचे वय लक्षात घेता, त्याला कॉलेज-विद्यार्थी म्हणून उभा करणे अन्यायाचे वाटते. सूर्यकांत काम चांगले करतो हा भाग निराळा.

ग्रामीण पार्श्वभूमीवरील एक सामान्य संगीतप्रधान चित्र म्हणूनच ' पाटलाच्या सूने 'कड पाहावे लागेल. ●

—शरद गोखले

# तुमचे भविष्य आमचा अंदाज



**श्री. गो. जोशी**

**सायनाचार्य, नासिक**

दि, ४ ते १० फेब्रुवारी १९६७

**मेष** : क्वचित घडणाऱ्या गुरु-शनी त्रिकोणाच्या भोवतीच गुंजी घालणारा हा आठवडा आहे आणि याच वेळी तुमचा भाग्यलेख लिहिला जाणार आहे. मंगळ सातवा असो किंवा गुरु-शनी बारावा असो, या गुरु-शनी त्रिकोणाला त्यांची पर्वा करण्याचे कारण नाही. अगदी असाच गुरु-शनी त्रिकोण ६० वर्षांपूर्वी– १९०७ मध्ये घडून आलेला होता. त्यानंतर याच वेळी घडून येणार आहे. आणि या कालानंतर इ.स. २०२७ शिवाय असा महान योग क्रांतिवृत्तात घडूच शकणार नाही.

तुमच्या प्रगतीचे न सुटणारे गणित याच वेळी सुटेल. ध्यानीमनी नसताना अनपेक्षित लाभ पदरी पडतील.

ग्रहांचा काल अनुकूल मिळालेला आहे. थोडीफार गरज भासेल. परिश्रमांचीच तेवढी गरज भागविली की, अनन्यसाधारण यश पदरी पडेल.

दि. ६–८–१० सर्वोत्तम यश-प्रतिष्ठा देणारा काळ.

**वृषभ** : या आठवड्याचा गुरु-शनी त्रिकोण हे प्रमुख आकर्षण. अगदी असाच योग मागे १९०७ साली. आता १९६७ मध्ये आणि यानंतर २०२७. या वेळी गुरु-शनी त्रिकोण घडला, घडत आहे, घडून येणार आहे. प्रत्येक व्यक्तीला हयातीतून एकदाच असा योग

दिसण्याचे भाग्य लाभते. तुमच्या आजवरच्या कृतकर्मांची नोंद त्याच्याकडे असते आणि त्याला अनुसरून अंतरिक्षातील हा चित्रगुप्त याच वेळी तुमचा—आमचा भाग्य-लेख लिहीत असतो आणि माझी अशी खात्री आहे की या वेळी लिहिला जाणारा भाग्यलेख तुमच्या अपेक्षेपेक्षाही चांगला असेल.

औद्योगिक क्षेत्रात फार मोठी क्रान्ती घडेल. राजकीय वातावरणात तर तुमच्या उपस्थितीची नितांत गरज भासू लागेल. येथूनच पुढे आपल्या प्रतिष्ठेत फार मोठी भर पडू लागेल.

दि. ६–८–१० या काळी अनेक लाभदायक, प्रगतिकारक घटना घडून याव्यात.

**मिथुन** : मंगळाची अनिष्टता संपलेली आहे आणि बुध-शुक्रही भाग्यस्थानी प्रकटलेले आहेत. आजवरच्या साऱ्या असफल आशा-आकांक्षा याच काली सफल कराव्यात अशीच त्यांची इच्छा दिसते.

प्रभावी, रंजक व आकर्षक लेखन घडेल, आपली लोकप्रियता कळसाला पोचेल. अनपेक्षित लाभ, नोकरीधंद्यात प्रगती, अशाच आणखीही अनेक संस्मरणीय घटना या काली घडून यायला लागतील.

सिनेमासृष्टीतील कलावंतांना तर हा एक पर्वकाळ आल्यासारखा वाटेल. दीर्घ मुदतीचे करारमदार होतील, हाती फार मोठा पैसाही येईल.

मंगलकार्यासाठी दूरचे प्रवास घडू लागतील, प्रगतीची नवी दालने तुमच्यासाठी उघडली जातील. दि. ५–६–९–१० या कालाची नोंद करा.

**कर्क** : "गुरुसारखा त्राता नाही अन् शनीसारखा दाता नाही," या म्हणीचा प्रत्यक्ष प्रत्यय याच काली यायला लागेल. या वेळच्या गुरु-शनी त्रिकोणाचे सारे सामर्थ्य तुमच्या कर्कमध्येच केंद्रीभूत झालेले दिसेल.

राजकीय वर्तुळातील फार मोठी माणसे तुमच्याशी सहकार्याने वागू लागतील. त्यांच्या साहाय्याने फार मोठ्या स्थानी तुमची वर्णी लागेल.

प्रत्यक्ष लाभापेक्षा फार मोठी प्रतिष्ठा देणारा हा काल आहे. तुमच्या साऱ्या भव्य योजना या वेळी गती घेऊ लागतील. आणि उज्ज्वल भविष्याची प्रसादचिन्हं आताच स्पष्टपणे दिसायला लागतील. स्थावराचा प्रश्न काहीसा चिघळेल.

दि. ६–८–९ या काली महत्त्वाची कामे यशस्वी व्हावीत.

**सिंह**: अनेक ग्रह अनिष्ट असतानाही तुमची शान राखली एकट्या पराक्रमस्थ मंगळाने. व्यवसायक्षेत्रात अनेक पेचप्रसंग निर्माण होतील, राजकीय वातावरण काहीसे प्रक्षुब्ध बनेल. असे असूनही आपण आपले आसन स्थिर ठेवाल. ही सारी किमया एकट्या मंगळाची. हा आठवडा खूपच धाईगर्दीचा, धावपळीचा जाणवेल. अनेक अवघड कामे शिरावर घेऊन ती यशस्वी करून दाखवावी लागतील.

प्राप्ती आणि खर्च यांचा काही ताळमेळ राहणार नाही. वेळ भागेल एवढेच या वेळच्या गुरु-शनी त्रिकोणाबद्दल तुम्हांला फारशी आशा करायला जागा नाही.

आशादायक वातावरण निर्माण होईल. पण प्रत्यक्ष पदरात काहीच पडणार नाही.

दि. ५–६–७ एवढेच दिवस आशादायक वातावरण निर्माण करणारे आहेत.

**कन्या** : अकरावा गुरु आणि त्याला शनीचे सहकार्य लाभलेले, ही असाधारण ग्रहस्थिती ६० वर्षांनंतर आताच आपणांस लाभत आहे. या गुरु-शनी त्रिकोणाची खरी कृपादृष्टी आपणांवरच आहे. हा कल्पवृक्ष तुमच्या उंबरठ्यात उभा आहे. त्याची अनन्यभावाने करुणा भाकलीत तर तो प्रसन्न मनाने म्हणेल, " वरं ब्रूहि । " या वेळी तुम्हीही असे मागून घ्या की त्याच्या वरदानाने तुमची सारी हयात उजळून निघेल. शनि-मंगळ फारसे चांगले नाहीत म्हणून डरू नका. या काळात जे जे ठरवाल, मनात आणाल ते ते सारे अपेक्षेप्रमाणे पदरी पडेल.

राजकीय व सामाजिक क्षेत्रात महत्त्वाचे स्थान लाभेल. तुमच्या कर्तृत्वाला योग्य असे स्थान लाभेल. दि. ६ ते १० या कालाचीच प्रामुख्याने नोंद करा.

**तूळ** : नुसता दशमातील गुरुसुद्धा मानवी प्रतिष्ठेची उंची वाढवतो. या वेळी तर तो शनीसारख्या विशाल ग्रहाशी त्रिकोण करणार आहे हा मणि-कांचन योगच.

आपले व्यवसायक्षेत्र विशाल व प्रगत बनेल. अधिकारी व संपन्न लोकांचे सहकार्य सतत मिळू लागेल. समाजातील फार मोठी प्रतिष्ठेची स्थाने भूषविण्याची संधी लाभेल. आपल्या यशस्वी जीवनापासून जगाने धडा घ्यावा असे काही भव्यदिव्य आपणांकडून घडेल. हे दिवस सांपत्तिकदृष्टया फारसे प्रगतीचे नसले तरी सामाजिक मानसन्मानाच्या दृष्टीने चिरंतन स्मृतीचे ठरतील.

दगदग धावपळ खूपच होईल, फार मोठ्या जबाबदाऱ्या उचलाव्या लागतील.

दि. ६–८–९ या कालात फार मोठ्या यशाचे वाटेकरी व्हाल.

**वृश्चिक** : या वेळी अंतरिक्षातील अनंत ग्रह तुमच्यावर खूष आहेत. शिवाय गुरु-शनी त्रिकोणाचे वरदान लाभणार आहे, ते वेगळेच.

अशा वेळीच तुमच्यातील सुप्त कर्तृत्व उफाळून येईल, प्रतिभेचा उन्मेष बहरेल, प्रज्ञा विकसेल. व्यावसायिक क्षेत्र अपेक्षेबाहेर विस्तारेल. कौटुंबिक जीवनातही चिरंतन स्मृतीच्या अनंत घटना घडू लागतील. तुमच्या हयातीत–प्रथमच याच वेळी–अशी अनन्यसाधारण ग्रहस्थिती तुमच्या वाटयास आलेली आहे.

नोकरीधंद्यात आणि राजकीय क्षेत्रात तुम्हांला कोणी प्रतिस्पर्धीच उरणार नाही. सर्वच क्षेत्रांत सहज सुलभ यश पदरी पडेल. साहित्य–कला क्षेत्रांत तर सत्कार घडू लागतील. दि. ६–७–९–१० या कालाचे महत्त्व सर्वांत अधिक जाणवेल.

**धनू** : नेहमीची चाकोरी बदलून नव्या वाटेने वाटचाल कराल तरच अपेक्षित स्थान सापडेल. वारा वाहील तशी पाठ फिरवली पाहिजे. नवे तंत्रमंत्र आचरणात आणले पाहिजे. सध्याचे दिवसच असे आहेत. शनी चौथा, गुरू आठवा. परिस्थितीचे आव्हान स्वीकारल्याशिवाय गत्यंतर नाही. या आठवडयापासून व्यवसायधंद्यात बदल करावा, असे वाटू लागेल. मंगळाचे सहकार्य कोणत्याही क्षणी मिळेल.

मुख्यत: यांत्रिक-तांत्रिक व्यवहाराशी संबंध असलेल्या व्यक्तींना हा काल अनुकूल ठरेल. नवे करारमदार होतील. भागीदारीच्या व्यवहारात मोठमोठ्या उलाढाली घडायला लागतील दि. ६–७–९ अपेक्षित यश लाभेल.

**मकर** : अजूनही काही दिवस तरी निदान मकर राशीची माणसे आघाडीवर राहावीत अशीच नियतीची इच्छा दिसते.

मुख्यत्वे गुरु-शनी त्रिकोणच या वेळी तुमचे सारे चारित्र्य जडवीत-घडवीत आहे. त्यांच्या सहकार्यामुळेच तुमच्या आजवरच्या कर्तृत्वावर सुवर्णकळस चढला जाईल. रम्य, आकर्षक, मोहक असे लालित्यपूर्ण लेखन हातून घडेल. राजकीय क्षेत्रात तर तुमच्याविना पानही हलेनासे होईल. दशमस्थ मंगळ सत्ताधीश बनवील सप्तमातील गुरू कुटुंबात मांगल्य निर्माण करील. नोकरीधंद्यात फार मोठी प्रगती होईल, पैसा अनंत मार्गांनी हाती येऊ लागेल. रासायनिक, यांत्रिक क्षेत्रात प्रतिष्ठेचे स्थान लाभू शकेल. दि. ६–८–१० या कालातच सारे लक्ष केंद्रित करा.

**कुंभ** : आता साडेसाती नसल्यासारखीच आहे. आणि आहे असं मानलं तर ती सतत असावी असं वाटण्यासारखी आहे ! खरं सांगायचं म्हणजे, भाग्यातील मंगळाने तुमचा कायापालट केला, हृदय परिवर्तन घडविले आणि या वेळच्या गुरु-शनी त्रिकोणाने तर तुमच्या आजवरच्या मोठेपणावर सुवर्णकलशच चढविला.

हे आपल्या अपेक्षासाफल्याचे दिवस आहेत. तुमचे कर्तृत्व दाही दिशांनी चौफेर उधळू लागेल. वैचारिक मतभेद मिटतील, राजकीय यश अपेक्षेबाहेर लाभेल, वैज्ञानिक संशोधनामुळे तुमच्या व्यक्तिमत्त्वासभोवार तेजोवलय विलसू लागेल.

या आठवड्यात दूरदूरचे प्रवास घडतील, काहींना परदेशी जाण्याचीही संधी लाभेल. दि. ५–६–७–९ या काली अनेक कार्ये झटपट यशस्वी होतील.

**मीन** : या वेळी आपणांस अनेक ग्रह प्रतिकूल असूनही गुरु-शनी त्रिकोणामुळे त्यांची प्रतिकूलता बोथट बनेल, विरोधकांचे सारे डावपेच निष्प्रभ ठरू लागतील. अनारोग्य काही प्रमाणात तरी निवळेल आणि सांपत्तिक पेचप्रसंग खूप धडपडीनंतर सुटायला लागतील.

दि. ६ पासून हरवलेले स्वास्थ्य गवसेल, कधी न बोलणारी माणसे आस्थेने चौकशी करायला लागतील. या वेळी अंगीकृत कार्यात संपूर्ण यश जरी पदरी पडू लागले नाही तरी भविष्यकालीन यशाची खात्री वाटायला लागेल.

मंगल कार्ये निर्विघ्नपणे पार पाडतील, प्रतिष्ठेचा धोका निश्चितच टळेल.

दि. ६ ते ९ अपेक्षित यश पदरी पडल्यावाचून राहणार नाही.

# सातारा : मानपानाचे बंड

[ पान २३ वरून ]

गोरगरिबांवर अनंत उपकार केल्यामुळे त्यांच्याविषयी सर्वत्रच सहानुभूती आहे. त्यांच्या या लोकप्रियतेमुळे जातीय पातळीवरून त्यांच्या मतदारसंघात मतदान होणार नाही असे बोलले जाते. कोरेगाव मतदारसंघातील काँग्रेस उमेदवार श्री. आनंदराव फाळके यांच्याविषयीही स्थानिक कार्यकर्त्यांत नाराजीच आहे. त्यांच्याविरुद्ध श्री. हनुमंतराव वर्गे नावाचे बंडखोर काँग्रेस उमेदवारही आहेत. श्री. वर्गे यांच्या उमेदवारीचा परिणाम काँग्रेसची मत फुटून श्री. देशपांडे निवडून येण्यात होण्याची शक्यता आहे.

विरोधकांच्या यादीतला पाचवा मतदारसंघ म्हणजे खुद्द साताऱ्याचा. साताऱ्याचे सध्याचे काँग्रेस आमदार दादासाहेब जगताप हे उपमंत्री आहेत आणि श्री. यशवंतराव चव्हाण यांचे जवळचे नातेवाईक आहेत. मतदारसंघाच्या पुनर्रचनेत नवा सातारा मतदारसंघ श्री. जगताप यांना अनुकूल असाच झालेला आहे. परंतु समितीच्या पाठिंब्यावर उभे असलेले बंडखोर काँग्रेस उमेदवार श्री. नारायणराव पवार हेही तेवढेच मातब्बर आहेत. प्रचाराच्या बाबतीत तरी ते श्री. दादासाहेब जगताप यांना कमी पडत नाहीत. आज श्री. जगताप यांच्यापेक्षा श्री. पवार यांचेच निवडणूकफलक साताऱ्यात अधिक ठिकाणी दिसतात. श्री. पवार यांच्यामागे काँग्रेसमधला मोठा गट आहे. त्यामुळे ते श्री. जगताप यांना चांगली टक्कर देतील. परंतु त्यांच्या विजयाची आशा त्यामानाने कमी. कारण काँग्रेसविरोधी मताला आपल्या निवडीसाठी आणखी एक उमेदवार उभा आहे. तो म्हणजे जनसंघाचे श्री. विनायकराव ढवळे.

जनसंघाला सातारा जिल्ह्यात अद्याप विशेष वजन आलेले नाही. तसे पाहता कोणताच नाव घेण्यासारखा विरोधी पक्ष साताऱ्यात नाही. त्यातल्या त्यात जनसंघ आपल्या संघटनेच्या बळावर ठिकठिकाणी उमेदवार उभे करण्याचा प्रयत्न करीत आहे. जनसंघाचे खटावचे उमेदवार श्री. वसंतराव शेटचे हे काँग्रेसचे चंद्रहार पाटील यांच्याशी चांगला सामना देतील असे विरोधी पक्षाचे इतर लोकही कबूल करतात. तिथे जनसंघाची चांगली संघटना आहे.

मुख्य म्हणजे सातारा लोकसभेच्या जागेसाठीही जनसंघाने आपला उमेदवार उभा केला होता. ही उमेदवारी नंतर मागे घेण्यात आली.

गृहमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या विरोधात आता समितीतर्फे यशवंतरावांचे परंपरागत विरोधक श्री. केशवराव पवार आणि अपक्ष श्री. दिनकर रसाळ असे दोन उमेदवार उभे आहेत. यशवंतराव सातारा लोकसभा मतदारसंघातून बिनविरोध यावेत असा काँग्रेसचा प्रयत्न चालू होता. पण १९५२ च्या निवडणुकांपासून त्यांना सतत विरोध करीत आलेले श्री. केशवराव पवार याही खेपेला त्यांच्याशी सामना देत आहेत. श्री. चव्हाणांची जागा मोकळी सोडून त्यांना बिनविरोध येऊ देण्याचा समितीचाही बेत होता. परंतु खालच्या विधानसभा मतदारसंघातून बंडखोर काँग्रेस उमेदवार भराभर फुटू लागलेले दिसताच समितीने श्री. केशवराव पवार यांना उभे केले. श्री. पवार हे शे. का. पक्षाचे कार्यकर्ते. १९५२ च्या निवडणुकीत यशवंतराव चव्हाणांच्या विरुद्ध ते अवघ्या दोनशे मतांनी पराभूत झाले होते. अर्थात या वेळी यशवंतरावांची जागा ठरलेलीच आहे, पण मतांची जास्तीत जास्त टक्केवारी मिळविण्याचा जो काँग्रेस कार्यकर्त्यांचा इरादा होता तो मात्र तडीला जाणार नाही. सुमारे सव्वाचार लाखांच्या या मतदारसंघातील पाऊण लाख ते एक लाख मते तरी पवार खेचतील असे साताऱ्यातले तटस्थ राजकीय निरीक्षक सांगतात.

नवे तरुण नेतृत्व पुढे आणण्याची घोषणा करून साताऱ्यात अनेक जुन्या काँग्रेस कार्यकर्त्यांना डावलण्यात आले. शिवाय घोषणेप्रमाणे तिकीट मिळालेले सर्वच उमेदवार तरुण नाहीत. तिकीट वाटणाऱ्यांनी आपल्या सोयीप्रमाणे हवे त्या ठिकाणी आपल्या गटातील तरुण उभे केले आणि जेथे आपल्या गटातील तरुण मिळत नाहीत तेथे आपल्याच गटातील इतरांना उभे केले असा आरोप असंतुष्ट काँग्रेसजन करीत आहेत. आणि आपला असंतोष व्यक्त करण्यासाठी म्हणून का होईना त्यांचे मन विरोधकांकडे ओढले जाऊ लागले आहे. आधीच केशवराव पवार यांना भरपूर अनुयायी आहेत. काँग्रेसमधील बंडखोरीमुळे यशवंतरावांच्या विरोधात ते लक्षात येण्यासारखी मते मिळवू शकतील असे दिसते.

आधीच सांगितल्याप्रमाणे सातारा भागात निवडणुकीत जो रंग आहे तो कराड भागात नाही. त्या त्या ठिकाणी गेल्यावर तर हा फरक अधिकच जाणवून पडतो. कराड अगदी थंड वाटते तर निवडणूक सभा, प्रचार घोषणा, मिरवणुका, प्रचारपत्रके, भित्तीपत्रके, यांमुळे साताऱ्चे राजकीय वातावरण ढवळून निघाल्यासारखे वाटते. सातारा काँग्रेसमधली ही ऐतिहासिक बंडखोरी हा तर साताऱ्यात ज्याच्या त्याच्या तोंडचा विषय झालेला आहे. समितीने साताऱ्च्या बंडखोरांचे आभार मानावेत. कारण त्यांच्यामुळेच सातारा काँग्रेसच्या घट्ट कातडीवर समिती एकदोन नाजूक ठिकाणी प्रभावी प्रहार करू शकेल.

# सांगली : दोन प्रभावी विरोधक

सहकारी क्षेत्रात महाराष्ट्रात आणि अखिल भारतात आघाडी-वर दुमदुमत असलेला सांगली जिल्हा म्हणजे काँग्रेसचा आतापर्यंतचा बालेकिल्ला. एक सत्तावनची संयुक्त महा-राष्ट्राच्या प्रश्नावरची निवडणूक सोडता बाकी दोन्ही निवडणु-कीत जिल्ह्यातील एकाही मतदारसंघात काँग्रेसला दगा झालेला नाही. याला कारण काँग्रेसचे लोक सांगतात, "सहकारी क्षेत्रातलं आमचं काम. आम्ही आमच्या कामावर उभे आहोत. विरोधी पक्ष नुसते तोंडच्या बाता मारतात म्हणून मतदार त्यांच्या तोंडांना पानं पुसतात. आम्ही काहीतरी भरीव काम करतो आहोत."

जिल्ह्याने सहकारी क्षेत्रात खूप आघाडी मारली आहे हे विरोधी पक्षही कबूल करतात. पण या सहकारी क्षेत्रातही गटबाजी असल्याची तक्रार मांडतात. एकाही सहकारी संस्थेत विरोधी पक्षाचा एकही सभासद नाही, असे ते वैतागाने सांगतात.

सहकारी क्षेत्रातील साखर कारखाना, बत्तीस तेल गिरण्या, औद्योगिक वसाहतीतील अनेक सहकारी कारखाने सांगली जिल्ह्यात काँग्रेसच्या जमेला आहेत. या नेत्रदीपक सहकारी चळवळीविषयी काँग्रेस कार्यकर्ते अभिमानाने सांगत असले तरी सांगली विधानसभा मतदारसंघातून सर्वच विरोधी पक्षांचा पाठिंबा मिळवून काँग्रेसविरुद्ध लढण्यासाठी उभे राहिलेले व औद्योगिक शासनाचा चांगला अनुभव असलेले ॲडव्होकेट केशवराव चौगुले म्हणतात—

**"सांगलीतील सहकारी प्रयोग नेत्रदीपक दिसत असले तरी ते केवळ दिखाऊ आणि पोकळ आहेत. जेवढे सांगितले जाते तेवढे ते यशस्वी झाले नाहीत. शास्त्रीय पद्धतीने आणि समाधानकारकरीत्या हे प्रयोग चालू नाहीत, असे माझे मत आहे."**

आपल्या भरीव कामगिरीमुळे येत्या निवडणुकीत काँग्रेसला प्रचंड आत्मविश्वास आहे. आम्ही सगळ्या जागा जिंकू असे काँग्रेसचे लोक बिनदिक्कत तर सांगतातच पण त्याचबरोबर आपल्याला कुठे कुणी उमेदवार जोराची टक्कर देऊ शकेल असेही

त्यांना वाटत नाही. विरोधी पक्षांचे आणि तटस्थ निरीक्षकांचे मात्र मत वेगळे आहे. वाळवा मतदारसंघातील राजारामबापू पाटील आणि आटपाडी–कवडे महांकाळ-मधील बळवंत शिवलिंग कोरे या दोन जागा सोडून इतर सहा विधानसभांच्या जागांबाबत काँग्रेस गोत्यात येईल असे विरोधी पक्ष सांगतात. मिरजेचे डॉ. एन्. आर. पाठक हे काँग्रेसविरोधी अपक्ष समितीपुरस्कृत उमेदवार आणि सांगलीचे अपक्ष उमेदवार श्री. केशवराव चौगुले हे काँग्रेसचा पराभव करण्याची शक्यता असून फाजील आत्मविश्वासाने काँग्रेस गाफील राहिली तर आणखी काही जागा विरोधकांच्या ताब्यात जातील, असे तटस्थ निरीक्षक सांगतात.

सातारा जिल्ह्याप्रमाणेच सांगलीतही वसंतराव दादा पाटील, राजारामबापू पाटील, बॅ. जी. डी. पाटील, वि. स. पागे यांच्यासारखी काँग्रेसची बडी मंडळी असल्याने सारा जिल्हा काँग्रेसचा आहे हे खरे आहे. "सहकारी आणि इतर सर्वच क्षेत्रांत आम्ही जबरदस्त कामं केलेली आहेत. ही कामं अगदी गोरगरिबांपर्यंत पोचलेली आहेत. आणि तेच आमचे पाठीराखे आहेत," असे सांगली काँग्रेसचे पदाधिकारी सांगतात.

हे म्हणणे जरी बरेचसे खरे असले तरी सारीच जनता काही काँग्रेसवर खूष नाही. काँग्रेसच्या अंतर्गत गटबाजीचा परिणाम विकासावरही होतो. ज्या भागातून निवडून गेलेला काँग्रेस आमदार सामर्थ्यवान असेल किंवा मंत्री असेल त्या भागाला खूप सवलती मिळतात. पण जिथे आमदार विरोधी असेल किंवा काँग्रेसचा दुर्बल आमदार असेल तो भाग दुर्लक्षित होतो. आणि सांगली जिल्ह्यातील काँग्रेसची अंतर्गत गटबाजी प्रसिद्ध आहे. आणि या गटबाजीतूनच बऱ्याचशा विभागावर अन्याय झाले आहेत. या निवडणुकीसाठी काँग्रेसचे जे तिकीट-वाटप झाले, त्यातही ही गटबाजी झाली आणि असंतुष्ट आमदार खवळून उठले. त्यामुळेच जत आणि आटपाडी विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसचे बंडखोर उमेदवार निवडणुकीसाठी उभे राहिले आहेत.

बॅरिस्टर जी. डी. पाटील हे मिरज मतदारसंघातून निवडून आलेले आमदार उपमंत्री आहेत. परंतु गटबाजीमुळे ते किती उपेक्षित झालेले आहेत हे श्री. राजारामबापू पाटील यांना मंत्रिपदाचे प्रमोशन मिळाले तेव्हा उघड झाले होते. त्यांच्या उपेक्षेचा परिणाम मिरज भागावर झाला आहे. गेली आठ-दहा वर्षे सांगली जिल्ह्याची प्रगतीच्या दिशेने घोडदौड चालू असताना मिरजेकडे पूर्ण दुर्लक्ष झाले आहे. याचे पर्यवसान काँग्रेसबद्दल असंतोष निर्माण होण्यात झाले आहे.

सबंध सांगली जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदारसंघांपैकी मिरज, सांगली आणि तासगाव या क्रमाने तीनच जागा काँग्रेसविरोधी उमेदवारांना मिळण्याची थोडीफार शक्यता आहे. याला कारण तिथले विरोधी पक्ष आणि समिती बलवान

[ पृष्ठ ६२ वर ]

विख्यात कादंबरी

# दुल्हन एक रातकी

थॉमस हार्डीच्या ' टेस ऑफ द आर्बरव्हिल ' या जगविख्यात कादंबरीवरून धर्मदेव कश्यप यांना स्फुरलेली कथा त्यांनी ' दुल्हन एक रातकी ' या चित्रपटाच्या रूपाने साकार केली व एक हिंदी चित्रपट तयार झाला. गाजलेल्या कादंबरीचा हवाला आणि हिंदी चित्रपटाचा मसाला यांमध्ये श्री. कश्यप यांनी ' दुल्हन...' चित्रपट चांगला बेतला आहे, मनोरंजक बनविला आहे. हार्डीच्या कादंबरीवरून स्फुरलेला हा चित्रपट आहे, असे त्यांनी सांगितले नसते तरी खपून गेला असता इतका तो हिंदी बनला आहे.

अशोकशी प्रेमविवाह नक्की ठरलेल्या निर्मलेच्या असहायतेचा फायदा एके रात्री ती ज्या गृहस्थाकडे-रणजीत-नोकरीला असते तो घेतो, तिच्यावर बलात्कार करतो. आपण निष्कलंक नाही, याचे निर्मलेला मनस्वी दुःख असते व ती सगळी हकीकत अशोकला लिहून कळविते. दुर्दैवाने ते पत्र अशोकपर्यंत पोचते ते लग्नाच्या पहिल्या रात्रीच. तोपर्यंत अशोक आपल्याशी सर्व काही जाणून लग्न करीत आहे अशीच निर्मलेची भावना असते. अशोकला एकाएकी तिटकारा येतो. निर्मला परित्यक्ता बनते. अखेरीस तिचे निष्पाप मन अशोकला पटते. त्यांच्या पुनर्मीलनाची वेळ येते. पण पुन्हा तो गृहस्थ–रणजीत-आडवा येतो. या वेळी निर्मला त्याचे संकट पार करते ती त्याचा खून करूनच. अशोक–निर्मलेचे मीलन होते ते एका रात्रीपुरतेच, कारण पुन्हा सकाळी निर्मलेला अटक व्हायची असते खुनाच्या आरोपावरून.

ही खरी कथा आहे निर्मलेच्या तीव्र मनोसंघर्षाची, तिला खाणाऱ्या पापाची व त्याचबरोबर आपल्या निष्कलंकपणाबद्दल तिला असणाऱ्या खात्रीची. पडद्यावर हा मनोसंघर्ष सादर करावयाचा हे अतिशय अवघड काम होते व तेच जमविण्यात दिग्दर्शक–लेखक धर्मदेव कश्यप फसले आहेत. त्यांनी चित्रपट सरळमार्गी घेतला आहे व त्यामुळे तो नेहमीचा हिंदी चित्रपट झाला आहे. फक्त कथेतले नावीन्य तेवढे जाणवते.

तसे श्री. कश्यप यांचे दिग्दर्शनाचे कसब, विशेषतः, त्यांनी केलेली चित्रपटाची

संयमपूर्ण हाताळणी या चित्रपटात फारच जाणवते. तरीसुद्धा चित्रपट हवा तेवढा प्रभावी झाला नाही. याला एक कारण. लेखक कश्यप यांना तीन तासांत कादंबरीचे कथानक व्यवस्थित बसविणे जमले नाही. त्यामुळे निर्मलेची एक मध्यवर्ती व्यक्तिरेखा नीट तयार झाली तरी आजूबाजूच्या सर्व व्यक्तिरेखा अधुऱ्या, तुटक राहिल्या व त्यामुळे चित्रपटास परिपूर्णता अशी आलीच नाही.

सतत फिकट असे छायाचित्रण (काही ठिकाणी तर हें तांत्रिक दोषापोटी जास्तच झाले आहे) व अगदी मोजक्यासंयमी आवाजांत सादर केलेले संवाद यांमुळे चित्रपटाचे गांभीर्य कायम राहिले आहे. जॉनीवॉकर जेव्हा येऊन गंमती करतो, तेव्हासुद्धा हा संयम जाणवतो. हें कश्यप यांचेच यश मानायला हवे. याला मदनमोहन यांच्या पार्श्वसंगीताने विलक्षण चांगली जोड दिली आहे. त्यांचे पार्श्वसंगीत विलक्षण परिणामकारी आहे. मात्र गाण्यांच्या चाली तेवढ्या वेधक नाहीत.

**अभिनयातील निराशा**

कामामध्ये खास सांगावे असे काही नाही. मुख्य निर्मलेच्या भूमिकेत नूतनला आपले अभिनयसामर्थ्य दाखविण्यास विलक्षण वाव होता. तथापि या चित्रपटात सर्वच पात्रांवर एक निर्जिवतेची छाप दिसते. सगळी मारून-मुटकून उभी केल्यासारखी दिसतात. नूतनने तर निराशाच केली, असे म्हणावे लागेल. काही गंभीर प्रसंगी तिने सुप्त अभिनय-शक्तीची चुणूक दाखविली असली तरी एकूण काम तिच्या कारकीर्दीस साजेसे नाही. त्यातल्या त्यात समाधान धर्मेंद्रच देतो. विशेषतः, सुरुवातीचे धर्मेंद्र-नूतनमधील संकेतस्थळी जमण्याचे प्रसंग धर्मेंद्रच्या सहज वागण्याने अधिक वास्तव झाले आहेत. श्री. कश्यप यांनी हे प्रसंग घेतले आहेतही छान. रेहमानची व्यक्तिरेखाच काळीकुट्ट करण्याचा प्रयत्न हिंदी सिनेमाला साजेसा आहे. आईची काळजी वाहणारा हा तरुण खाली तिची काळजी घेण्यासाठीच आलेल्या तरुणीला पाहताक्षणीच नजरेत विखार दाखवितो, हें कसेसेच वाटते. अर्थात पुढे रंगविलेल्या त्यांच्या चित्राशी ते सुसंगतच आहे. पण त्याच्या एकूण व्यक्तिरेखेला कसलाच आधार नाही. बाकी मंडळी ठीक आहेत. धर्मेंद्रची बहीण म्हणून तबस्सूम दिसते. तिची काहीच छाप पडत नाही.

'दुल्हन एक रातकी 'ची नायिका निर्मला, दुर्दैवाने सतत पिच्छा पुरविलेली. तिच्याविषयी सहानुभूती निर्माण होण्यात चित्रपटाचे व ती करण्यात दिग्दर्शकाचे यश अवलंबून होते. त्याबाबतीत निराशाच झाली आहे. मग समाधान एवढेच की हिंदी चित्रपटात जेवढे गंभीर कथाविषयाचे वाटोळे होते, तेवढे यात झालेले नाही. ●

# सांगली – दोन प्रभावी विरोधक

[ पृष्ठ ५९ वरून ]

आहे असे नव्हे तर त्या त्या ठिकाणचे उमेदवार व्यक्तिशः बलवान आहेत. आणि ते स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाच्या जोरावर काँग्रेसशी टक्कर देत आहोत. समितीचा त्यांना पाठिंबा आहे एवढेच.

मिरज मतदारसंघातून बॅ. जी. डी. पाटील यांच्या विरोधात उभे असलेले समितीपुरस्कृत उमेदवार डॉ. नरसिंह रामचंद्र पाठक हे आपल्या मतदारसंघात अतिशय लोकप्रिय आहेत. कोणत्याही डॉक्टरने आदर्श ठेवावा अशी आजूबाजूच्या भागाची निरलस सेवा गेली २० वर्षे डॉ. पाठक करीत आहेत. मिरज भागातील गोरगरिबांचे तर डॉ. पाठक म्हणजे दैवत आहेत. मिरज आणि इस्लामपूर येथील आपल्या अद्ययावत रुग्णालयांमध्ये ते गोरगरिबांवर अत्यंत माफक दरामध्ये उपचार तर करतातच पण त्याचबरोबर इतरही कामे करतात. मिरजेत त्यांनी दायांचा एक वर्ग चालविला आहे. स्वतःच्या खर्चाने त्यांनी एक अनाथ अर्भकालय चालविले आहे. या अनाथलयातल्या मुलांच्या मुंजी करून त्यांना ते आपली नावे देतात. पाच–सहा वर्षे त्यांनी 'नेत्रदान' यज्ञ करून सुमारे दीड हजार लोकांच्या डोळ्यांची मोफत शस्त्रक्रिया केलेली आहे. तसेच मिरज भागातल्या एखाद्या दुर्गम भागात वर्षातून एकदा सर्व सहकाऱ्यांसह जाऊन तीन दिवसांचे वैद्यकीय शिबीर चालविण्याचीही त्यांची प्रथा आहे. त्यामुळे मिरज भागातले लोक त्यांना गोरगरिबांचा डॉक्टर म्हणूनच ओळखतात.

त्याबरोबरच डॉ. पाठक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय वैद्यकीय परिषदांमध्ये सतत अभ्यासू वृत्तीने भाग घेत असतात. आणि दरवेळी काही नवनवीन कल्पना शिकून येतात. गेल्या वेळी स्टॉकहोमला गेले असताना त्यांनी तेथील वृद्धाश्रमाची जवळून पाहणी केली. मिरजेमध्ये एखादा वृद्धाश्रम काढण्याची त्यांची योजना आहे.

सामाजिक कार्यात एवढे गुरफटले असताना डॉ. पाठक एकाएकी राजकारणात का पडले? असे त्यांना विचारले असता ते सांगतात, "गेल्या पाच-दहा वर्षांत मिरज भागावर होणारा अन्याय जाणवण्यासारखा आहे. अन्यायाला प्रभावी वाचा फोडण्यासाठी कुणीतरी उभे राहिलेच पाहिजे. मिरजेवर होणाऱ्या अन्यायाची यादी मोठी आहे. मिरज भागातील खेड्यात पक्के रस्ते नाहीत. वाहतुकीची सोय नाही. राजारामबापू, कुंभार आदींच्या मतदारसंघातून थेट मुंबईपर्यंत एस. टी. च्या गाड्या जातात. आमच्याकडून का जाऊ नयेत? मिरज भागात एकही उद्योगधंदा नाही. सगळे सहकारी उद्योगधंदे आहेत सांगलीला. १९५५ साली मिरज शहराची भूमिगत गटाराची योजना मंजूर झाली होती. पण पैशाअभावी ती अद्याप पडून आहे. मिरज भागातल्या एकाही खेड्यात फोन नाही. मिरज मेडिकल कॉलेजची अक्षम्य हेळसांड चालू आहे. शेजारचा वाळवा तालुका कितीतरी सुधारला आहे."

हे असे का ? तर मिरजेला कुणाचं पुढारीपण नाही. सारे पुढारी सांगलीत. म्हणून या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी डॉ. पाठक यांना विधानसभेत जायचे आहे.

त्यांच्या विरुद्ध असलेले कॉंग्रेसचे बॅ. जी. डी. पाटील यांना स्थानिक लोकमताचा काही पाठिंबा नाही. मिरजेवरील अन्याय ते दूर करू शकले नाही, अशी लोकांची धारणा. त्यामुळे बॅ. पाटील यांना मिरज भागाचे तिकीट देण्याऐवजी श्री. आबासाहेब शिंदे यांना तिकीट द्यावे, असा ३०,००० सह्यांचा अर्ज सांगली कॉंग्रेसला करण्यात आला होता. पण तो डावलून पाटील यांनाच तिकीट देण्यात आले. त्यामुळे कॉंग्रेस कार्यकर्ते नाराज आहेत. या परिस्थितीत आणि डॉ. पाठक यांची

उर्दू वार्ता

## ईदचे तत्त्वज्ञान :

मुस्लिम समाजाने सर्वत्र नुकतीच आपली 'ईदुअल फितर' साजरी केली. फितर म्हणजे खैरात. या ईदच्या एक महिना आधीपासून उपवास सुरू होतात. त्यांना 'रोजे' असे म्हणतात. या रोज्यांमुळे संयमाची सवय होते. संयमामुळे अनेक मोहांपासून स्वतःचे रक्षण होते व प्रलयकाळी पुण्याचे पारडे जड होते, अशी इस्लामची शिकवण आहे. ईद म्हणजे या सर्व पवित्र भावनांचा मंगल आविष्कार! इतर धर्मियांप्रमाणे लढाया जिंकल्यामुळे होणारा आनंद व्यक्त करणे अथवा बाह्यात्कारी देखावा म्हणून ईद साजरी केली जात नाही, जगन्नियंत्याबद्दलची असीम कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्याच्यापुढे नतमस्तक होण्याचे एक निमित्त म्हणजे ही ईद होय! 'फितरा' व 'जकात' म्हणजे गरजूंना मदत (...२) व दान हे इस्लामचे मुख्य सूत्र येथेही अभिप्रेत आहे. ईदमुळे प्रत्येक मुसलमानाला आनंद होतो. परंतु गरजू व गरिबांनाही तो लाभावा म्हणून आपणहून त्यांना अगत्यपूर्वक मदत करणाऱ्यांना मिळणारा आनंद अपूर्व, अलौलिक व आगळाच होय! अशा प्रकारे 'दीन' (इस्लाम धर्म) व 'दुनिया' (व्यवहार) दोन्ही पाहणाऱ्यांनाच खरा इस्लाम आत्मसात झालेला असतो! परंतु दुर्दैव असे की, ऐहिक सुखात लोळणाऱ्या अनेक लब्धप्रतिष्ठितांना या 'क्षुल्लक' गोष्टींकडे लक्ष द्यावयाला मुळी फुरसतच कुठे असते?

दुसरे असे की, ईदच्या निमित्ताने वर्षातून दोनदा (आणखी एक ईद 'बकरीद' होय!) नमाजीसाठी सर्व मुसलमान एकत्र जमतात. नमाजनंतर एकमेकांना कडकडून भेटतात. हर्षविमर्षांच्या प्रसंगी एकीने राहण्याचा इस्लामचा आदेश अशा प्रकारे कृतीत उतरलेला दिसतो!

संकलक : हिदायतखान 'उर्दू टाईम्स' १३-१-६७

लोकप्रियता पाहता त्यांना अधिक आशा आहेत असे म्हणण्यास हरकत नाही.

सांगलीचे अपक्ष उमेदवार अॅडव्होकेट केशवराव चौगुले यांचेही असेच आहे. शैक्षणिक क्षेत्रातील त्यांची कामगिरी उल्लेखनीय आहे. पुण्याची डेक्कन एज्युकेशन सोसायटी, सांगलीची लठ्ठे एज्युकेशन सोसायटी, पुणे विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ आदी अनेक संस्थांमधून त्यांनी महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. सांगलीत त्यांनी गेली वीस वर्षे हरिजन व तत्सम विद्यार्थ्यांचे वसतिगृह चालविले आहे. गेल्याच वर्षापासून हरिजन विद्यार्थिनींचेही वसतिगृह त्यांनी सुरू केले. अॅ. चौगुले स्वत: जैन आहेत आणि निरनिराळ्या भारतव्यापी व महाराष्ट्रव्यापी जैन संघटनांमध्ये त्यांनी भाग घेऊन त्यांच्या कार्याला मोठाच हातभार लावला आहे. त्यांच्या मतदारसंघात सुमारे २५ टक्के जैनवस्ती आहे.

त्याचबरोबर अॅ. चौगुले हे निष्णात कायदेपंडित म्हणून प्रसिद्ध आहेत. सांगली भागातील कित्येक गाजलेले खटले त्यांनी चालविले होते. उगार शुगर वर्क्स, तिवाक इंडस्ट्रीज आदी कारखान्यांत त्यांनी संचालक म्हणून काम केले आहे.

श्री. चौगुले यांना समिती, जनसंघासह सर्व विरोधी पक्षांचा पाठिंबा आहे. त्यांच्याविरुद्ध उभे असलेले काँग्रेसचे उमेदवार श्री. आप्पासाहेब बळवंत विरनाळे यांची लोकप्रियता यथातथाच आहे. सुरक्षित व इतर साऱ्याच लोकांमध्ये श्री. चौगुले यांच्याविषयी आदर आहे. त्यामुळे आपण निवडून येऊ शकू, असा श्री. चौगुले यांना विश्वास आहे.

त्यानंतरची विरोधी पक्षांची आशेची जागा म्हणजे तासगावची. शे. का. पक्षाचे जुने कार्यकर्ते श्री. जी. डी. लाड येथून समितीतर्फे काँग्रेसचे श्री. बाबासाहेब पाटील यांच्याविरुद्ध उभे आहेत. श्री. लाड हे जुने शे. का. पक्षाचे कार्यकर्ते आहेत. १९५० साली संयुक्त महाराष्ट्राच्या धामधुमीत ते विधानसभेवर निवडून आले होते. त्यामुळे ते श्री. पाटील यांना चांगला सामना देऊ शकतील असे दिसते.

काँग्रेसमधून फुटून निघालेले श्री. बी. एल. पवार हे जत मतदारसंघातून काँग्रेसविरुद्ध उभे आहेत. त्यांच्याबरोबर काँग्रेसचा मोठा गट त्यांच्यामागे आला असल्याने तेही काँग्रेस उमेदवाराला जोराची टक्कर देतील, अशी शक्यता आहे.

सांगली जिल्ह्यातील उरलेल्या जागांबद्दल काँग्रेसला विशेष धोका नाही. काँग्रेसतर्फे लोकसभेसाठी उभे असलेले श्री. सदा दाजी पाटील हेही बिनदिक्कत निवडून येतील.


जिल्ह्यामध्ये त्यातल्या त्यात नाव घेण्यासारखा विरोधी पक्ष म्हणजे शेतकरी कामकरी पक्षच. याच विरोधी पक्षाचे थोडेसे काम जिल्ह्यात आहे. पण म्हणण्यासारखी जिल्हाव्यापी संघटना नाही. इतर ठिकाणांप्रमाणे जनसंघाने याही जिल्ह्यात लोकसभेसकट बऱ्याच ठिकाणी आपले उमेदवार उभे केले आहेत. "समितीला मत म्हणजे देशद्रोह्यांना मत," "आ गया ऽऽ आ गया, जनसंघ आ गया" अशा तऱ्हेच्या आक्रमक घोषणाही ठिकठिकाणी रंगविलेल्या दिसतात. पण जिल्ह्यात जनसंघाला अद्याप काही स्थान नाही. त्यांचा एकही उमेदवार विशेष सामना देऊ शकणार नाही. ●

# उद्या तुमची तयारी असली तरीही तुमचा विमा उतरवता येणार नाही.

विमा उतरवायला का मुहूर्त लागतो ? यापूर्वी किती तरी वेळां विमा एजंट तुम्हाला भेटून गेला. विमा उतरवायचेही ठरले. परंतु आज नको, एक तारखेला किंवा आतां दिवाळीत असें करुन आजचे उद्यावर चालले आहे. कोणत्याही परिस्थितीत तुमच्या कुटुंबियांना आयुर्विमा हाच आधार असतो. हा आधार निश्चित करण्यासाठीं मुहूर्त पहायला नको! अत्यंत महत्वाची गोष्ट आहे ही...विमा ताबडतोब करायला पाहिजे.

हो! ताबडतोबच करायला पाहिजे. विमा उतरवतांना तुमची प्रकृती, वय वगैरेंची दखल घेतली जाते. समजा, पुढें तुमच्या प्रकृतीने अचानक पलट खाल्ली...तर तुमचा विमा उतरवतां येणार नाही...तुमची इच्छा असली तरी! तुमचें कुटुंब एका मोठ्या आधाराला मुकेल.

विमा उतरवायचे ठरले असेल तर तो आजच उतरवा.



आयुर्विम्याला पर्याय नाहीं


PRATIBHA/663

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H–649

प्रगतिपथावरील पुढचे पाऊल...

# स्वस्तिक

## चप्पल्स



स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लिमिटेड, खडकी, पुणें ३.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९